अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिध्द

# दैनिक राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रू. ४.०० । अंक १४२ । शुक्रवार ६ मार्च २०२६

। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 8282 । www.rashtrasahyadri.com

## अजितदादांचा घातपात..?

### सुनेत्रा पवार पंतप्रधानांकडे चौकशीची मागणी करणार!



मुंबई : दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवारांचा अपघात नव्हे तर घातपातच असल्याचा संशय पवार कुटुंबाला वाटत असल्याची सूत्रांनी माहिती दिली आहे. त्यामुळेच सुनेत्रा पवार, जय आणि पार्थ पवार हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेणार असल्याची माहिती आहे. विमान अपघाताप्रकरणी सखोल सीबीआय चौकशी व्हावी आणि व्हीएसआर कंपनीची सर्व विमानं जमिनीवर आणली जावी अशी कुटुंबाची इच्छा असल्याची माहिती आहे. सध्या व्हीएसआर कंपनीच्या लेअरजेट विमानांवर बंदी घालण्यात आली आहे. मात्र या कंपनीची इतर विमानं अद्याप सुरू आहेत. त्यामुळे या विमान कंपनीवर बंदी घालावी अशी मागणी पवार कुटुंबीय पंतप्रधानांकडे करणार असल्याची माहिती आहे

## महत्त्वाचे..

### नागपूर स्फोट, अपघात नसून हत्याकांड

मुंबई : नागपूर येथील एसबीएल कंपनीत झालेला भीषण स्फोटात २२ निष्पाप कामगारांचा बळी गेला, तो हलगर्जीपणा नसून प्रशासकीय आणि मालकांच्या संगनमताने केलेले 'हत्याकांड' आहे,असा आरोप काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केला. या प्रकरणातील एफआयआर मधील त्रुटी आणि सुरक्षा नियमांच्या पायमल्लीवरून त्यांनी सरकारला धारेवर धरले. ज्या घटनेत २२ लोकांचा जीव गेला, त्या घटनेच्या एफआयआरमध्ये अशी कलमे का लावली गेली ज्यामुळे आरोपींना दुसऱ्याच दिवशी जामीन मिळेल? मालकावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा का दाखल केला गेला नाही? हे सरकार गुन्हेगारांना पाठीशी घालत असल्याची टीका वडेट्टीवार यांनी केली. यावेळी विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देताना मंत्र्यांच्या कायदेशीर दृष्ट्या जे शक्य असेल ते करू या विधानाचा समाचार घेताना वडेट्टीवार म्हणाले की, दीड वर्षात इतके स्फोट झाले तरी सरकार काय कारवाई करत आहे? अधिकाऱ्यांना पाठीशी का घालत आहेत? हे हत्याकांड करणाऱ्यांना सरकार शिक्षा देण्यात कुचराई करत आहे.

# राज्यसभा बिनविरोध!

## शरद पवार, रामदास आठवले, विनोद तावडे यांच्यासह नव्या चेहऱ्यांना संधी













**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**मुंबई :** राज्यसभेच्या सात जागांसाठी सातच उमेदवारी अर्ज, निवडणूक बिनविरोध होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. भाजपने विनोद तावडे, रामदास आठवले, माया इवनाते व रामराव वडकुते यांना संधी दिली. राष्ट्रवादी काँग्रेसकडून पार्थ पवार, तर शिवसेनेकडून ज्योती वाघमारे यांनी अर्ज दाखल केला. महाविकास आघाडीकडून शरद पवार यांच्या नावावर एकमत झाले. मात्र त्यांची प्रकृती ठीक नसल्याने त्यांच्या निवासस्थानी जाऊन उमेदवारी प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. आता केवळ अधिकृत घोषणेची औपचारिकता बाकी आहे.



गेल्या काही दिवसापासून राज्यसभेच्या जागी कोणाला संधी मिळणार अशा चर्चांना आज पूर्णविराम मिळाला. राज्यातील संख्याबळ पाहता, भाजपकडे चार, अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिंदेंच्या शिवसेनेकडे प्रत्येकी एक आणि महाविकास आघाडीकडे एक अशा जागा आल्या होत्या. या जागांवर कोण जाणार? ही निवडणूक बिनविरोध होणार का? असे अनेक प्रश्नांची उत्तरे आज मिळाली. राज्यसभेच्या जागांसाठी होणाऱ्या निवडणुकीकरीता अर्ज भरण्याची शेवटची तारीख ५ मार्च होती. भाजपने जाहीर केल्याप्रमाणे चार जणांना संधी दिली. यामध्ये विनोद तावडे आणि रामदास आठवले यांच्या सोबत माया इवनाते, रामराव वडकुते यांची नावे पाहून अनेकांना आश्चर्य वाटले. तसेच, अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेसकडून पार्थ पवार यांनी अर्ज दाखल केला. तर, शिंदे शिवसेनेकडून ज्योती वाघमारे यांनी राज्यसभेसाठी अर्ज भरला आहे. तसेच महाविकास आघाडीकडून पुन्हा एकदा शरद पवार यांच्या नावावर एकमत झाले. त्यांची तब्येत बरी नसल्याने निवडणूक अधिकाऱ्यांनी घरी जाऊन प्रक्रिया पूर्ण केली. आता या सातही जागांसाठी सात अर्ज आल्याने ही निवडणूक बिनविरोध झाली असून आता फक्त औपचारिक घोषणा बाकी आहे.

### शिंदेंचे धक्कातंत्र, ज्येष्ठांना डावलून नवीन चेहरा

राज्यसभेच्या निवडणुकीसाठी एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेकडून अनेक नावे समोर येत होती. गेल्या काही दिवसांपासून ज्येष्ठ नेते गजानन किर्तीकर, आनंद अडसूळ, संजय निरुपम तसेच राहुल शेवाळे शायना एनसी यांच्या नावाची चर्चा होती. पण, एकनाथ शिंदेंनी ज्योती वाघमारे यांची निवड करत सर्वांनाच मोठा धक्का दिला. यावेळी, ज्योती वाघमारे यांनी दोन अर्ज दाखल केले आहेत. अडसूळ यांनी यासंदर्भात आपली नाराजी जाहीरपणे बोलून दाखविली आहे . मला राज्यपाल करण्याचे आश्वासन केंदीय गृहमंत्री अमित शाह यांनी दिले होते . राज्यपाल पॅड मिळाले नाही किमान राज्यसभा मला किंवा मुलाला द्यावयास हवी होती मात्र ते देखील करण्यात आले अशी असे अडसूळ म्हणाले

### महाराष्ट्राच्या इतिहासात पहिल्यांदाच असे घडले

राज्यसभेच्या निवडणुकीसाठी शरद पवारांनी दोन अर्ज दाखल केले आहेत. त्याचबरोबर राष्ट्रवादीच्या पार्थ पवारांनी देखील दोन अर्ज दाखल केले आहेत. दरम्यान, तब्येतीच्या कारणास्तव शरद पवार हे स्वतः अर्ज भरण्यासाठी उपस्थित राहू शकले नाहीत. त्यामुळे निवडणूक अधिकाऱ्यांनी शरद पवारांच्या घरी जाऊन सगळी प्रक्रिया पूर्ण केली. आजारी व्यक्ती राज्यसभेचा अर्ज दाखल करण्यासाठी येऊ शकला नाही अशी महाराष्ट्राच्या इतिहासातील ही पहिलीच घटना ठरली आहे.

# राहत्यात ‘अप्पर वॉटर’ बाजारतळ उभारणार

## जपानी तंत्रज्ञानावरील महाराष्ट्रातील पहिला प्रकल्प



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहाता :** महाराष्ट्रातील पहिला जापानी तंत्रज्ञानावर आधारित असा आधुनिक अप्पर वॉटर बाजार तळ हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प राहता शहरात साकार होत आहे. सुमारे ७ कोटी रुपयांच्या खर्चातून हा हायटेक बाजारतळ उभारण्यात येणार असल्याची माहिती भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे यांनी दिली.

या आधुनिक बाजारतळाच्या माध्यमातून शेतकरी, व्यापारी आणि ग्राहकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध होणार आहेत. पावसाळ्यात किंवा पाणी साचण्याच्या समस्येवर उपाय म्हणून जपानी तंत्रज्ञानाचा वापर करून विशेष ‘अप्पर वॉटर’ व्यवस्था करण्यात येणार आहे. त्यामुळे बाजार परिसरात स्वच्छता आणि पाण्याचा योग्य निचरा राखण्यास मदत होणार आहे.

राहात्यातील आठवडे बाजारचा प्रश्न गेल्या कित्येक वर्षांपासून चर्चेत होता. हा बाजार विरभद्र मंदीरासमोरील मैदानात भरत असल्याने, पसिररातील शॉंपिंग कॉम्प्लेक्समधील व्यापाऱ्यांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत होते. शिवाय हे मैदान बाजारसाठी कमी पडत असल्याने शेतकरी व व्यापारी नगर-मनमाड महामार्ग व साकुरी रस्त्याच्या कडेला बसत होते.

त्यामुळे अनेकदा वाहतूक कोंडीची समस्याही निर्माण होत होती. हिच समस्या सोडविण्यासाठी भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष डॉं. सुजय विखे पाटील यांनी पुढाकार घेतला.

यावेळी कातनाल्याची स्वच्छता व इस्टीमेंट तयार करण्याच्या सूचना दिल्या आहेत कातनाल्यावर झालेल्या **(पान ४ वर)**

# एसटीत मद्यपान, चालक-वाहकांची अल्कोटेस्ट सक्तीची

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**मुंबई :** मुंबईतील परळ बसस्थानकातील चालक-वाहकांच्या विश्रांतीगृहांमध्ये मोठ्या प्रमाणात मद्याच्या बाटल्या आढळून आल्याच्या घटनेनंतर परिवहन मंत्री प्रताप सरनाईक संतप्त झाले असून राज्यातील सर्व एसटी आगारांमध्ये चालक-वाहकांच्या मद्यपानावर नियंत्रण ठेवण्यासाठी कडक उपाययोजना लागू करण्याचे निर्देश त्यांनी दिले आहेत. प्रवाशांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत एसटी सेवेत असताना मद्यपानास आळा घालण्यासाठी चालक-वाहकांची अल्कोटेस्ट तपासणी सक्तीची करण्यात आली आहे.

२५ जानेवारी रोजी मंत्री सरनाईक यांनी मुंबईतील परळ बसस्थानकाला अचानक भेट दिली होती. यावेळी चालक-वाहकांच्या विश्रांतीगृहांमध्ये अनेक मद्याच्या बाटल्या आढळून आल्या. काही कर्मचारी मद्यधुंद अवस्थेत असल्याचेही निदर्शनास आले. या प्रकाराची गंभीर दखल घेत त्यांनी तातडीने चौकशी समिती नेमून संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश दिले होते. तसेच अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी कठोर उपाययोजना करण्याचे निर्देशही दिले.

एसटी प्रशासनाने तीन अधिकाऱ्यांची समिती नेमून सखोल चौकशी केली असून दोषी अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे. चौकशी अहवाल एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांच्याकडे सादर करण्यात आला असून त्यांच्या निर्देशानुसार दोषी अधिकाऱ्यांवर कारवाईची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. तसेच समितीने सुचविलेल्या उपाययोजना राज्यातील सर्व एसटी आगारांमध्ये तातडीने लागू करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

नव्या नियमांनुसार आगारात कामावर हजर होणाऱ्या सर्व चालकांची अल्कोटेस्ट मशीनद्वारे दररोज तपासणी करणे बंधनकारक करण्यात आले आहे. तपासणीची नोंद घेऊनच चालकांना ड्युटीवर पाठविण्यात येणार आहे. तसेच वाहकांचीही ड्युटीपूर्वी अल्कोटेस्ट तपासणी करून नोंद ठेवणे आवश्यक राहणार आहे. या प्रक्रियेवर सहाय्यक कार्यशाळा अधीक्षक, सहाय्यक वाहतूक अधीक्षक, वाहतूक निरीक्षक, सहाय्यक वाहतूक निरीक्षक व वाहतूक नियंत्रक यांनी देखरेख ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

याशिवाय बस मार्गावर असताना चालकाने नियंत्रण कक्षात लॉगबुकची नोंद करणे बंधनकारक **(पान ४ वर)**

# जबरदस्तीने धर्मांतर करणाऱ्याला ७ वर्षांची शिक्षा

## ५ लाखांचा दंड: धर्मांतरविरोधी कायद्याच्या प्रस्तावाला मंत्रीमंडळाची मंजुरी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**मुंबई :** जबरदस्तीने धर्मांतर करणाऱ्याला आता ७ वर्षांची कैद होणार आहे तसेच ५ लाख रुपयांपर्यंत दंडाची शिक्षा देखील होणार आहे. धर्मांतरविरोधी कायद्याच्या प्रस्तावाला राज्य मंत्रिमंडळानं मंजुरी दिली आहे. 'महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य अधिनियम २०२६' या नव्या कायद्याच्या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशनात या कायद्याचे विधेयक विधानसभेत आणि विधान परिषदेत मंजुरीसाठी मांडले जाणार आहे.

महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य अधिनियम २०२६ या नव्या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशनात या कायद्याचे विधेयक विधानसभेत आणि विधान परिषदेत मंजुरीसाठी मांडले जाणार आहे. दोन्ही सभागृहांची मंजुरी मिळाल्यानंतर विधेयक राष्ट्रपतींकडे मान्यतेसाठी पाठवले जाणार आहे. राष्ट्रपतींची मंजुरी मिळाल्यानंतर हा कायदा राज्यात लागू होणार आहे.

या कायद्यात कलम १४ मध्ये बेकायदेशीर धर्मांतरासाठी दोषी आढळलेल्या संस्थांवर बंदी व दंडाची तरतूद करण्यात आली आहे. कलम ९ मध्ये गुन्हे व त्यासाठीच्या शिक्षांची तरतूद आह. कलम ९ मधील उपकलम (४) मध्ये दोषींना सात वर्षांची कारावासाची शिक्षा व पाच लाख रुपयांचा दंडाच्या शिक्षेची तरतुद आहे.



राज्यात जबरदस्तीने किंवा आमिष दाखवून केले जाणारे धर्मांतर रोखण्यासाठी हा कायदा आणल्याचं सरकारची भुमिका आहे. यासंदर्भातील कायद्यांचा अभ्यास करण्यासाठी व कायदेशीर बाबीचा अभ्यास करून कायद्याचा मसूदा तयार करण्यासाठी राज्य सरकारने विशेष समिती स्थापन केली होती. पोलीस महासंचालकांच्या अध्यक्षतेखाली १४ फेब्रुवारी २०२५ रोजी समिती स्थापन करण्यात आली होती.

# इ-चलान रद्दबाबत शासन सकारात्मक

**मुंबई :** राज्य सरकारने लावलेले इ-चलान रद्द करण्याबाबत शासन सकारात्मक भूमिका घेणार असल्याचे आश्वासन दिल्यानंतर राज्यातील विविध वाहतूकदार संघटनांनी पुकारलेला राज्यव्यापी संप मागे घेण्याचा निर्णय घेतला आहे, अशी माहिती राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

शासन वाहतूकदारांच्या विविध मागण्यांबाबत संवेदनशील असल्याचेही मंत्री सरनाईक यांनी स्पष्ट केले. अन्यायकारक पद्धतीने काढण्यात आलेल्या इ-चलानांबाबत शासन सकारात्मक निर्णय घेईल. तसेच या संदर्भातील समस्यांवर तोडगा काढण्यासाठी परिवहन विभाग, पोलीस प्रशासन आणि वाहतूकदार संघटनांचे प्रतिनिधी यांची संयुक्त बैठक लवकरच आयोजित करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

### वाहतूकदारांचा राज्यव्यापी संप मागे

मंत्री सरनाईक म्हणाले की, राज्यव्यापी वाहतूकदारांच्या संपाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करण्यात आली. तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे वाहतूकदार संघटनांच्या शिखर समिती महाराष्ट्र ट्रान्सपोर्ट ॲक्शन कमिटीच्या सदस्यांशी संवाद साधला. या वेळी वाहतूकदारांच्या विविध मागण्यांबाबत शासन सहानुभूतीपूर्वक विचार करीत असून संप मागे घ्यावा, असे आवाहन करण्यात आले. त्या आवाहनाला प्रतिसाद देत वाहतूकदार संघटनांनी राज्यव्यापी संप मागे घेण्याचा निर्णय घेतला. या आश्वासनानंतर वाहतूकदारांनी आंदोलन स्थगित करण्याचा निर्णय घेतल्याचेही सरनाईक यांनी नमूद केले.

# कर्जत तालुका दुधसंघ जागेच्या कायमस्वरुपी हस्तांतरणाला मंत्रीमंडळाची मान्यता



**दुध शीतकरण केंद्र जागेसह कायमस्वरुपी मालकी हक्काने देण्याची मागणी सन २०१८ मध्ये शासनाकडे करण्यात आली होती. एकूण मुल्यांकन १ कोटी २७ लाख १ हजार ९२५ रकमेस कर्जत दुधसंघ कायमस्वरुपी हस्तांतरीत करण्यासाठी अटी व शर्तीनुसार मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार संघाने आजमितीस तीन हप्त्यात ७६ लाख २१ हजार १५५ रक्कम अदा केली असून उर्वरित रक्कम दोन हप्त्यामध्ये भरणे शेष आहे.**

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर :** संगमनेर शहरालगत असणाऱ्या माझे घर सोसायटी घुलेवाडी शिवारातील अमृतवाहिनी नीडो इंटरनॅशनल स्कूल च्या पाठी मागील बाजूस असणाऱ्या निळवंडे डाव्या कालव्यामध्ये पाय घसरून पडलेला अथर्व राहुल बागड (वय ८) याला वाचवण्यासाठी गेलेल्या त्याच्या आत्या ज्योती प्रकाश आवारी (वय ४२) या आत्या भाच्याचा निळवंडे कालव्याच्या पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाला.

घुलेवाडी परिसरातील निडो इंटर नॅशनल स्कूलच्या पाठीमागील बाजूस असलेल्या निळवंडे कालव्या जवळ ज्योती आवारी कोमल बागड स्वरा बागड व अथर्व बागड हे सर्व जण कपडे धुण्यासाठी गेले होते. एकीकडे महिला कपडे धूत असताना अथर्व निळवंडे डाव्या कालव्याच्या दिशेने पुढे गेला अन् तो कालव्यात पडला हा आवाज ऐकून अथर्वची आत्या ज्योती आवारी यांनी क्षणाचाही विलंब न करता आपल्या भाच्याला वाचवण्यासाठी थेट कालव्यात उडी घेतली. मात्र कालव्यातील पाण्याची खोली आणि पाण्याच्या वेगाचा अंदाज न आल्याने दोघेही पाण्यात बुडाले. ज्योती यांची भावजय कोमल यांनी आरडाओरडा करताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. त्याचवेळी त्या ठिकाणी रुग्णवाहिका आली. रुग्णवाहिकेच्या चालकाने दोघांना बाहेर काढून वाचवण्याचा प्रयत्न केला.

दोघांना उपचारासाठी घुलेवाडी येथील ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले. मात्र उपचारापूर्वीच त्या दोघांचा ही मृत्यू झाला असल्याचे घुलेवाडी ग्रामीण रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी जाहीर केले. या बाबत विशाल भास्कर बागड यांनी शहर पोलिसात दिलेल्या खबरीवरून अकस्मात मृर्तीची नोंद करण्यात आली. या दोघांवर शोकाकुल वातावरणात होळीच्या दिवशीच अंतिम संस्कार करण्यात आले.

# राज्यावरील कर्जाचा बोजा ९.३२ लाख कोटींवर!

## आर्थिक सर्वेक्षण : दरडोई उत्पन्नात महाराष्ट्र पाचव्या स्थानी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**मुंबई :** महाराष्ट्राची अर्थव्यवस्था वेगाने वाढत असली तरी राज्याच्या तिजोरीवर कर्जाचा वाढता बोजाही स्पष्टपणे दिसत आहे. २०२५-२६ च्या आर्थिक पाहणी अहवालानुसार राज्याचा आर्थिक विकासदर ७.९ टक्के राहण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. सेवा, उद्योग आणि कृषी क्षेत्रातील वाढीमुळे राज्याच्या अर्थव्यवस्थेला गती मिळाल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे.

महाराष्ट्राचे स्थूल राज्य उत्पन्नही मोठ्या प्रमाणात वाढण्याची शक्यता आहे. २०२४-२५ या आर्थिक वर्षात राज्याचे स्थूल उत्पन्न ४६ लाख २२ हजार १३८ कोटी रुपये होते. त्यामध्ये वाढ होऊन चालू आर्थिक वर्षात ते सुमारे ५१ लाख ५९७ कोटी रुपयांपर्यंत पोहोचण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

आर्थिक पाहणी अहवालानुसार सेवा क्षेत्रात सुमारे ९ टक्के, उद्योग क्षेत्रात ५.७ टक्के आणि कृषी व संलग्न क्षेत्रात ३.४ टक्के वाढ अपेक्षित आहे. या तीन प्रमुख क्षेत्रांतील वाढीमुळे राज्याचा सरासरी विकासदर ७.९ टक्के राहण्याची शक्यता आहे. देशातील एकूण थेट परकीय गुंतवणुकीपैकी तब्बल ३१ टक्के गुंतवणूक महाराष्ट्रात येत असल्याने राज्याने गुंतवणूक आकर्षित करण्यात आपले अव्वल स्थान **(पान ४ वर)**

### अर्थसंकल्पात ४५ हजार कोटींची तूट

**अर्थसंकल्पीय अंदाजानुसार २०२५-२६ या वर्षात राज्याची महसुली जमा सुमारे ५ लाख ६० हजार ९६४ कोटी रुपये अपेक्षित आहे. मात्र लोकप्रिय योजना आणि इतर खर्चामुळे महसुली खर्च ६ लाख ६ हजार ८५५ कोटी रुपयांपर्यंत जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे सुमारे ४५ हजार कोटी रुपयांची महसुली तूट अपेक्षित असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे.**

## संपादकीय

# कर्जाचा डोंगर आणि विकासाची आकांक्षा

महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाची सुरुवात २३ फेब्रुवारीपासून झाली असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ६ मार्च रोजी राज्याचा अर्थसंकल्प सादर करणार आहेत. राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या अभिभाषणात 'सर्वसमावेशक, गतिमान आणि आत्मनिर्भर महाराष्ट्र' उभारण्याचा निर्धार व्यक्त झाला असून, 'विकसित महाराष्ट्र २०४७'चा संकल्प नव्याने अधोरेखित करण्यात आला आहे. दावोस येथील गुंतवणुकीच्या प्रयत्नांमुळे वन ट्रिलियन डॉलर इकॉनॉमीच्या दिशेने बूस्टर मिळाला असला, तरी राज्यावरील कर्जाचा वाढता डोंगर हा गंभीर चिंतेचा विषय ठरला आहे. अर्थसंकल्प सादर करताना महसुली जमा, खर्च आणि कर्ज यांचा ताळेबंद मांडणे हे सर्वांत मोठे आव्हान असेल.

महाराष्ट्राची आर्थिक पाहणी अहवाल नुसार, २०२५-२६ या आर्थिक वर्षात राज्याचा विकास दर ७.९ टक्के राहण्याचा अंदाज आहे, जो मागील वर्षाच्या ७.३ टक्क्यांपेक्षा सुधारणा दर्शवतो. नाममात्र सकल राज्य उत्पादन ५१ लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे. सेवा क्षेत्र ९ टक्के, उद्योग क्षेत्र ५.७ टक्के आणि कृषी व संलग्न क्षेत्र ३.४ टक्के वाढ दाखवण्याचा अंदाज आहे. राज्य देशातील सर्वात मोठी अर्थव्यवस्था राहिली असून, जीएसटी संकलन, एफडीआय आणि स्टार्टअप्समध्ये आघाडीवर आहे. मात्र, ही प्रगती कर्जाच्या वाढत्या ओझ्याच्या सावटाखाली आहे.मागील वर्षांच्या अर्थसंकल्पांनुसार, राज्यावरील कर्जाचा बोजा सातत्याने वाढत आहे. २०२०-२१ मध्ये ५ लाख १९ हजार कोटी, २०२१-२२ मध्ये ५ लाख ७६ हजार कोटी, २०२२-२३ मध्ये ६ लाख २९ हजार कोटी, २०२३-२४ मध्ये ७ लाख ११ हजार कोटी, २०२४-२५ मध्ये ८ लाख ३९ हजार कोटी आणि २०२५-२६ मध्ये ९ लाख ३२ हजार कोटी रुपयांपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे. आर्थिक पाहणी अहवालानुसार, हे कर्ज नाममात्र सकल राज्य उत्पादनाच्या १८.३ टक्के इतके असेल, जे केंद्र आणि रिझर्व्ह बँकेच्या २५ टक्के मर्यादेच्या आत आहे. तरीही, कर्ज वाढण्याचा वेग चिंताजनक आहे. मागील अर्थसंकल्पात ७ लाख ८२ हजार कोटींचा अंदाज असताना प्रत्यक्षात ८ लाख ३९ हजार कोटींवर गेला. निवडणूक वर्षात योजनांसाठी कर्ज काढल्याने हा बोजा वाढला.

हसुली तूट ही आणखी एक समस्या आहे. मागील अर्थसंकल्पात महसुली जमा ५ लाख ६० हजार ९६४ कोटी आणि खर्च ६ लाख ६ हजार ८५५ कोटी इतका होता, म्हणजे ४५ हजार ८९१ कोटींची महसुली तूट. २०२५-२६ साठी ही तूट ०.९ टक्के नाममात्र सकल राज्य उत्पादन इतकी (४५ हजार ८९१ कोटी) राहण्याचा अंदाज आहे, तर एकूण तूट २.७ टक्के नाममात्र सकल राज्य उत्पादन इतकी (१ लाख ३६ हजार कोटी) अपेक्षित आहे. हे आकडे मर्यादेत असले तरी, महसुली तूट नियंत्रणात ठेवणे गरजेचे आहे. व्याज भरण्यासाठीच ६४ हजार ६५९ कोटींची तरतूद अपेक्षित आहे, ज्यामुळे विकासासाठी उपलब्ध निधी मर्यादित होतो.भांडवली खर्चात केवळ ११ टक्के वाढ प्रस्तावित असल्याने विकासकामांवर दोन टक्के घट होण्याची शक्यता आहे. केंद्राने भांडवली खर्च वाढवला असताना महाराष्ट्रानेही पायाभूत सुविधा, मालमत्ता वाढीवर भर द्यावा, अशी सूचना पंतप्रधानांनी केली आहे. मात्र, पुरेसा निधी नसल्याने खासगीकरणाचा पर्याय स्वीकारावा लागतो. ठेकेदारांची थकबाकी वाढणे, प्रकल्प विलंबित होणे आणि खर्च दुप्पट-तिप्पट होणे ही समस्या कायम आहे. अनेकदा तरतुदी केल्या तरी निधी पूर्ण खर्च होत नाही, ज्यामुळे जनतेच्या पैशांचा अपव्यय होतो. राज्यावर कर्जाचा डोंगर वाढत असताना विकासकामांना प्राधान्य देणे आवश्यक आहे. प्रशासनिक आणि अनुत्पादक खर्च कमी करणे, महसुली जमा वाढवणे (कर संकलन, गैरकर उत्पन्न) आणि अनावश्यक खर्चावर नियंत्रण आणणे हे उपाय महत्त्वाचे आहेत. ऋण काढून सण साजरे करणे सोपे असते, परंतु त्यातून मुक्त होणे कठीण. महाराष्ट्र देशाचा आर्थिक आधार आहे; त्यामुळे स्वयंपूर्णता मजबूत करणे आणि भविष्यात इतरांना कर्ज देण्याची क्षमता वाढवणे गरजेचे आहे. आर्थिक सर्वेक्षणातील माहितीचा विधायक उपयोग होणे अपेक्षित आहे. मागील वर्षी अपेक्षित विकास दर गाठता आला नाही, याचा विचार अर्थसंकल्पात होणे आवश्यक आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांच्यापुढे कर्ज कमी करण्याचे धोरण, विकासकामांना गती देणे आणि आत्मनिर्भर महाराष्ट्र उभारणे हे दुहेरी आव्हान आहे. कर्ज नियंत्रणात ठेवून गुंतवणूक आकर्षित करणे, सेवा-उद्योग क्षेत्रातील वाढ टिकवणे आणि कृषी क्षेत्राला बळकटी देणे यावर भर देणे गरजेचे आहे. जनतेच्या पैशांचा सदुपयोग करून 'विकसित महाराष्ट्र २०४७'ची स्वप्ने साकार करण्यासाठी कठोर आर्थिक शिस्त आणि दूरदृष्टीची आवश्यकता आहे. हा अर्थसंकल्प फक्त आकडेवारीचा दस्तऐवज नसून, राज्याच्या भविष्याचा आराखडा ठरावा.

# डोल लाभार्थ्यांना पूर्वीप्रमाणे ऑफलाइन अनुदान द्यावे : आ. विठ्ठल लंघे

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** केंद्र व राज्य शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या श्रावणबाळ, संजय गांधी निराधार, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ, इंदिरा गांधी राष्ट्रीय पेन्शन तसेच इंदिरा गांधी दिव्यांग पेन्शन योजनांतील पात्र लाभार्थ्यांना दिले जाणारे अनुदान सध्या तांत्रिक अडचणींमुळे रखडत असल्याचा मुद्दा आमदार विठ्ठलराव लंघे यांनी विधानसभेत लक्षवेधीद्वारे उपस्थित केला. डीबीटी प्रणालीतील त्रुटी तातडीने दूर होईपर्यंत पात्र लाभार्थ्यांना पूर्वीप्रमाणे ऑफलाइन पद्धतीने अनुदान वितरित करावे, अशी ठाम मागणी त्यांनी शासनाकडे केली.

> वृद्धापकाळामुळे अंगठ्याचे ठसे उमटत नाहीत, आधार अपूर्ण असतो किंवा मोबाईल क्रमांक लिंक नसल्याने केवायसी पूर्ण होत नाही. या अडचणी लक्षात घेऊन तांत्रिक त्रुटी दूर होईपर्यंत लाभार्थ्यांना पूर्वीप्रमाणे ऑफलाइन अनुदान द्यावे.
> **आ. विठ्ठलराव लंघे.**



पूर्वी या योजनांचे अनुदान ऑफलाइन पद्धतीने दिले जात होते. मात्र गेल्या दोन वर्षांपासून शासनाने डीबीटी प्रणालीद्वारे लाभार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात थेट रक्कम जमा करण्याची पद्धत सुरू केली आहे. परंतु एस ए एस महा डीबीटी पोर्टलवरील तांत्रिक अडचणींमुळे अनेक लाभार्थी अनुदानापासून वंचित राहत असल्याचे आमदार लंघे यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले.

विधानसभेत बोलताना त्यांनी सांगितले की, या योजनांतील अनेक लाभार्थ्यांना डिसेंबर २०२४ पासून अनुदान मिळालेले नाही. शासनाने पूर्वीचे १५०० रुपयांचे अनुदान वाढवून २५०० रुपये केल्याचे स्वागत असले तरी पोर्टलवरील नोंदणी व केवायसी प्रक्रियेत अडथळे येत असल्याने अनेकांना वाढीव अनुदानाचा लाभही मिळत नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.विशेषतः इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ योजनेतील ७० ते ८० वर्षांवरील लाभार्थ्यांना केवायसी प्रक्रियेत मोठ्या अडचणी येत आहेत. वृद्धापकाळामुळे अंगठ्याचे ठसे उमटत नाहीत, आधार अपूर्ण किंवा रद्द झालेला असतो, तसेच मोबाईल क्रमांक लिंक नसल्याने केवायसी पूर्ण होत नाही. त्यामुळे अनेकांना डिसेंबर २०२४ पासून अनुदान न मिळाल्याने उपासमारीची वेळ येत असल्याची गंभीर बाब त्यांनी सभागृहासमोर मांडली.

# शिवरायांच्या पुतळा विटंबना प्रकरणी आज आंदोलन

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** शहरातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याची मागील वर्षी झालेल्या विटंबना प्रकरणातील आरोपींना अद्याप अटक न झाल्याने शिवप्रेमींनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. या पार्श्वभूमीवर दि. ६ मार्च रोजी राहुरी शहरात शिवप्रेमींच्या वतीने आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी उपसभापती साहेबराव म्हसे यांनी दिली आहे. आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहनही त्यांनी केले.

२६ मार्च २०२५ रोजी राहुरी शहरातील बुवा सिंध बाबा परिसरात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला काळे फासून विटंबना करण्यात आली होती. या घटनेनंतर शिवप्रेमींनी शांततेच्या मार्गाने शहर बंद ठेवून निषेध नोंदवला होता. त्यावेळी पोलिस प्रशासनाने आरोपींचा शोध लावण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, जवळपास वर्ष उलटूनही अद्याप कोणालाही अटक करण्यात आलेली नाही, अशी खंत शिवप्रेमींनी व्यक्त केली आहे. दरम्यान, साहेबराव पाटीलबा म्हसे यांनी दि. १९ फेब्रुवारी २०२६ रोजी तहसीलदार डॉ. अमित पवार यांना निवेदन देत या प्रकरणाचा सखोल तपास करून आरोपींना तात्काळ अटक करण्याची मागणी केली होती. दि. ६ मार्च रोजी छत्रपती शिवाजी महाराजांची तिथीनुसार जयंती साजरी होत असल्याने त्यापूर्वी आरोपींना अटक न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे. त्यानुसार शनी चौक, राहुरी येथे सकाळी १० वाजता सर्व शिवभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# जिल्हा क्रीडा विभागाच्या नूतन व्यायामशाळेचे उद्घाटन

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

टाकळीभान : येथे जिल्हा क्रीडा विभागाच्या माध्यमातुन ७ लक्ष रुपये निधीच्या नुतन व्यायामशाळेचा उद्घाटन सोहळा पार पडला.जिल्हा क्रिडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे यांच्या हस्ते हा उद्घाटन समारंभ पार पडला.यावेळी व्यासपीठावर योगेश हजारे,अस्लम इनामदार, शिवम पटारे,सरपंच अर्चना रणनवरे,उपसरपंच कान्हा खंडागळे, किरण धुमाळ,दिलीपराव लोखंडे,बापुसाहेब नवले,अर्जुन राऊत,मयुर गव्हाणे आदी प्रमुख मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते व्यायामशाळेचे उद्घाटन पार पडल्यानंतर झालेल्या कार्यक्रमात बोलताना खुरंगे म्हणाले की,मोबाईल,टिव्ही आणि समाजमाध्यमांमुळे मुलांचे आरोग्य धोक्यात आले आहे.मैदानावर व व्यायामशाळेत मुलांची संख्या कमी झाली आहे.त्यामुळे नविन झालेल्या व्यायामशाळेत गावातील प्रत्येक तरुणाने येऊन आपले शरीर व आरोग्य घडवले पाहीजे.टाकळीभान गावाने कबड्डीची परंपरा अनेक वर्षांपासुन जपली आहे.येथुन घडलेले अस्लम ईनामदार व शिवम पटारे हे जिल्ह्यासह राज्याचा नावलौकीक वाढवत असल्याचे ते म्हणाले.यानंतर बापुसाहेब नवले यांनी मनोगत व्यक्त केले.

# कांदापिकाला हमीभाव द्या, निर्यात धोरणात स्थैर्य आणा : आ खताळ

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर :** मागील दोन वर्षांपासून सतत तोट्याच्या विळख्यात सापडलेल्या कांदा उत्पादक शेतकऱ्यांचा ज्वलंत प्रश्नावर आमदार अमोल खताळ यांनी मुंबई येथे सुरू असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात आवाज उठवत या प्रश्नाकडे सभागृहाचे लक्ष वेधले. वाढता उत्पादन खर्च आणि घसरते बाजारभाव यामुळे शेतकरी हवालदिल झाला असून, परिस्थिती दिवसेंदिवस बिकट होत आहे त्यामुळे सरकारने कांद्याला हमीभाव द्यावा आणि निर्यात धोरणात स्थैर्य आणावे अशी जोरदार मागणी विधिमंडळात करत सरकारचे लक्ष वेधले आ. खताळ म्हणाले की, एकरी कांदा उत्पादनासाठी सुमारे १ लाख रुपयांहून अधिक खर्च होत असताना बाजारात केवळ ८ ते १० रुपये प्रति किलो दर मिळत आहे. एवढा प्रचंड खर्च करूनही उत्पादनातून साधा खर्चही वसूल होत नसल्याने शेतकऱ्यांच्या कष्टाचे मोल शून्य ठरत आहे. खत, बियाणे, मजुरी, औषधे, पाणी आणि वाहतूक या सर्व बाबींमध्ये वाढलेला खर्च लक्षात घेतला तर शेतकरी अक्षरशः कर्जाच्या खाईत ढकलला जात आहे, अशी गंभीर बाब आहे. केवळ आश्वासनांनी प्रश्न सुटणार नाही; ठोस आणि तात्काळ निर्णय घेणे गरजेचे आहे, असेही त्यांनी अधोरेखित केले.



# नाऊर येथे शेतकरी संघटनेची पहिली महिला शाखा स्थापन

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**टाकळीभान :** श्रीरामपूर तालुक्यातील नाऊर येथे शेतकरी संघटनेची पहिली महिला शाखा स्थापन करण्यात आली. शेतकरी संघटनेचे राज्य उपाध्यक्ष ॲड. अजित काळे व भावना काळे यांच्या हस्ते फलकाचे अनावरण करून शाखेचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नेते गोपीनाथ शिंदे होते.

यावेळी बोलताना ॲड. अजित काळे यांनी महिलांच्या सहभागाचे महत्त्व अधोरेखित केले. पुरुष अनेक प्रश्न सोडवित असले तरी निवडणुकांच्या काळात विविध पक्षांमध्ये विभागले जातात; मात्र महिला शेतीसह घराची जबाबदारी समर्थपणे सांभाळतात. त्यामुळे महिलांनी संघटनेत सक्रिय सहभाग घेतला तर शेतीचे प्रश्न अधिक प्रभावीपणे मांडले जाऊ शकतात आणि शासनालाही त्याची दखल घ्यावी लागेल, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमास नाऊरच्या माजी सरपंच नंदा सुनील आहेर, महिला शाखाध्यक्ष अनिता शिंदे, शितल गव्हाणे, पद्मावती शिंदे, प्रतिभा शिंदे, जिजाबाई शिंदे, गीता शिंदे, नीता शिंदे, वैशाली शिंदे, रोहिणी दरेकर आदी महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. तसेच प्रा. कार्लस साठे, शरद आसने, बंडोपंत चौगुले, साहेबराव चोरमल, सोपानराव येळे, सचिन भाऊ वेताळ, बापूसाहेब गोरे, सागर गिऱ्हे, सुजित बोडखे, खंडेराव सरोदे, शिवाजी पटारे, भास्कर तुवर यांच्यासह शेतकरी संघटनेचे पदाधिकारी व शेतकरी उपस्थित होते.



# ग्रामीण मातीतून सैनिकी स्वप्नांकडे झेप

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**प्रवरानगर :** येथील जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांनी सैनिकी शाळा प्रवेश परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत शाळेचा आणि गावाचा नावलौकिक वाढवला आहे. जिद्द, कठोर परिश्रम, नियमित अभ्यास आणि शिक्षकांच्या योग्य मार्गदर्शनाच्या जोरावर विद्यार्थ्यांनी हे यश मिळवत सैनिक स्कूल साठी पात्रता मिळवली आहे. यंदाच्या ऑल इंडिया सैनिकी शाळा प्रवेश परीक्षेत शाळेतील आदर्श उनवणे, मनिष कानडे, अनुराग डोंगरे, पवन गोरे, अथर्व गोल्हार व आदित्य वाघमारे हे सहा विद्यार्थी सैनिक स्कूल साठी पात्र ठरले आहेत. ग्रामीण भागातील मर्यादित साधन सामग्री असूनही विद्यार्थ्यांनी स्पर्धात्मक परीक्षेत उत्तीर्ण होऊन आपल्या जिद्दीचा व गुणवत्तेचा प्रत्यय दिला आहे, त्यांच्या यशाबद्दल तालुक्यात सर्वत्र कौतुक होत आहे. या सर्व विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक नामदेव फटांगरे तसेच मनिषा गावडे, मनिषा सपकाळे व महादेव कानडे या शिक्षकांचे मार्गदर्शन मोलाचे ठरले. विशेषतः परीक्षेची पूर्वतयारी करून घेण्यासाठी शिक्षकांनी १५ मे पासून वर्षभर सुट्टी न घेता सातत्याने भरपूर सराव चाचण्या, अतिरिक्त वर्ग घेऊन, क्युआर कोड - गुणवत्ता उपक्रम राबवून आणि वैयक्तिक मार्गदर्शन करून विविध स्पर्धा परीक्षांची तयारी करून घेतली आहे, यामुळे विद्यार्थ्यांनी हे यश मिळवले आहे. शाळेच्या या यशाबद्दल जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांनी विशेष अभिनंदन करत पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. विशेष म्हणजे जि. प. मार्फत राबविला जाणाऱ्या 'मिशन आरंभ' या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांसाठी होणाऱ्या नियमित सराव परीक्षांमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढविण्यास मोठी मदत झाली.



# निळवंडे उजव्या कालव्याच्या चाऱ्यांचे काम प्रगतीपथावर; शेतकऱ्यांत समाधान

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**झरेकाठी :** अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या निळवंडे धरणाच्या उजव्या कालव्याशी संबंधित चाऱ्यांच्या कामांना आता गती मिळाली असून राहुरीपासून अकोलेपर्यंत विविध भागांत कामे वेगाने सुरू आहेत. ज्या भागांपर्यंत कालव्याचे पाणी पोहोचत नव्हते, त्या भागांनाही या प्रकल्पाचा लाभ मिळावा यासाठी जलसंपदा विभागाकडून नियोजनबद्ध काम सुरू असल्याची माहिती ग्रामस्थांनी दिली. संगमनेर तालुक्यातील खळी गाव परिसरात सुमारे २६ किलोमीटर लांबीच्या चाऱ्यांचे काम सध्या जोरात सुरू आहे. या ठिकाणी आधुनिक इस्राईल तंत्रज्ञानाच्या सहाय्याने भूमिगत चाऱ्यांची उभारणी करण्यात येत आहे. त्यामुळे भविष्यात शेतकऱ्यांना थेट शेताच्या बांधावर पाण्याचा लाभ मिळणार असल्याने शेतकरी वर्गात समाधान व्यक्त होत आहे.

शासनाच्या नियोजनानुसार पुढील एक ते दीड वर्षांत या प्रकल्पातून शेतीसाठी मुबलक पाणी उपलब्ध होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. या कामांसाठी प्रयत्न करणाऱ्या राज्याचे जलसंपदा मंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांचे ग्रामस्थांनी आभार मानले.

दरम्यान, खळी येथे सुरू असलेल्या कामांची पाहणी करताना सुरेशराव नागरे, सरपंच विलास वाघमारे, सचिन आव्हाड, हौशीराम नागरे, गोरख घुगे, ज्ञानदेव मुंढे, भास्कर मुंढे, अण्णा कांगणे, रमेश सानप, बाळासाहेब वाघमारे आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

# संत तुकाराम महाराजांचा बिजोत्सव साजरा

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** तालुक्यातील गोणेगाव चौफुला येथील श्री विठ्ठल रुख्मिणी आध्यात्मिक केंद्र संचलित रामकृष्ण आश्रमामध्ये श्री संत तुकाराम महाराज यांच्या बिजोत्सवाच्या निमित्ताने आयोजित गाथा पारायण व अखंड हरिनाम सप्ताह सोहळयाची सांगता आश्रमाचे प्रमुख महंत वेदमूर्ती हभप भगवान महाराज जंगले शास्त्री यांच्या काल्याच्या किर्तनाने करण्यात आली.यावेळी ''तुकाराम तुकाराम''चा नामघोष करत पुष्पवृष्टी करून संत तुकोबारायांचा बिजोत्सव साजरा करण्यात आला.

यावेळी झालेल्या काल्याच्या कीर्तनात बोलतांना हभप भगवान महाराज जंगले शास्त्री म्हणाले की जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराजांनी जगाच्या उद्धारासाठी गाथा ग्रंथाची निर्मिती केली,आज त्यांचा बिजोत्सव संपूर्ण भारतासह विदेशात जेथे वारकरी संप्रदायाचे अनुयायी आहे तेथे साजरा केला जातो ही तुकोबांच्या विषयी असलेली आस्था असल्याचे त्यांनी सांगितले.तुकाराम तुकारामचा नामघोष करत पुष्पवृष्टी करून बिजोत्सव साजरा करण्यात आलयावेळी झालेल्या काल्याच्या किर्तन प्रसंगी भगवान श्रीकृष्ण परमात्म्याच्या बाललीलांचे वर्णन त्यांनी केले.काल्याची दहीहंडी फोडून तुकाराम बिजोत्सव निमित्ताने आठ दिवस आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता करण्यात आली. उपस्थित भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.यावेळी आश्रमाचे सेवेकरी आळंदी येथील मगर बाबा,सुखद महाराज जाधव,निलेश महाराज रोडे,नामदेव महाराज कंक,विजय महाराज पवार,गणेश महाराज दरंदले,बदाम महाराज पठाडे,शंकर महाराज तनपुरे, वारकरी संप्रदायातील टाळकरी,गायक,वादक, संतसेवेकरी पंचक्रोशीतील भाविक मोठया संख्येने उपस्थित होते





**रमजानुल मुबारक २०२६**
**रोजा नंबर १५**

# परलौकिक जीवन जिंदगी लंबी नहीं : बडी होंनीं चाहिये ...!!

(१) दिव्य कुरआन म्हणतो , !! ''ईस मिट्टी से हमने तुम्हें पैदा किया , और , ईसी मिट्टी में हम तुम्हे लौटाऐंगैं , और , ईसी मिट्टी से तुम्हें दुबारा उठायंगे !'. अर्थात:-'' आम्ही तुम्हाला याच मातीतुन जन्म दिला , आणि , याच मातीत तुम्हाला दफन (मृत्यू) करून मिसळू , आणि , पुन्हा याच मातीतून दुसऱ्यांदा पुनर्जन्म देवू ( प्रलयकाळ - कायमत चा दिवस ).'' (२). मनुष्य हा विचार करतो की, काय? मी मरण पावल्यानंतर , मला पुन्हा जिवंत करून उठवलं जाईल?? ( सुरहा नं. १९ अल -मरियम आ नं. ६६ ). पुन्हा, दिव्य कुरआन म्हणते, '' मनुष्याला हीं साधी गोष्ट हीं आठवत नाहीं, की, आम्ही त्याला या आधी हीं जन्माला घातलं आहेत, जेव्हा तो कधीच नव्हता?? सु. नं १९ अल -मारियम आ नं. ६७) (३),दिव्य कुरआन म्हणतो,'' तोच तर आहे,जो तुमच्या मातेच्या गर्भाशयात तुमचे हवे तसे रुप घडवितो,त्या जबरदस्त बुध्दिमाननाशिवाय इतर कोणी ही अल्लाह (ईश्वर) नाही.'' (सुराह अल -ईमरान ). जगात प्रत्येकाला अल्लाह (ईश्वरा) ने काही तरी चांगल्या कामासाठीच जन्म दिला आहे, प्रत्येक मनुष्य - प्राणी -पक्षी -कीटक - जीव जंतू हा चांगल्या कामासाठीच जन्म झाला आहे. प्रत्येक जीव हा फार महत्वाचा घटक ( व्ही. आय. पी. प्रतेक जन ) अवश्यक आहे. कोणीही बेकार जन्माला आला नाहीत, प्रत्येकाचं काम जबाबदारीच संपूर्णपणे वेग-वेगळ्या प्रकारचे आहेत. प्रत्येक जीव एकमेकांसाठी खास आहेत , वेगळा असूच शकत नाहीत. प्रत्येकांना एकमेकांची गरज असते. परंतु हें मनुष्य समजत नाही. तो स्वतःच्याच मस्तित वावरत असतो. मी -मीच - माझं -माझ्याच माझ्या करीताच विचार करत असतो, रुपावर -तारुण्यांवर - जवानीवर - दौलतीवर - स्वतः च्या पैशाच्या जोरावर घमेंड करतो. त्याच घमेंडी वर इतर लोकांना त्रास देत असतो . शेखी मिरवत इतरत फुशारक्या मारत असतो. या सर्व गोष्टींमुळे तो वेगवेगळ्या वाईट सवयी स्वतः ला लावून घेत असतो . स्टेटस सिम्बॉल म्हणून दुसऱ्यांना हिनवत दुसऱ्यांना तुच्छतेने पाहात असतो. त्या घुंधित वारंवार चुकाच करीत असतो, त्याला हे समजत नसते की हे सर्व एका दिवशी संपणार आहेत . हे सर्व मान्य अंतिम सत्य आहे हे कोणीही टाळू व नाकारु शकत नाही. हा जन्म -मृत्यूचा फेरा आहेत, कुणालाही चुकणारा नाहीत. सत्य व असत्य, सन्मार्ग व वाममार्ग, न्याय, अन्याय, पाप व पुण्य, सदाचार व दुराचार, ईश्वराचे आज्ञापालन व अवज्ञा हें सम समान असूच शकत नाहीं, हें वेगवेगळे आहेत, सत्कार्माचा चांगला आणि दुशकर्मा चा वाईट परिणाम हा असलाच पाहिजे. आपण कधी कधी असें हीं पाहतो की, सत्कार्मा करणाऱ्याला पुरस्कार व दुष्कार्म करणाऱ्याला शिक्षा मिळेलच असं कधी पाहवयास भेटत नाहीं, कधी आपण असें हीं बघतोय की, सन्मार्गी सदाचारी लोकं संकट आणि त्रास हाल अपेष्टा सहन करून जीवन जगतात तर आईश करणारे, वाममार्ग, चैन, चोरी चपाटे करणारे मज्जा करतात, ऐश आरामात थाठात राहतात. मनुष्याचा अंतरात्मा निषपेक्ष न्यायाची अपेक्षा करतो. दुष्ट आत्याचारी, दुष्ट प्रवृत्ती, दुराचारी, भ्रस्टाचारी, लोकांना मानवतेवर अन्याय केला म्हणून कठोर शिक्षा व्हावी. जें लोकं सदाचारी राहिलेत कोणत्याही प्रलोभानां कधीच बळी नं पडता कायम आहेत त्या परिस्थिती मध्ये हीं मानवतेची निस्वार्थी पणे सेवाच केली, लोकांचे दुःख दूर करण्यासाठी आपलं संपूर्ण जीवन घालवले अशा सदाचारी लोकांना त्यांच्या सत्कार्माचा चांगला मोबदला मिळावा. ह प्रत्येक सदाचारी व्यक्तीची अपेक्षा असतं. परंतु जगात असं घडताना दिसत नाहीं. असं बघून विचार येतो की, येवढ करून आपल्याला काय फळं भेटलीस, हीं अंधेर नगरीं आहेत, हीं सृष्टी अन्यायीनां बळ देते वगैरे. आणि हें सर्व आपला सृष्टीचा निर्मिक निर्माता ईश्वर परमेश्वर त्यांना मोकळीक देतोय आणि उघड्या डोळयांनी सर्व पाहतोय. परंतु हें सर्व खोटं ाहेत. विश्वाचा निर्माता त्यांना सूट मोकळीक देऊन त्यांच्या कर्माची परीक्षा घेत असतोस . व्यक्तीच्या विवेक बुद्धीची हीं परीक्षा आहे की संपूर्ण स्वातंत्र्य व अपार क्षमता मिळाल्यावर तो कोणता कसा मार्ग निवडतो हें निर्माण कर्त्याला पाहायचं असतं. तो त्याचा कसा वापर करतो. तो सत्कार्म क दुष्कर्म करतोय हें तो पाहतोय. आणि त्याच साठी त्याला ढील - सूट दिलेली असते. जग हें प्रत्येक मानवाचं परीक्षा स्थळ असल्यानें येथे पुर्ण न्याय होऊ शकत नाहीत, संपूर्ण न्याय परीक्षा काळ संपल्यावर च होणार, याचाच अर्थ मृत्यू नंतर मानवास पुन्हा जीवतं करण्यात येईल व त्याच्या संपूर्ण प्रत्येक कर्मा चा हिशोब घेतलाच जाईल. परलौकिक जीवणा च्या धारणे शिवाय संपूर्ण न्यायनिवडया शिवाय हें विश्व चा न्याय हें अपूर्ण. दिव्य कुरआन म्हणते, '' निच्छितच आम्ही मेलेल्याना जिवंत करू आणि आम्ही त्यांच्या कर्माचा हिशोब, ( रेकॉर्ड ) तयार करीत असतो , जी कर्मे ते पुढे पाठवतात आणि जी आपल्या मागे सोडतात. एका स्पष्ट ग्रंथात प्रत्येक गोष्टीची आम्ही नोंद केलेली आहे. ( सुरहा नं. ३६, यासीन आ नं. १२).परमेश्वर अल्लाह नें न्यायनिवडया साठी एक वेळ निच्छित केलेली आहेत, ईश्वराने मनावासाठी या जगात जी कालमर्यादा ठरवलेली आहेत ती समाप्त जगाचा शेवट होणार आहे. सूर्य, चंद्र, तारे, नक्षत्रे हें सर्व निखळून पडतील, आकाश गुंडाळलं जाईल, सागरांना आग लागेल, पिंजलेल्या कापसा प्रमाणे पर्वत हवेत तारगले जातील, पृथ्वी आपल्या पोटातील सर्व रहश्य ओकून टाकेल, प्रचंड मोठा आवाज होऊन पृथ्वी सपाट मैदान होईल. तोच दिवस'' कायमत'' चा अर्थातच महाप्रलंयाचा असेल. तोच दिवस मोबदल्याचा असेल. तो कधी येणार हें फक्त परमेश्वर - अल्लाहलाच ठाऊक माहित. परंतु तो दिवस येणारच हें निश्चित.महाप्रलंय ( कायमत ) च्या न्यायनिवडया च्या दिवस अल्लाह ( ईश्वर ) न्यायालय प्रस्थापित करून सृष्टीच्या जन्मापासूनच्या अंता पर्यतच्या जें जें मनावानी जन्म घेतलं त्या सर्वाना आपल्या मुळरूपात पुनर्जन्म देऊन - जीवित करून आपल्या न्यायालयात हजर करून सृष्टीच्या प्रत्येक मानवाचा जीवसृष्टीचा जीव जंतू ला उभा करून प्रत्येकाला त्यांनी केलेल्या चांगल्या वाईट कर्माचा हिशोब विचारेल, त्यानंतर तुमचे परलौकिक जीवन कसे असेल हें ठरवलं जाईल. ते परलौकिक जीवन अनंत काळ असेल.. ते कधीच नं संपणारे असेल. जगात केलेले कोणतेही कर्म सदाचार असो, की, दुराचार वाया जात नाहीं. प्रत्येक कर्म आपल्या सोबत मोबदला घेऊन येतो. सृष्टीचा निर्माता प्रत्येक कर्माची नोंद करीत असतो व आहे. आपल्या प्रत्येक कर्माची साक्ष आपलं इंद्रिय देतील, तेथे कनभर हीं अन्याय होणार नाहीं. तेथे फक्त एकट्याला उभं राहावं लागेल. तेथे प्रत्येकाला प्रत्येकाच्या स्वतःच्या कर्माचे पडेल कोणीच कोणाची मदत करणार नाहीत. स्वतःचे आई वडील सुद्धा काहीच मदत करू शकणार नाहीं. ज्याच्या सत्कार्माचे पारडे जड राहील त्यांना बक्षीस दिलं जाईल तो पुरस्कार म्हणजे अनंत काळ चिरंतर राहण्याची सोय ''जन्नत'' ( स्वर्ग ).त्यामध्ये चिरंतर सुख अनंत काळा पर्यंत राहील. ज्याच्या पारड्यात दुष्कर्म असेल त्यांना मग त्यांचे बक्षीस म्हणजे नरक ( दोजख ) सृष्टी मध्ये केलेल्या दुष्कार्म -दुराचार -भ्रस्टाचार,- वाईट कामं इत्यादी. त्यामध्ये अनंत काळात भडकत्या अग्नी मध्ये कायम जळत राहणं. मग त्यावेळी जागं होऊन काहीच फायदा होणार नाहीं.त्या दिवशी पास्तव्या शिवाय काहीच उरणार नहीं. दिव्य कुरआन म्हणतो की,'' तुमची सुंदरता - जवानीचा घमंड -पैशाची घमंड -तुमचं कर्तृत्व - तुमचं कौशल्य (हुनर) सर्व एका दिवशी संपणार आहेत रे, मग तो गर्विष्ठपणा (मी पणा) काय कामाचा ?, काय तुम्ही ऐकले नाहीत की ,प्रत्येक जीवाला एका दिवशी मृत्यू अटळ आहे म्हणून ( सुराह नं.२९ व आ.न.५७ ). तर जीवनात कायम चांगले काम करत राहणे, चांगल्या गोष्टी शिकणे, परोपकार करणं,आई-वडीलांचा आदर सन्मान करणे,त्यांचा सांभाळ व्यवस्थित करणं,आपल्या मुलांचं संगोपन व्यवस्थित करणं, खासकरून मुलीच्या संगोपन जेवढं चांगले संस्कार देता येईल तेवढे प्रयत्न करीत राहिले पाहिजे.व्यवहार चांगले करणं, विश्वासास पात्र राहणं, कोणाचाही विश्वासघात करु नयेत. जमीनीवर कलह निर्माण करू नयेत .शांततेने रहावे व एकदुसऱ्या बरोबर सदव्यवहार करावं. दुराचार माजू नयेत, अतिरेक तर कधीच करु नयेत . दिव्य कुर आन म्हणते, '' एक दिवस तुम्हाला आमच्याकडे कायम वास्तव्यासाठी येणंच आहे,तर मग येवढं घमंड (गुरुर) काय कामाचं?''. ''आम्ही तुम्हाला याच मातीत मिसळणार आहेत '', आणि '' याच मातीतून पुन्हा जन्म देऊन उठवणार आहोत.'' मृत्यू हे कोणत्याही जीवजंतू व मानवी जीवनातील अंतिम सत्य आहे , पवित्र कुरआन म्हणतो ,'' हर जाणदार चिज को मौत का मजा चखना है ...'' म्हणजेच प्रत्येक वस्तू ही नाशवंत आहे, कधी ना कधी तरी मातीत मिसळणार आहेत. तर मग मनुष्य फार वर्ष जगण्यापेक्षा कसा जगला याला किंमत आहे.

म्हणतात ना , जिंदगी लंबी नहीं बडी होनी चाहिए.
(क्रमशः)



डॉ. सलीम शेख
बैतुशशिफा मल्टिस्पेशालिटी दवाखाना.
श्रीरामपूर, जि. अहमदनगर
मो. ९२७१६४००१४

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

# जामखेडला अतिक्रमण मुद्दा पेटला, हद्द निश्चित करा

## आजपासून जामखेड शहर राहणार बेमुदत बंद



राष्ट्रीय महामार्ग विभागाचे कार्यकारी अभियंता चेमटे यांनी ५ मार्च २०२६ पर्यंत महामार्गाची हद्द निश्चित करण्याचे लेखी दिले होते परंतु हद्द निश्चितीची कोणतीही प्रक्रिया न झाल्यामुळे राष्ट्रीय महामार्गाचे कार्यकारी अभियंता चेमटे यांनी व संबंधित वरिष्ठ अधिकारी हद्द निश्चित करत नाही तोपर्यंत शुक्रवार दि. ५ मार्च २०२६ रोजी पासून सर्वपक्षीय व सर्वसामाजिक संघटना यांच्या वतीने बेमुदत बंद पुकारला आहे तरी सर्व व्यापारी व ग्रामस्थांनी शहर विकासासाठी सहकार्य करावे असे आव्हान आंदोलकांकडून करण्यात आले आहे.

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**जामखेड** : जामखेड राष्ट्रीय महामार्ग विभागाचे डेप्युटी इंजिनियर सुजित चेमटे यांनी दि. ५ मार्च २०२६ पर्यंत महामार्गाची अधिकृत हद्द निश्चित करून कार्यवाही करण्याचे लेखी आश्वासन दिल्यानंतर दि. २६ फेब्रुवारी रोजीचा जामखेड बंद मागे घेतल्यानंतरही दिलेल्या आश्वासनानुसार अतिक्रमण काढण्यासाठीची कोणतीही प्रक्रिया न केल्याने मागे घेतलेले जामखेड बंदचे आंदोलन पुन्हा पुकारले असून राष्ट्रीय महामार्गाचे कार्यकारी अभियंता सुजित चिमटे व संबंधित वरिष्ठ अधिकारी जोपर्यंत हद्द निश्चित करत नाही तोपर्यंत आज दि. ६ मार्चपासून सर्वपक्षीय व सर्व सामाजिक संघटना यांच्या वतीने जामखेड शहर बेमुदत बंद पुकारण्यात येत असल्याचे जाहीर करण्यात आले आहे.

तसेच तोडगा न निघाल्यास शनिवारी रस्ता रोको आंदोलन करण्यात येणार आहे. जामखेड शहरातून जाणारा राष्ट्रीय महामार्ग ५४८ डी जामखेड जिल्हा अहिल्यानगर वरील शहरातील रस्त्याच्या कामाला कायमस्वरूपी अडथळा ठरणारे अतिक्रमण काढण्यासाठी दि.२६ फ्रेबुवारी २०२६ पासून शहर अतिक्रमण बाबत अतिक्रमण कार्यवाही होईपर्यंत सर्वपक्षीय जामखेड शहर बेमुदत बंद ठेवण्यात येणार होता मात्र राष्ट्रीय महामार्ग विभागाचे अभियंता सुजित चिमटे यांनी दिलेल्या लेखी आश्वासनानंतर जामखेड बंद मागे घेण्यात आला होता गेले साडेतीन वर्षापासून जामखेड शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गाचे काम सुरू आहे ते अनेक अडथळे व कासवगतीने सुरू आहे.

यामुळे अनेक छोटे-मोठे अपघात झाले यामध्ये अनेक जण गायबंदी तर काहींना आपली जीव गमावे लागले आहेत. हे काम सुरू असताना अनेक अडचणी बरोबरच अतिक्रमण काढणे हा मोठा अडथळा ठरत आहे यासाठी विविध संघटनांकडून अनेक आंदोलने तर प्रशासकीय पातळीवर अनेक बैठका तसेच जिल्हाधिकारी यांनी या ठिकाणी प्रत्यक्ष भेट देऊन अतिक्रमण काढण्याचे सूचना करूनही काहीच होत नसल्याने अखेर जामखेडकरांनी सर्वपक्षीय व बेमुदत जामखेड बंदचे हत्यार उपसले होते. त्याच अनुषंगाने जामखेड शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग ५४८ डी महामार्गावरील अतिक्रमणाच्या प्रश्नावरून सर्वपक्षीय व सामाजिक संघटनांनी काही दिवसांपूर्वी पुकारलेला बेमुदत बंद स्थगित करण्यात आला होता मात्र सर्वपक्षीय साखळी उपोषण सुरू ठेवण्यात आले होते.

त्याच पार्श्वभूमीवर आज दि. ५ मार्च रोजी निर्धारित मुदतीत हद्द निश्चित न झाल्याने आज शुक्रवार दि. ६ मार्चपासून सर्वपक्षीय व सामाजिक संघटनांनी जामखेड शहरातून जाणारा राष्ट्रीय महामार्ग ५६१ व ५४८ डी मार्गात अडथळा ठरणाऱ्या अतिक्रमणामुळे जामखेड शहर बेमुदत बंद पुकारला आहे.

# पालिकेने दिशादर्शक फलक काढले

## विरोधी नगरसेवकांचे ठिय्या

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**श्रीरामपूर** : मोरगे वस्ती परिसरातील सिद्धिविनायक रोड येथे नागरिकांच्या सोयीसाठी बसविण्यात आलेले उपरस्ता क्रमांक दर्शविणारे दिशादर्शक फलक सुट्टीच्या दिवशी अचानक काढून टाकल्याच्या निषेधार्थ विरोधी नगरसेवकांसह नागरिकांनी नगरपालिकेच्या पायरीवर ठिय्या आंदोलन करत या घटनेचा निषेध केला. अतिक्रमण व बांधकाम विभागाचे अधिकारी मराठे यांनी फलक काढण्याचे आश्वासन दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.

आज कारवाई झाली नाही तर उद्या पुन्हा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा यावेळी देण्यात आला. श्रीरामपूर नगर परिषदेच्यावतीने मोरगेवस्ती परिसरातील उपरस्ता क्रमांक दर्शविणारे फलक सुट्टीच्या दिवशी अचानक काढून टाकण्यात आले. त्यामुळे विरोधी नगरसेवक व नागरिकांनी पालिकेत येऊन अधिकाऱ्यांना याचा जाब विचारला. मुख्याधिकारी उपस्थित नसल्याने अतिक्रमण व बांधकाम विभागाचे अधिकारी मराठे आंदोलनकर्त्यांना सामोरे गेले. यावेळी नागरिकांच्या सुविधेसाठी उपरस्ता क्रमांक १ ते ६ चे दिशादर्शक फलक बसविण्यात आले होते.

मात्र नगर परिषदेच्यावतीने हे फलक सुट्टीच्या दिवशी अचानक काढण्यात आल्याने नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. शहरात इतरत्र अनेक फलक अतिक्रमणात असून ते काढण्यात आले नाही. मात्र सदरचे फलक खासगी जागेत असताना व त्याबाबत संबंधितांची तक्रार नसताना ते काढण्यात आले. त्यामुळे इतर ठिकाणचेही फलक काढण्यात यावेत, अशी मागणी यावेळी यावेळी करण्यात आली. नागरिकांना त्रास देण्याची भूमिका घेणाऱ्या सत्ताधारी व प्रशासनाने तुघलकी भूमिका घेऊ नये अन्यथा श्रीरामपूर भाजप यांना जशास तसे उत्तर देईल, असा इशारा यावेळी विरोधी नगरसेवकांनी दिला.

यावेळी नगरसेवक श्रीनिवास बिहाणी, नगरसेवक दीपक चव्हाण, संजय गांगड, आशीष धनवटे, रवी पाटील, भाजपाच्या गटनेत्या वैशाली चव्हाण, माजी नगरसेवक संजय छल्लारे, केतन खोरे यांची भाषणे झाली.

# प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे दुभाजकावरील झाडांची दुरवस्था

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**बेलापूर** : बेलापूर-श्रीरामपूर रस्त्यावरील दुभाजक तसेच रस्त्याच्या दुतर्फा लावण्यात आलेल्या झाडांची सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दुर्लक्षामुळे दुरवस्था झाल्याची बाब समोर आली आहे. झाडांच्या संरक्षणासाठी बसविण्यात आलेल्या जाळ्याही अनेक ठिकाणी गायब झाल्याने झाडांचे मोठे नुकसान होत आहे. या पार्श्वभूमीवर झाडांच्या संगोपनासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी बेलापूर येथील 'सत्यमेव जयते सुप्रभात ग्रुप'च्या वतीने पत्रकार देविदास देसाई यांनी निवेदनाद्वारे केली आहे. पर्यावरणाचे संतुलन राखणे तसेच रात्री समोरून येणाऱ्या वाहनांच्या प्रखर प्रकाशाचा परिणाम कमी करण्याच्या उद्देशाने कोट्यवधी रुपये खर्च करून या रस्त्याच्या दुभाजकात व दुतर्फा मोठ्या प्रमाणात झाडे लावण्यात आली होती. मात्र सध्या कडक उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर झाडांना वेळेवर पाणी मिळत नसल्याने अनेक झाडे वाळून गेली असून काही झाडे नष्ट होण्याच्या स्थितीत आहेत. रस्त्यालगत लावलेल्या झाडांचे संगोपन करण्याची जबाबदारी संबंधित ठेकेदाराकडे असताना त्याने झाडांकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे प्रशासनाने तातडीने टँकरद्वारे पाणी उपलब्ध करून द्यावे, वाळलेली झाडे काढून त्या ठिकाणी नवीन झाडे लावावीत तसेच आवश्यक ठिकाणी संरक्षण जाळ्या बसवाव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे. या मागणीसाठी अभिषेक खंडागळे, राधेश्याम अंबिलवादे, संजय भोंडगे, इस्माईल शेख, इरफान शेख, किरण गागरे आदी सदस्यांनी निवेदन दिले आहे.

# शैक्षणिक क्षेत्रात चिंचोली संकुलचे योगदान महत्त्वपूर्ण : उत्तम सोनवणे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**




**प्रवरानगर** : प्रवरा शैक्षणिक संकुलाने सिन्नर परिसरासाठी सुरू केलेली ही ज्ञानगंगोत्री ग्रामीण भागासाठी महत्त्वपूर्ण आहे नोकरी करणारा नाही तर नोकरी देणारा विद्यार्थी घडवण्यावरती या संस्थेचा नेहमीच प्रयत्न राहिला आहे संस्थेच्या माध्यमातून आज विविध उपक्रमातून सक्षम आणि संस्कारक्षम विद्यार्थी घडवण्यावर भर दिला जात असल्याने येथील विद्यार्थी हा जागतिक पातळीवरती पोहोचला असल्याचे प्रतिपादन जे. के. माईंनी प्रिसिजन टेकनॉलॉजि लिमिटेड सिन्नर चे उत्तम सोनवणे यांनी केले.

लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या सर विश्वेश्वारय्या इन्स्टिटयूट ऑफ टेकनॉलॉजि चिंचोली अभियांत्रिकी महाविद्यालयात संस्थेचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या प्रेरणेने आणि प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या मुख्यकार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयात वार्षिक पारीतोषिक वितरणात सोनवणे बोलत होते. यावेळी अभिनेते श्रावण दराडे, डॉ. राणा महाजन, प्राचार्य डॉ.सारंग पांडे, कॅम्पस डायरेक्टर डॉ. बाळासाहेब घुले, डॉ.चारुशीला भंगाळे, डॉ.विजय तांबे, डॉ. प्रेरणा खैरनार कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. कैलास तांबे, डॉ. महेंद्र गुद्दड, डॉ.गणेश शिंदे, प्रा.धम्मदीप वासनिक व प्रा.श्रीकांत भागवत आदी मान्यवरांसह महाविद्यालयाचे सर्व विभाग प्रमुख, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी बोलतांना सोनवणे म्हणाले, नोकरीच्या मागे न लागता व्यवसायाकडे वळावे. डेटा सायन्स त्याच बरोबर आर्टीफिसिअल इंटेलिजन्स व मशीन लर्निंग सारख्या अद्ययावत तंत्रज्ञानाचा औद्योगिक क्षेत्रातील वाढता वापर ध्यानात घेऊन विद्यार्थ्यांनी त्या दृष्टीने अभ्यासाला लागावे चिंचोली सिन्नर कॅम्पसच्या माध्यमातून विविध प्रकारचे शिक्षण दिले जाते. यामुळे ग्रामीण विद्यार्थ्यांना शिक्षणाची आवड निर्माण झाली आहे एक दर्जेदार शिक्षण देण्याचे काम प्रवरेच्या माध्यमातून राज्यात होत आहे. प्रवरेचा विद्यार्थी आज जागतिक पातळीवर पोहोचला आहे.

सिन्नर कॅम्पसच्या माध्यमातून दिले जाणाऱ्या शिक्षणातून विद्यार्थ्यांनी पुढे जात आदर्श नागरिक होत देशासाठी काम करावे असा संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सारंग पांडे यांनी महाविद्यालयाचा प्रगती अहवाल सादर केला.

# विद्यार्थ्यांचे यश हे कठोर मेहनतीचे फळ : रमेश कोठारी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**श्रीरामपूर** : शैक्षणिक क्षेत्रात मिळणारे यश हे विद्यार्थ्यांच्या कठोर मेहनतीचे फळ असते. जीवनात सातत्याने प्रगती करत राहण्यासाठी परिश्रम, जिद्द आणि अभ्यासाची आवड आवश्यक असते, असे मत ज्येष्ठ पत्रकार रमेश कोठारी यांनी व्यक्त केले.

श्रीरामपूर येथील प्रगतशील शेतकरी व सामाजिक कार्यकर्ते अशोक खुशालचंद कोठारी मित्र मंडळाच्या वतीने सीए परीक्षा उच्च श्रेणीत उत्तीर्ण झाल्याबद्दल यश सचिन सोनी आणि युवराज राहुल कोठारी यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. उद्योजक रमेश चुडीवाल यांच्या हस्ते शाल, हार व श्रीफळ देऊन दोघांचा गौरव करण्यात आला. रमेश कोठारी म्हणाले, सीए परीक्षा इतर परीक्षांच्या तुलनेत अत्यंत कठीण असून तिचा निकालाचा टक्का कमी असतो. मेहनती, अभ्यासू आणि जिद्दी विद्यार्थ्यांनाच या परीक्षेत यश मिळते. युवराज कोठारी आणि यश सोनी यांनी मिळवलेले यश भूषणावह असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमास ज्येष्ठ व्यापारी रमेश गुंदेचा, पी. आर. शिंदे, ड. सुभाष कोठारी, नितीन पिपाडा, रमेश वैद्य, विजय सोनी आदींसह कोठारी मित्र मंडळाचे सदस्य उपस्थित होते. प्रास्ताविक माजी प्राचार्य श्रीधर खंडागळे यांनी केले, तर आभार अशोक कोठारी यांनी मानले.

# वसुलीसाठी ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांची दारोदार पायपीट



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणतांबा** : आर्थिक वर्षाच्या अखेरीस मार्च महिना जवळ आल्याने पुणतांबा ग्रामपंचायतीने थकीत कर वसुलीसाठी मोहीम तीव्र केली आहे. पाणीपट्टी व घरपट्टीची थकबाकी वसूल करण्यासाठी ग्रामपंचायत कर्मचारी सध्या थेट थकबाकीदारांच्या घरी जाऊन वसुली करत आहेत. पुणतांबा ग्रामपंचायतीकडे ग्रामस्थांकडे पाणीपट्टी व घरपट्टी मिळून सुमारे चार कोटी रुपयांपर्यंत थकबाकी असल्याचे सांगितले जात आहे. थकबाकी वसुलीसाठी राज्य सरकारने ५० टक्के सवलत जाहीर केली होती.

मात्र या सवलतीनंतरही अनेक थकबाकीदारांकडून अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही. सध्या सुमारे ४० टक्केच वसुली झाल्याची चर्चा आहे. दरम्यान, सवलतीची मुदतही संपल्याने ग्रामपंचायतीने आता धडक वसुली मोहीम हाती घेतली आहे. मंगळवारी सकाळी दहा वाजल्यानंतर ग्रामपंचायत कर्मचारी अनिल धनवटे, सुनिता धनवटे, मुमताज पठाण आणि धनंजय गुंजाळ यांनी चांगदेव नगर परिसरात हातात वसुली पुस्तक व खतावणी घेऊन भर उन्हात घराघरांत जाऊन थकबाकी वसुलीची पायपीट केली. यावेळी स्थानिक ग्रामस्थांनीही कर्मचाऱ्यांना सहकार्य केले. दरम्यान, थकीत रकमेबाबत ग्रामसभेत अनेक वेळा चर्चा होऊन ठरावही संमत झाले आहेत. मात्र, थकबाकी वसुलीसाठी अपेक्षित प्रतिसाद मिळत नाही.

## द•ख•ल

### कानिफनाथ महाराज यात्रेनिमित्त हरिनामाचा गजर

**राहुरी** : देवळाली प्रवरा येथील टाकळीमिया रोड परिसरात सुरू असलेल्या कानिफनाथ महाराज यात्रेनिमित्त आयोजित सप्ताहामुळे शहर भक्तिरंगात न्हाऊन निघाले आहे. सकाळी नवनाथ ग्रंथ पारायण, मंत्रोच्चार व पूजा-विधीने अध्यात्मिक वातावरण निर्माण होत असून सायंकाळी कीर्तनसेवेने परिसर दुमदुमून जात आहे. टाळ-मृदुंगाच्या गजरात हरिनामाचा अखंड नाद घुमत असून स्त्री-पुरुष, युवक व ज्येष्ठ नागरिक मोठ्या उत्साहाने सहभागी होत आहेत. मंदिर परिसरात आकर्षक रोषणाई व सुशोभित मंडप उभारण्यात आले आहेत. दररोज महाप्रसाद पंगतीत भाविकांची मोठी गर्दी होत असून सामाजिक एकात्मतेचे दर्शन घडत आहे. दरम्यान, मढी येथे यात्रेसाठी पायी जाणाऱ्या भाविकांसाठी ओम चैतन्य कानिफनाथ प्रतिष्ठान व परिसरातील भाविकांच्या वतीने नाश्त्याची व्यवस्था करण्यात येत आहे. श्रद्धा व सामूहिक सहभागामुळे देवळाली प्रवरा येथे उत्साहाचे वातावरण आहे.

### स्वाती धसाळ यांच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन

**राहुरी** : तांदुळवाडी येथे ग्रामपंचायत सदस्या स्वाती विनीत धसाळ यांच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन जिल्हा सहकारी बँकेचे संचालक अक्षय कर्डिले यांच्या हस्ते पार पडले. यावेळी धर्मवीर संभाजीराजे युवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजू शेटे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना अक्षय कर्डिले यांनी सांगितले की, जनसंपर्क कार्यालयामुळे नागरिकांच्या समस्या ऐकून त्यांचे तातडीने निराकरण करण्यासाठी प्रभावी व्यासपीठ उपलब्ध होणार आहे. गावाच्या विकासासाठी लोकप्रतिनिधींनी नागरिकांशी सतत संपर्कात राहणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. स्वाती धसाळ यांनी मनोगतात सांगितले की, हे कार्यालय गावकऱ्यांसाठी मार्गदर्शन व समस्या निवारणाचे केंद्र ठरेल. शासनाच्या विविध योजना ग्रामस्थांपर्यंत पोहोचविण्यासाठी आपण प्रयत्नशील राहू, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमात स्केटिंग स्पर्धेत यश मिळविल्याबद्दल सार्थक उत्तम बनसोडे याचा तसेच सामाजिक कार्याबद्दल रोहिणी आंबेकर यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास गावातील अनेक मान्यवर व ग्रामस्थ उपस्थित होते.

### श्रीरामपूरातील चार विद्यार्थ्यांचे सीए परीक्षेत यश

**श्रीरामपूर** : चार्टर्ड अकौंटंट (सीए) परीक्षेत श्रीरामपूर व परिसरातील चार विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट यश संपादन करत शहराच्या शैक्षणिक परंपरेत मानाचा तुरा रोवला आहे. ऋतुजा विजय काळे, यश सचिन सोनी, सार्थक दीपक गंगवाल आणि तेजस विजय कोठारी यांनी सीए परीक्षेत उच्च श्रेणीत उत्तीर्ण होत उल्लेखनीय कामगिरी केली. अवलगाव (ता. वैजापूर) येथील ऋतुजा काळे हिने इन्स्टिटयूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडियाच्या डिसेंबर २०२५ परीक्षेत यश मिळवले. तिचे शिक्षण वैजापूर व श्रीरामपूर येथे झाले असून प्रा. आदिनाथ जोशी व प्रा. बबनराव आदिक यांचे मार्गदर्शन तिला लाभले. यश सोनी याने इन्स्टिटयूट ऑफ चार्टर्ड अकौंटंट्स ऑफ इंडियाच्या परीक्षेत उत्कृष्ट श्रेणी मिळवली. त्याचे शिक्षण श्रीरामपूर व पुणे येथे झाले असून मेहता-अँड-शाह व मुथ्था-अँड-लाहोटी या संस्थांचे मार्गदर्शन त्याला लाभले. सार्थक गंगवाल यानेही सीए फायनान्स परीक्षेत उत्तीर्ण होत यश मिळवले. त्याचे शिक्षण सेंट झेवियर स्कूल व बोरावके महाविद्यालयात झाले असून मुंबईतील चतुर्वेदी अँड शाह फर्ममध्ये त्याने आर्टिकलशिप पूर्ण केली. तेजस कोठारी याने जानेवारी २०२६ मध्ये झालेल्या सीए परीक्षेत उच्च श्रेणी मिळवली. त्याचे शिक्षण विद्यानिकेतन, बी.एम.सी.सी. व मॉडर्न कॉलेज, पुणे येथे झाले. या सर्व विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल शहरातून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

### शिवजयंतीनिमित्त दिली अनाथांच्या हाती 'ज्ञानतलवार'



**श्रीरामपूर** : शिवजयंती म्हणजे केवळ ढोल-ताशांचा गजर नव्हे, तर विचारांची मशाल पेटवण्याची संधी आहे, हे श्रीरामपूरच्या 'लिनेस क्लब'ने कृतीतून दाखवून दिले. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त क्लबच्या सदस्यांनी बेलापूरजवळील गोखलेवाडी येथील श्री साई विठ्ठल अनाथ आश्रमात जाऊन मुलांना पुस्तके व फळे भेट देत वैचारिक उत्सव साजरा केला. शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर गोष्टींची पुस्तके, महापुरुषांची चरित्रे आणि शैक्षणिक साहित्य मुलांना देण्यात आले.

मुले हेच देशाचे भविष्य; त्यांच्या हाती ज्ञानाची तलवार दिली, तर ते सक्षम नागरिक बनतील, असा संदेश सामाजिक कार्यकर्त्या प्रतिभा शिंदे यांनी बोलताना दिला. याप्रसंगी डॉ. मीनल फुलवार, माधुरी सोनवणे, श्रद्धा मिरीकर, प्रतिभा शिंदे, पुनम कासलीवाल, रिटा शहा व कल्पना वाघ यांनी मुलांशी संवाद साधत शिवचरित्रातील प्रेरणादायी प्रसंग सांगितले.

# डॉ. चोथाणींची सेवा उल्लेखनीय : शालिनीताई विखे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**लोणी** : बालकांचे रोग निदान आणि उपचार हे सर्वात आव्हानात्मक काम असताना डॉ.कृष्णकुमार चोथानी यांनी गेली पन्नास वर्षे ते अचूकपणे केले.बालकाला त्यांचा स्पर्श झाला तरी त्याचे आरोग्य सुधारते असा अनेकांचा अनुभव आहे.त्यांची ही सेवा असाधारण असल्याचे गौरोद्गार जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे यांनी काढले.

तर संत तुकाराम यांची भक्ती आणि कठोर वैराग्य यामुळे ते वारकरी संप्रदायाचे कळस बनल्याचे प्रतिपादन भागवताचार्य संगीताताई कोरडे यांनी केले. राहाता तालुक्यातील लोणी बुद्रुक येथे जगद्गुरु संत श्री तुकाराम महाराज सेवा ट्रस्ट व ग्रामस्थांच्या वतीने आयोजित तुकाराम बीज उत्सवात त्या बोलत होत्या.यावेळी प्रवरा मेडिकल ट्रस्टच्या विश्वस्त सुवर्णाताई विखे, भारत महाराज धावणे,डॉ. बधे, विकास सोसायटीचे उपाध्यक्ष नाना म्हस्के,सरपंच कल्पना मैड,माजी सरपंच लक्ष्मण बनसोडे,वसंतराव विखे, भागवतराव विखे, मधुकर विखे,रवींद्र धावणे,नामदेव वाबळे ,ट्रस्टचे अध्यक्ष देवीदास म्हस्के, दादासाहेब म्हस्के, डॉक्टर्स असोसिएशन लोणीचे सदस्य उपस्थित होते.

डॉ.चोथानी यांना मानपत्र देऊन सौ.शालिनीताई विखे व मान्यवरांच्या हस्ते सन्मानित केल्यानंतर बोलताना सौ.विखे म्हणाल्या की,गरीब कुटुंबातून आलेल्या डॉ.चोथानी यांनी आपल्या बुद्धिमतेच्या जोरावर हजारो बालकांना आरोग्यदायी जीवन दिले.अचूक निदान आणि योग्य उपचार यामुळे ते बालकांचे देवदूत बनले.आयुष्यात संघर्ष करीत त्यांनी वाटचाल केली आहे.

लोणी मध्ये त्यांचा सन्मान होणे महत्त्वाची घटना आहे.संत तुकाराम बीज निमित्ताने त्यांचा झालेला सन्मान कायम स्मरणात राहील. सेवा ट्रस्टच्या माध्यमातून गेली २६ वर्षे येथे होणाऱ्या उत्सवात विविध ग्रंथांची पारायणे,नामवंत कथा करांच्या होणाऱ्या कथा आणि त्यासोबत समाजातील दुर्लक्षित घटकांचा सन्मान करण्याचा सामाजिक उपक्रम हे वेगळेपण आहे.लोणी गावचा एकोपा,इथली अध्यात्मिक परंपरा याला या उत्सवाने बळकटी मिळाल्याचे त्यांनी सांगितले. प्रारंभी अनिल विखे यांनी स्वागत,गेणुजी सुर्वे यांनी प्रास्ताविक,रामचंद्र निंबाळकर यांनी व्यक्ती परिचय करून दिला.

दादासाहेब म्हस्के यांनी आभार प्रदर्शन तर यमन पुलाटे यांनी सूत्रसंचालन केले.

## पान १ वरुन

### राहत्यात 'अप्पर वॉटर' बाजारतळ उभारणार

अतिक्रमणधारकांना नोटीसा देऊन कातनाला मोकळा करण्याचे काम तातडीने हाती घेण्यात येणार आहे. गुरुवारी डॉ. सुजय विखे यांनी नगरपालिकेच्या पदाधिकाऱ्यांसह स्वतः कातनाल्यात उतरत पाहणी केली. कातनाला अंडरग्राऊंड केल्यास त्यावर बाजारतळ विकसीत करता येईल, असा मानस त्यांनी बोलून दाखवला. कातनाल्यातील दुर्गंधीबाबतही त्यांनी नाराजी व्यक्त केली. मटण मार्केटमधून निर्माण होणाऱ्या कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्यासाठी इन्सिनरेटर बसविण्याची योजना करण्यात आली आहे. या यंत्राद्वरे मटण मार्केटमधील जैविक कचरा जाळून नष्ट केला जाणार असल्यामुळे तो नाल्यात किंवा परिसरात साचणार नाही. त्यामुळे कचऱ्यामुळे होणारे पाणी प्रदूषण टाळण्यास मदत होणार असून परिसर स्वच्छ ठेवण्यासही मोठी मदत मिळणार आहे. जापनीज टेक्नॉलॉजीतून उभारण्यात येणारा हा हायटेक बाजारतळाचा महाराष्ट्रातील पहिला प्रयोग असणार आहे. त्यासाठी तब्बल सात कोटी रुपये खर्च येणार आहे. याबाबत माहिती देताना डॉ. सुजय विखे म्हणाले की, राहाता शहराचा बाजार वर्षानुवर्षे विरभद्र मंदीरासमोर भरतो. परंतु या बाजारामुळे मंदीरातील भावीक व परिसरातील व्यावसायिकांना अडचण होते. शिवाय साकुरी व नगर-मनमाड रस्त्यावरील वाहनांनाही अडथळा येतो. जर कातनाला अंडरग्राऊंड केला, तर सुमारे एक ते दीड एकर जागा वापरायला मिळते. या कातनाल्याच्या पुराचे भविष्यातील ५० वर्षांचे नियोजन करुन आराखडा तयार केला जाणार आहे. जापनिज टेक्नॉलॉजीने कातनाला अंडरग्राऊंड करुन, त्यावर भव्य बाजारतळ उभारण्यात येणार आहे. राहात्यातील मटन मार्केटचा कचराही कायमस्वरुपी नष्ट करण्याचा प्लॅन करण्यात येणार असून, सध्याचे मटन मार्केटला स्थलांतरीत करण्यात येईल, असेही डॉ. सुजय विखे पाटील यांनी सांगितले. येत्या १ एप्रिलपासून या कामाला प्रारंभ करण्यात येईल व पावसाळ्यापूर्वी हे काम पूर्ण होईल, असा मानसही डॉ. विखे यांनी व्यक्त केला. यावेळी राहाता नगरपालिकेचे नगराध्यक्ष डॉ. स्वाधिन गाडेकर व इतर नगरसेवक तसेच नगरपालिकेचे अधिकारी उपस्थित होते.

### एसटीत मद्यपान, चालक-वाहकांची अल्कोटेस्ट सक्तीची

करण्यात आले असून त्यानंतर पुन्हा एकदा अल्कोटेस्ट तपासणी करूनच पुढील मार्गावर पाठविण्याची सक्ती करण्यात आली आहे. बसस्थानक व आगार परिसरातील विश्रांतीगृहांमध्ये असलेल्या कर्मचाऱ्यांचीही वेळोवेळी तपासणी केली जाणार आहे.

दरम्यान, दक्षता विभागाकडून गोपनीय तपासणी मोहीम राबविण्यात येणार असून मार्गतपासणी पथक, वाहतूक निरीक्षक, प्रशिक्षण व सुरक्षा विभाग यांच्या माध्यमातून विशेष तपासणी कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. तसेच एसटी कर्मचाऱ्यांमध्ये जनजागृती करण्यासाठी प्रशिक्षण सत्रे व 'मद्यपान जनजागृती सप्ताह' आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली.

प्रवाशांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत एसटी प्रशासनाने मद्यपानाबाबत शून्य सहनशीलतेची भूमिका घेतली असून या उपाययोजनांमुळे बससेवा अधिक सुरक्षित आणि शिस्तबद्ध होईल, असा विश्वास परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केला.

### राज्यावरील कर्जाचा बोजा ९.३२ लाख कोटींवर!

कायम राखले आहे.राज्याचे उत्पन्न मोठे असले तरी दरडोई उत्पन्नाच्या बाबतीत महाराष्ट्र काही प्रमाणात मागे पडला आहे. २०२४-२५ या आर्थिक वर्षात राज्याचे दरडोई उत्पन्न ३ लाख १७ हजार ६१९ रुपये इतके आहे. २०२३-२४ मध्ये हे उत्पन्न २ लाख ८५ हजार २९० रुपये होते. म्हणजे एका वर्षात दरडोई उत्पन्नात सुमारे ३० हजार रुपयांची वाढ झाली असली तरी देशातील क्रमवारीत महाराष्ट्र पाचव्या स्थानावर गेला आहे.

दरडोई उत्पन्नाच्या बाबतीत तेलंगणा राज्य पहिल्या स्थानावर असून तेथील दरडोई उत्पन्न ३ लाख ८७ हजार ६२३ रुपये आहे. त्यानंतर कर्नाटक, तामिळनाडू आणि गुजरात या राज्यांचा क्रम लागतो.

आर्थिक पाहणी अहवालानुसार मार्च २०२६ अखेर महाराष्ट्रावर ९ लाख ३२ हजार २४२ कोटी रुपयांचे कर्ज होण्याचा अंदाज आहे. मार्च २०२५ अखेर राज्यावरील कर्ज ८ लाख ३९ हजार २७५ कोटी रुपये होते. म्हणजेच एका वर्षात राज्याच्या कर्जात सुमारे ९२ हजार ९६७ कोटी रुपयांची वाढ होण्याची शक्यता आहे. केवळ कर्जावरील व्याज फेडण्यासाठीच राज्य सरकारला सुमारे ६५ हजार कोटी रुपये खर्च करावे लागणार आहेत.

# बिहारी तरुणाचे वैंजापुरात अपहरण

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**वैजापूर :** खंडणीसाठी बिहारी तरुणाचे अपहरण करून त्याला जीवे मारण्याची धमकी दिली तसेच पैशाची मागणी करत त्याला हातातील धातूच्या कड्याने मारहाण करून त्याच्या खिशातील रोख रक्कम, डिजिटल घड्याळ, गळ्यातील चांदीची चैन व मोबाईल फोन असा सहा महजार ३०० रुपये किंमतीचा ऐवज चोरून नेला. इम्रान अलीम अन्सारी (वय १९) असे अपहरण झालेल्या तरुणाचे नाव असून तो मुळचा बिहार राज्यातील भोजपुर जिल्ह्याच्या बसाउरी येथील रहिवासी आहे. मात्र, रोजगारासाठी तो वैजापूर येथे राहत आहे. ही घटना बुधवारी सायंकाळी साडे सहा ते रात्री बारा वाजे दरम्यान शहरातील बोथरा पेट्रोल पंपासमोर घडली. त्याने पोलिसांत फिर्याद दिल्यानंतर तीन अनोळखी व्यक्तींविरुद्ध पोलिसांत भारतीय न्याय संहितेच्या संबंधित कलमाखली गुन्हा नोंदवण्यात आला असून पोलीस निरीक्षक सत्यजित ताईतवाले यांच्या मार्गदर्शनाखाली दोघांना ताब्यात घेण्यात आले आहे. या घटनेमुळे शहरात खळबळ उडाली आहे.



या घटनेबाबत अधिक माहिती अशी की, इम्रान अन्सारी हा बिहारी तरुण वैजापूरातील एका बांधकाम प्रकल्पावर काम करत आहे. बुधवारी सायंकाळी तो मार्केटमध्ये असताना बोथरा पेट्रोल पंपावर दुचाकीवर आलेल्या तीन आरोपीनी त्याचे अपहरण केले. त्याला जीवे ठार मारण्याची धमकी देऊन फोनद्वरे पैशाची मागणी केली. तसेच त्याला मारहाण केली, हातातील धातूच्या कड्याने मारहाण केली व खिशातील रोख रुपये ३००, दोन हजार रुपये किंमतीचा मोबाईल, एक हजार रुपये किमतीचे डिजिटल घड्याळ, तीन हजार रुपये किंमतीची गळ्यातील चांदीची बारीक चैन असा ऐवज चोरला. यातील दोघांनी पांढऱ्या रंगाचा तर एकाने काळ्या रंगाचा शर्ट घातला होता व त्यांची दाढी व केस वाढलेले होते तसेच ते मराठी व हिंदी भाषा बोलत होते असे फिर्यादीत म्हंटले आहे. याप्रकरणी वैजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक नागरगोजे हे करीत आहेत.

## निधन वार्ता

### सुर्यभान पुलाटे



**लोणी :** राहाता तालुक्यातील दुर्गापुर येथील जिल्हा बँकेचे माजी तालुका विकास अधिकारी सूर्यभान श्रीपत पुलाटे यांचे वयाच्या ८१ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार असून ते बाळासाहेब आणि अशितोष सूर्यभान पुलाटे यांचे वडील तर प्रवरा फळे भाजीपाला सोसायटीचे माजी अध्यक्ष सोपान श्रीपत पुलाटे यांचे बंधू होत.

### बाळासाहेब अंत्रे



**सोनगाव :** येथील बाळासाहेब नामदेव अंत्रे (वय ५७) सोनगाव ग्रामपंचायत माजी सदस्य यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, मुलगी,बहिणी, भाऊ असा परिवार आहे.

### उमेश गणपतराव मैड

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



अहिल्यानगर : येथील सुवर्णकार व्यावसायिक उमेश गणपतराव मैड (वय ३८) यांचे कार अपघातात निधन झाले. नगर-कल्याण महामार्गावर हा अपघात झाला. उमेश मैड हे एका कौटुंबिक कार्यक्रमासाठी कल्याण येथे जात असताना त्यांच्या कारचा समोरून येणाऱ्या दुसऱ्या कारशी अपघात झाला. त्यात त्यांचा जागीच मृत्यू झाला. त्यांचे बंधू दत्तात्रय गणपतराव मैड हे गंभीर जखमी झाले आहेत.

उमेश मैड हे लहानपणापासून श्रीरामपूर येथे वास्तव्यास होते. सोमनाथ महाले यांचे ते मेहुणे होते. श्रीरामपूर येथे त्यांचा मोठा मित्रपरिवार आहे. एक वर्षापूर्वी त्यांनी नगर येथे सोने चांदीचे दालन सुरू केले होते. त्यांच्या पश्चात पत्नी दोन दोन मुली व एक मुलगा असा परिवार आहे. त्यांच्या अपघाती निधनाने हळहळ व्यक्त होत आहे.

# जळालेले रोहित्र तात्काळ बदलण्याची मागणी; शेतकऱ्यांचे हाल

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**गंगापूर :** सिध्दनाथ वाडगाव सबस्टेशन अंतर्गत येणाऱ्या शिल्लेगाव जिल्हा परिषद गटातील अनेक गावांमध्ये शेतीपंपांचे विद्युत रोहित्र (ट्रान्सफॉर्मर) जळाल्यामुळे शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. जळालेले रोहित्र तात्काळ बदलून देऊन शेतीपंपांना दिवसाच्या वेळेत नियमित वीजपुरवठा करावा, अशी मागणी जिल्हा परिषद सदस्या सौ. सविता संतोष पाटील जाधव (वजनापूरकर) यांनी केली आहे. सध्या रब्बी हंगामातील पिके जोमात असून पाण्याअभावी गहू, हरभरा, कांदा आदी पिके करपण्याची भीती निर्माण झाली आहे. शिल्लेगाव जिल्हा परिषद गटातील सुमारे १५ ते २० विद्युत रोहित्र जळालेले असल्याने शेतीपंपांचा वीजपुरवठा खंडित झाला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना पिकांना पाणी देता येत नसल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे.याबाबत शेतकऱ्यांनी वारंवार तक्रारी करूनही अद्याप रोहित्र बदलण्याची कार्यवाही झालेली नसल्याची खंत व्यक्त करण्यात येत आहे. त्याचबरोबर परिसरात बिबटे व रानडुकरांचे प्रमाण वाढल्याने रात्रीच्या वेळी शेतात जाऊन पाणी देणेही शेतकऱ्यांसाठी धोकादायक ठरत आहे.या पार्श्वभूमीवर जळालेले रोहित्र तातडीने बदलून दिवसाच्या वेळेत वीजपुरवठा सुरू करावा, अशी मागणी सविता जाधव यांनी गंगापूर तहसीलदार तसेच महावितरणच्या अधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वरे केली आहे.

# ताणतणाव व्यवस्थापनासाठी सकारात्मक विचार महत्त्वाचे : जगधने

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशन, श्रीरामपूर येथे तीन दिवसीय 'ताणतणाव व्यवस्थापन व व्यसनमुक्ती' कार्यशाळा उत्साहात पार पडली. रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग काउन्सिल सदस्या मीनाताई जगधने यांनी यावेळी विद्यार्थ्यांना सकारात्मक जीवनशैली, विचार आणि छंद जोपासण्याचे आवाहन केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशन, श्रीरामपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या ताणतणाव व्यवस्थापन व व्यसनमुक्ती या तीन दिवसीय विद्यापीठ स्तरीय कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी त्या अध्यक्षीय भाषणात बोलत होत्या.

कार्यशाळेत पुणे विद्यापीठ कार्यक्षेत्रातील अहिल्यानगर, पुणे व नाशिक जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांतून १२० विद्यार्थी-विद्यार्थिनी सहभागी झाले होते. या तीन दिवसीय कार्यशाळेमध्ये ताणतणाव व्यवस्थापन व व्यसनमुक्ती या मुख्य विषयाला अनुसरून डॉ. तन्मय जोशी, डॉ. प्रीतम बेदरकर, प्रियांका खराडकर तिवारी, डॉ. अभय शाळीग्राम, प्रा. गोरक्ष नरोटे, मधुकर काळे, डॉ. सुनील मोहटे आणि प्रा. गणेश निमसे या मान्यवरांची व्याख्याने संपन्न झाली.

जगधने म्हणाल्या, तुलनेत आज माणसांचे जीवन अधिक तणावग्रस्त झाले आहे. वेगवेगळ्या प्रकारचे ताण, चिंता, समस्या आणि असुरक्षिततेची भावना यामुळे माणसे ताणतणावात आपले जीवन जगत आहेत. अशा वेळी या वेगवेगळ्या प्रकारच्या ताणतणावांचे व्यवस्थापन करण्यासाठी विद्यार्थ्यांनी सकारात्मक विचारांची जोपासना करणे महत्त्वाचे आहे.

ही कार्यशाळा विद्यार्थ्यांमधील वाढते ताणतणाव व व्यसनमुक्तीच्या दृष्टीने अत्यंत यशस्वी झाली, असे प्रतिपादन समारोप समारंभामध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मुकुंद पोंधे यांनी केले.

### डाकले महाविद्यालयात संशोधन पद्धती व प्रकल्प मार्गदर्शन कार्यशाळा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** येथील डाकले महाविद्यालयातील संशोधन केंद्र, अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्ष व वाणिज्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने संशोधन पद्धतीचे मूलभूत तत्त्वे आणि एम. कॉम. प्रकल्पाची रूपरेषा या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

प्राचार्य डॉ. संजय कांबळे यांनी कार्यशाळेचे उद्घाटन केले.

डॉ. कांबळे यांनी प्रभावी व समाजोपयोगी संशोधनाची आवश्यकता प्रतिपादन केली व विद्यार्थ्यांना प्रेरित केले. संशोधनात चिकाटी ठेऊन नाविन्याचा शोध घेण्याचे त्यांनी आवाहन केले. प्रमुख पाहुणे म्हणून सी.ए. प्रा. डॉ. निखिल गोयल, न्यू आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, अहिल्यानगर यांनी प्रकल्प लेखनाची शास्त्रीय रूपरेषा, अहवाल लेखन आणि व्यावहारिक अंग याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

# 'पाथफाईंडर्स' उद्योगासोबत समाजहिताचा संदेश : सुनील देवधर

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** 'पाथफाईंडर्स' हे पुस्तक केवळ उद्योगाची गाथा नसून एका कुटुंबाच्या कर्मयोगाची साधना आहे. स्वतःच्या प्रगतीबरोबरच शेतकरी, कामगार आणि समाजाचेही भले व्हावे, ही भावना ठेवून उद्योग उभा करणाऱ्या कुटुंबाचा हा प्रेरणादायी प्रवास आहे. हा चरित्रग्रंथ उद्योजकतेसह जीवनातील संकटांशी लढणाऱ्या प्रत्येकाला नवे बळ देईल, असा विश्वास राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे भूतपूर्व प्रचारक सुनील देवधर यांनी व्यक्त केला.

येथील खा. गोविंदराव आदिक सभागृहात उद्योजक किशोर निर्मळ व त्यांच्या कुटुंबीयांच्या जीवनप्रवासावर आधारित पत्रकार व लेखक विकास अंत्रे लिखित 'पाथफाईंडर्स' या पुस्तकाचे प्रकाशन देवधर यांच्या हस्ते करण्यात आले. संस्कृती प्रकाशनतर्फे प्रकाशित या कार्यक्रमाला साहित्यिक कैलास दौंड, किसान कनेक्टचे अध्यक्ष सारंगधर निर्मळ, संचालक किशोर निर्मळ, डॉ. विजयाताई निर्मळ, अरविंद निर्मळ, विकास अंत्रे आदी मान्यवर उपस्थित होते.

देवधर म्हणाले की, महाराष्ट्र केवळ विचारवंतांमुळे नव्हे तर संतविचारांनी प्रेरित सामान्य



माणसामुळे घडला आहे. निरक्षर असतानाही आई-वडिलांनी दिलेले संस्कार जपत निर्मळ कुटुंबाने उद्योग उभा करताना शेतकरी, कामगार आणि समाजाला कुटुंब मानले, हीच त्यांची खरी मोठेपणाची जाणीव आहे.साहित्यिक कैलास दौंड यांनी उद्योग उभारणे आणि समाजहिताची भावना जपणे ही मोठी गोष्ट असल्याचे सांगितले. यावेळी विकास अंत्रे व सारंगधर निर्मळ यांनीही मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन संतोष मते यांनी केले, तर आभार रवी भागवत यांनी मानले. कार्यक्रमास विविध क्षेत्रांतील मान्यवर, तरुण आणि साहित्यप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अहिल्यानगरमध्ये 'कॅन्सर केअर' उपक्रम; ३ लाखांहून अधिक नागरिकांपर्यंत जनजागृती

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** इंडियन कॅन्सर सोसायटी, अल्केम फाऊंडेशन आणि जिल्हा आरोग्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने अहिल्यानगर जिल्ह्यात 'सतर्क' या समुदाय-केंद्रित कॅन्सर केअर उपक्रमाची सुरुवात करण्यात आली आहे. या उपक्रमातून संगमनेर, अकोला, पारनेर आणि राहुरी या तालुक्यांमधील ३ लाखांहून अधिक नागरिकांपर्यंत कर्करोगाविषयी जनजागृती पोहोचवण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

या मोहिमेअंतर्गत वैद्यकीय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी आणि आशा कार्यकर्त्यांना विशेष प्रशिक्षण देण्यात येणार आहे. तसेच संगमनेर तालुक्यात मुखाचा, स्तनाचा आणि गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग यांसाठी विनामूल्य तपासणी शिबिरे आयोजित केली जाणार आहेत. जिल्ह्यात या तीन प्रकारच्या कर्करोगांचे प्रमाण अधिक असल्याने लवकर निदान व उपचारांवर विशेष भर देण्यात येणार आहे.

या मोहिमेत एकूण ४५ तपासणी शिबिरे आयोजित केली जाणार असून सुमारे ३,१५० नागरिकांची प्रत्यक्ष वैद्यकीय तपासणी केली जाणार आहे. तसेच विविध माध्यमांतून सुमारे एक लाख नागरिकांमध्ये आरोग्याबाबत जागरूकता निर्माण केली जाणार आहे. तपासणीसाठी एचपीव्ही डीएनए यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार असून एसएमबीटी रुग्णालयाचे सहकार्य लाभणार आहे. इंडियन कॅन्सर सोसायटीच्या नॅशनल मॅनेजिंग ट्रस्टी उषा थोरात यांनी कर्करोगाविषयी योग्य माहिती आणि वेळेवर तपासणी हीच आजारावर मात करण्याची पहिली पायरी असल्याचे सांगितले. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बापूसाहेब नगरगोजे यांनी या उपक्रमामुळे कर्करोगाविषयी जनजागृती वाढून आजाराचे लवकर निदान होण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त केला.




**CHANGE OF NAME**

I HAVE CHANGE MY OLD NAME TAUFIKHUSSAIN BASHIR SHAIKH(Passport No.H0371129) (BEFORE NAME) TO NEW NAME AS TOUFIK BASHIR SHAIKH (AADHAR NO. 9641 9898 6455) FROM VIDE AFFIDAVIT BEFORE NOTARY PUBLIC SHRIRAMPUR PLACE: SHRIRAMPUR DATE : 05/03/2026

# मागील वर्षाचे अतिवृष्टी अनुदान मंजूर

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** श्रीरामपूर तालुक्यातील मे २०२५ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे सुमारे १०८ शेतकऱ्यांच्या उन्हाळ हंगामी बाजरी, भाजीपाला, टरबुज, खरबुज आदी पिकांचे संपूर्ण नुकसान झाले होते. नुकसानीचे पंचनामे होऊनही भरपाई मिळत नसल्याने पिडीत शेतकरी भारत भवार, भाऊसाहेब पटारे, काकासाहेब कोकणे, सचिन माने यांनी आ. हेमंत ओगले यांना वस्तुस्थिती समजावून सांगितल्याने, आ. ओगले यांनी सातत्यपूर्ण पाठपुरावा केल्याने भरपाईची रक्कम मंजूर होऊन लाभार्थी शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा झाली आहे. मे २०२५ या महिन्यात तालुक्यात अनेक ठिकाणी अतिवृष्टी झाली होती. या अतिवृष्टीमुळे उन्हाळ हंगामी काढणीस आलेल्या बाजरी, भाजीपाला, टरबुज, खरबुज या पिकांचे शंभर टक्के नुकसान झाले होते. त्यानंतर या पिकांच्या नुकसानीचे पंचनामेही झाले होते. मात्र भरपाई मिळाली नव्हती. त्यानंतर सप्टेंबर व ऑक्टोबर महिन्यात राज्यभर झालेल्या अतिवृष्टीमुळे खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. दोन हंगामात दोनवेळा नुकसान झाल्याचे त्यांनी आ. ओगले यांच्या निदर्शनास आणून दिले. आ. ओगले यांनीही मुख्यमंत्री, कृषीमंत्री यांच्याकडे सातत्यपूर्ण पाठपुरावा केल्याने तालुक्यातील सुमारे १०८ शेतकऱ्यांना याबाबत या नुकसान भरपाईचा लाभ मिळाला आहे. सदर रक्कम लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा झाल्याने लाभार्थी शेतकऱ्यांनी आ. ओगले यांना धन्यवाद दिले आहेत.

# पुण्यातील विद्यार्थ्यांना अनुभवायला मिळणार राष्ट्रीय स्तरावरील तांत्रिक आणि सांस्कृतिक महोत्सव

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजीनियरिंग येथे दि. ६ व ७ मार्च २०२६ रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ४ या वेळेत 'स्पेक्ट्रम' या राष्ट्रीय स्तरावरील तांत्रिक व सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

अभियांत्रिकी शिक्षण घेत असलेल्या प्रथम वर्ष विद्यार्थ्यांसाठी हा महोत्सव विशेषतः आयोजित करण्यात येत असून तो प्रथम वर्ष विद्यार्थ्यांकडूनच राबविला जात आहे. महाविद्यालयीन जीवनाची सुरुवात करणाऱ्या विद्यार्थ्यांना स्वतःची क्षमता ओळखण्याची आणि राष्ट्रीय स्तरावर छाप पाडण्याची संधी या माध्यमातून मिळणार आहे.

देशभरातील विविध अभियांत्रिकी महाविद्यालयांतील विद्यार्थी सहभागी होऊ शकतात. तांत्रिक ज्ञान व कौशल्यांची कसोटी पाहण्यासाठी रोबो ड्राइव्ह, ई-पॅराडॉक्स, ब्लाइंड कोडिंग आणि हाय पिंग अशा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. रोबो ड्राइव्हमध्ये स्वतः तयार केलेल्या रोबोटच्या साहाय्याने कार्य पूर्ण करावे लागणार आहे, तर ई-पॅराडॉक्समध्ये तांत्रिक समस्यांवर उपाय शोधण्याची क्षमता तपासली जाईल. ब्लाइंड कोडिंगमध्ये स्क्रीनकडे न पाहता कोड लिहिण्याचे आव्हान देण्यात येणार आहे.

तांत्रिक स्पर्धांबरोबरच वादविवाद, मॉडेल मेकिंग आणि मॉलेक्युलर मॉडेलिंगसारखे उपक्रमही आयोजित करण्यात आले आहेत. यामधून विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलता, कल्पकता व विश्लेषणात्मक विचारशक्तीला चालना मिळणार आहे.

या महोत्सवाचा उद्देश प्रथम वर्ष विद्यार्थ्यांना व्यापक व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा आहे. स्पर्धात्मक वातावरणाची सवय लागावी, कल्पना मांडण्याची व प्रयोगशीलता दाखविण्याची संधी मिळावी, यासाठी हा उपक्रम राबविण्यात येत आहे. विविध राज्यांतील विद्यार्थ्यांशी संवादामुळे दृष्टीकोन व्यापक होऊन ज्ञानविनिमय वाढीस लागेल.

महाविद्यालयातील सर्व शिक्षकवृंद व सहकारी यांचे सहकार्य लाभले असून स्पर्धांचे परीक्षण अनुभवी परीक्षकांकडून केले जाणार आहे. सहभागी विद्यार्थ्यांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन प्रथमवर्ष शाखेच्या विभागप्रमुख डॉ. लीना शर्मा व तसेच त्यांचे सहकारी डॉ. निशी गुप्ता, डॉ. संजय मापारी व डॉ.महादेव कदम यांनी केले आहे. 'स्पेक्ट्रम' हा महोत्सव विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रेरणादायी व्यासपीठ ठरेल, असा विश्वास विद्यार्थी प्रतिनिधी अर्जुन खलाटे, श्रावणी वाबळे, अनय गावंडे, ईश्वरी पांढरे, कार्तिक राणा आणि बलविंदर सिंग यांनी व्यक्त केला आहे.

## नशिबाची परिक्षा

**शुक्रवार दि . ६ मार्च २०२६**

### मिलनम डे

| उदय-अस्त | | | जोड |
|---|---|---|---|
| १४० २३० ७८० | ५-७ | १२४ ४६७ १३८ | ५१-६७-२४ ९०-७३ |

सिंगल ५-१-९ मजबुत

### कल्याण

| उदय-अस्त | | | जोड |
|---|---|---|---|
| १२६ ४५० ९०० | ९-२ | १५६ २४६ २२८ | ९०-३२-८१-७४-२५ |

सिंगल ९-४-५ मजबुत

### मुंबैम (मेन)

| उदय-अस्त | | | जोड |
|---|---|---|---|
| १२३ २४० २६८ | ६-५ | १४० २३० ६९० | ६८-१५-९२ ३०-५४ |

सिंगल ४-७-९ मजबुत

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 08/12/2025 to 12/12/2025 | 239 42 147 | 469 92 138 | 130 43 300 | 889 57 179 | 110 22 480 |
| 15/12/2025 to 19/12/2025 | 120 37 359 | 233 86 169 | 237 27 557 | 378 80 578 | 134 85 500 |
| 22/12/2025 to 26/12/2025 | 220 41 470 | 160 76 466 | 600 67 449 | 680 47 340 | 336 27 368 |
| 29/12/2025 to 02/01/2026 | 259 63 599 | 340 75 348 | 250 71 344 | 136 05 140 | 123 64 699 |
| 05/01/2026 to 09/01/2026 | 477 86 178 | 458 73 580 | 355 34 338 | 239 46 259 | 123 67 188 |
| 12/01/2026 to 16/01/2026 | 490 33 148 | 190 09 126 | 479 08 468 | 116 84 770 | 358 62 147 |
| 19/01/2026 to 23/01/2026 | 148 35 258 | 125 86 169 | 336 20 136 | 199 96 330 | 258 59 559 |
| 12/01/2026 to 16/01/2026 | 490 33 148 | 190 09 126 | 479 08 468 | 116 84 770 | 358 62 147 |
| 19/01/2026 to 23/01/2026 | 148 35 258 | 125 86 169 | 336 20 136 | 199 96 330 | 258 59 559 |
| 26/01/2026 to 30/01/2026 | *** ** *** | 120 30 118 | 679 23 346 | 134 83 247 | 249 52 138 |
| 02/02/2026 to 06/02/2026 | 129 28 170 | 249 55 780 | 570 20 677 | 377 73 247 | 134 87 458 |
| 09/02/2026 to 13/02/2026 | 378 82 778 | 126 93 157 | 679 22 570 | 139 34 400 | 689 30 145 |
| 16/02/2026 to 20/02/2026 | 347 46 358 | 156 29 568 | 779 38 233 | 126 92 246 | 123 65 456 |
| 23/02/2026 to 27/02/2026 | 250 76 457 | 229 39 469 | 266 48 170 | 168 53 580 | 145 09 568 |

* वरील शुभांक किंवा संख्या या ज्योतिषशास्त्र व संख्याशास्त्रावर आधारित आहेत. या शुभांकांचा कोणताही दुरुपयोग करू नये *

## द • ख • ल

### श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात दोन दिवसीय राष्ट्रीय परिषद

**लिंपणगाव** : श्रीगोंदा येथील श्री छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात 'विकसित भारत २०४७ मध्ये महाविद्यालयांचे योगदान' या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. ही परिषद ६ व ७ मार्च २०२६ रोजी आयोजित करण्यात आली असून देशातील नामवंत शिक्षणतज्ज्ञ आणि कुलगुरू या परिषदेत मार्गदर्शन करणार असल्याची माहिती प्राचार्य डॉ. सतीशचंद्र सूर्यवंशी यांनी दिली. संस्थेचे अध्यक्ष राजेंद्रदादा नागवडे यांच्या प्रेरणेने या परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. भारताला २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र बनविण्याच्या उद्दिष्टाच्या पार्श्वभूमीवर महाविद्यालयीन स्तरावर संशोधन, नवोपक्रम आणि शैक्षणिक प्रगती कशी असावी यावर या परिषदेत सखोल चर्चा होणार आहे. या परिषदेत उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे संचालक डॉ. शैलेंद्र देवळानकर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, रयत विद्यापीठ (सातारा) येथील कुलगुरू डॉ. ज्ञानदेव म्हस्के तसेच एस.के.बी. विद्यापीठ (कोलकाता) येथील माजी कुलगुरू डॉ. दीपक रंजन मंडल हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार आहेत.

### संकष्टीनिमित्त आव्हाणे येथे विविध धार्मिक कार्यक्रम




**ढोरजळगांव** : शेवगाव तालुक्यातील आव्हाणे बु येथील श्री गणपती मंदिर टस्ट येथे शुक्रवार दि ६ मार्च रोजी संकष्टीनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.सकाळी ७ वा पैठण वरून आणलेल्या गंगेच्या पाण्याने श्रीची आरती व महाभिषेक विक्रम खैरे यांच्या हस्ते होणार असून दुपारी १२ वाजता भाविकांना फराळाची व्यवस्था खैरे यांच्यावतीने करण्यात आली आहे. सायं ६ वा हभप संदीप महाराज म्हस्के यांचे जाहीर हरी किर्तन होईल.सायं ७ वा श्रीची अरती व महाभिषेक किशोर आहेर यांच्या हस्ते होणार आहे.रात्री ९ वा भाविक भक्तासाठी महाप्रसादाची व्यवस्था आहेर यांच्यावतीने करण्यात आली . आहे.रात्री दहा वाजता दादोबा देव एकतारी भजनी मंडळाचा जागराचा कार्यक्रम होईल.तरी या धार्मिक कार्यक्रमाचा पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा,असे आवाहन निद्रिस्त गणपती मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष प्रा.मालोजीराव भुसारी ,सरचिटणीस अर्जुनराव सरपते, कार्यालयीन सचिव लक्ष्मणराव मुटकुळे व माजी विश्वस्त अंकुश कळमकर,रामदास दिवटे,कारभारी तळेकर,नारायण जाधव यांनी केले आहे.

# पर्यावरण संवर्धन हीच संस्कृती

## अहिल्यानगरच्या घुले पाटील कॉलेजचा स्तुत्य उपक्रम

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**ढोरजळगांव** : वाढत्या उन्हाची तीव्रता लक्षात घेऊन मुक्या पक्ष्यांची तहान भागवण्यासाठी अहिल्यानगर येथील जनता शिक्षण प्रसारक मंडळाच्या मारुतरावजी घुले पाटील कला,वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयाने यंदाही सामाजिक जबाबदारीतून वृक्षराजीवर पाण्याची पात्रे (पाणवठे) लटकवली आहेत.

सध्या उन्हाचे चटके वाढू लागल्याने पशू-पक्षांचे पिण्याच्या पाण्यावाचून हाल होत आहेत. अनेक पक्षी पाण्यासाठी जंगलातून शहराकडे आणि मानवी वस्तीकडे धाव घेत आहेत.हीच गरज ओळखून महाविद्यालयाच्या वनस्पतीशास्त्र (बॉटनी), प्राणीशास्त्र (झूलॉजी) आणि इतिहास विभागाने एकत्रितरीत्या महाविद्यालय परिसरात जलपात्रे लावून पक्षांसाठी पिण्याच्या पाण्याची सोय केली आहे.






पक्षी हे पर्यावरणातील महत्त्वाचे घटक असून ते बीजवहनाचे कार्य करतात. त्यांना वाचवणे आपले कर्तव्य आहे,या उपक्रमांतर्गत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी आपल्या पिण्याच्या पाण्याच्या बाटलीतील शिल्लक पाणी इतरत्र न टाकता,झाडांवर लावलेल्या पात्रांमध्ये ओतावे, जेणेकरून पक्ष्यांची तहान भागेल व कॉलेज परिसरात पर्यावरणीय संवर्धन होईल.
**कला शाखाप्रमुख, प्रा.एस.व्ही.मरकड**

निसर्गरम्य परिसरामुळे पक्षांचा राबता महाविद्यालयीन परिसरात फळझाडे-आंबा, फणस, जांभूळ, सीताफळ, रामफळ, पेरू, आवळा, चिंच, नारळ, लिंबू, कवट, चेरी, बदाम औषधी व सावलीचे वृक्ष- कडुलिंब, बेल,वड, पिंपळ, पिंपरी, हिरडा, बेहडा, करंज, बकुळ, सप्तपर्णी, उंबर, कदम,बाहावा शोभिवंत व इतर वृक्ष-अशोका, कांचन, पिंपरी, फायकस,बॉटल पाम, फिशटेल पाम,निलगिरी, बांबू, हादगा, टर्मिनलियां यांसारख्या विविध प्रकारच्या वृक्षराजीमुळे निसर्गरम्य वातावरण तयार झाले आहे.या दाट झाडीमुळे परिसरात पक्षी आणि खारुताईंची संख्या मोठी आहे.

या जैवविविधतेचे रक्षण व्हावे आणि कडक उन्हात एकाही पक्षाचा पाण्यासाठी मृत्यू होऊ नये, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.विद्यार्थी व प्राध्यापकांच्या योगदानातून पर्यावरण हा केवळ अभ्यासाचा किंवा चर्चेचा विषय नसून तो कृतीचा विषय झाला आहे.

### शेवगाव भाजी मंडईतील वेळ मर्यादेविरोधात शेतकऱ्यांचे निवेदन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शेवगाव** : येथील भाजी मंडईमध्ये शेतकऱ्यांवर लादण्यात आलेल्या सक्तीच्या वेळ मर्यादा, भेदभाव आणि आर्थिक शोषणाविरोधात स्वाभिमानी शेतकरी संघटना व वंचित आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी तहसीलदारांना निवेदन दिले. मंडईत सकाळी ११ वाजेपर्यंतच भाजी विक्री करण्याची सक्ती केली जात असून त्यानंतर शेतकऱ्यांना उठवले जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. ग्रामीण भागातील शेतकरी पहाटेपासून प्रवास करून स्वतः पिकवलेला भाजीपाला विक्रीसाठी मंडईत आणतात. नगरपरिषदेचे अधिकृत शुल्क भरून पावती घेत असतानाही मर्यादित वेळ दिल्यामुळे त्यांचे आर्थिक नुकसान होत असल्याचे निवेदनात नमूद आहे. तसेच व्यापाऱ्यांना प्रमुख जागा देऊन शेतकऱ्यांना मागील बाजूस बसवले जात असल्याने विक्रीवर परिणाम होत असल्याची तक्रार करण्यात आली. शेतकऱ्यांना दिवसभर विक्रीसाठी जागा देणे, व्यापारी व शेतकरी यांच्यासाठी स्वतंत्र व्यवस्था करणे आणि वेळ मर्यादा रद्द करण्याची मागणी करण्यात आली आहे. सात दिवसांत निर्णय न झाल्यास १६ मार्च रोजी तहसील कार्यालयासमोर मोफत भाजीपाला वाटप करून आंदोलन करण्याचा इशाराही देण्यात आला.



## मौजमजेपेक्षा पुढील दहा वर्षांचा विचार करून वाटचाल करा : डॉ. महावीर सिंग चौहान

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पाथर्डी** : शुद्ध आचरण, निर्व्यसनीपणा, जिद्द आणि परिश्रमाची तयारी असलेला विद्यार्थीच आयुष्यात यशाची शिखरे गाठू शकतो. क्षणिक आकर्षण असलेल्या मौजमजेच्या मागे न लागता विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन जीवनातील पुढील दहा वर्षांचा विचार करून आपली दिशा ठरवावी, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक तथा महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे विद्यार्थी कल्याण अधिकारी आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक प्रा. डॉ. महावीर सिंग चौहान यांनी केले. पाथर्डी येथील बाबूजी आव्हाड महाविद्यालयात आयोजित वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पार्थ विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष तथा नगराध्यक्ष अभय आव्हाड होते. यावेळी उपाध्यक्ष ड. सुरेश आव्हाड, प्राचार्य डॉ. बबन



चौरे, ज्येष्ठ पत्रकार अविनाश मंत्री, राजेंद्र देवडे, अमोल कांकरिया, अनिल खाटेर, शारीरिक शिक्षण संचालक डॉ. विजय देशमुख, प्रा. सचिन शिरसाठ, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. अशोक डोळस, डॉ. अशोक कानडे आदी मान्यवर उपस्थित होते.

डॉ. चौहान यांनी राष्ट्रभक्ती, समाजनिष्ठा, संवेदनशील जीवनशैली आणि जबाबदार नागरिकत्व या विषयांवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कविता, पोवाडे, शेर-शायरी आणि स्फूर्तिगीतांच्या माध्यमातून त्यांनी प्रभावी विचार मांडले. त्यांच्या प्रभावी सादरीकरणाला उपस्थितांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. महाविद्यालयीन जीवन हे व्यक्तिमत्त्व घडविण्याचा महत्त्वाचा टप्पा असून या काळात विद्यार्थ्यांच्या आयुष्याची दिशा ठरते, असे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांनी कुटुंबीय, शिक्षक व अनुभवी व्यक्तींशी चर्चा करूनच निर्णय घ्यावेत, असेही आवाहन केले. समारंभात कला, क्रीडा, साहित्य, संस्कृती तसेच सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व वार्षिक अहवाल वाचन प्राचार्य डॉ. बबन चौरे यांनी केले. सूत्रसंचालन मन्सूर शेख व प्रा. शेखर ससाणे यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. अभिमन्यू ढोरमारे यांनी मानले.

# श्रीगोंद्याच्या विकासकामांना गती द्या : बबनराव पाचपुते

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**लिंपणगाव** : माजी मंत्री बबनराव पाचपुते यांच्या अध्यक्षतेखाली श्रीगोंदा नगर परिषदेच्या नवनिर्वाचित नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष व नगरसेवकांची महत्त्वपूर्ण आढावा बैठक पार पडली. शहरातील विविध विकासकामांचा आढावा घेऊन प्रलंबित कामे तातडीने मार्गी लावण्याबाबत यावेळी सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीत शहरातील रस्ते दुरुस्ती, पाणीपुरवठा, गटारी व जलनिस्सारण व्यवस्था, स्वच्छता, प्रकाशयोजना तसेच इतर मूलभूत सुविधांशी संबंधित कामांचा आढावा घेण्यात आला. काही ठिकाणी कामांचा वेग मंदावल्याचे निदर्शनास आल्याने संबंधित विभागांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या. अपूर्ण व रखडलेल्या कामांबाबत जबाबदारी निश्चित करून ती कामे निश्चित कालावधीत पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले. नव्याने प्रस्तावित विकासकामांमध्ये गुणवत्तेला प्राधान्य देण्यात यावे, निधीचा योग्य व पारदर्शक वापर व्हावा आणि कामांमध्ये कोणतीही त्रुटी राहू नये, यावर विशेष भर देण्यात आला. नागरिकांना मूलभूत सोयी-सुविधा वेळेत उपलब्ध करून देणे ही नगर परिषदेची प्राथमिक जबाबदारी असून त्यासाठी सर्वांनी समन्वयाने काम करणे आवश्यक असल्याचे पाचपुते यांनी स्पष्ट केले. शहराच्या सर्वांगीण विकासासाठी प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांच्यात सुसंवाद व सहकार्य असणे गरजेचे असल्याचेही त्यांनी नमूद केले. नागरिकांच्या समस्या जाणून घेऊन त्यांचे तातडीने निराकरण करण्यासाठी प्रभावी यंत्रणा उभारावी, अशा सूचनाही यावेळी देण्यात आल्या. या बैठकीमुळे नगर परिषद प्रशासनाच्या कामकाजाला अधिक स्पष्ट दिशा मिळाली असून आगामी काळात विकासकामांना निश्चितच गती मिळेल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

# आनंदऋषीजी हॉस्पिटलची २५ वर्षे रुग्णसेवा

## जनरल सर्जरी शिबिरात ६० रुग्णांची तपासणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**अहिल्यानगर** : राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज यांच्या प्रेरणेने मागील २५ वर्षांपासून आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या माध्यमातून अखंड रुग्णसेवा सुरू असून हे हॉस्पिटल मानवसेवेचे आदर्श मॉडेल ठरले आहे, असे प्रतिपादन भगवान महावीर भोजनालयाचे संचालक मिलापचंद पटवा यांनी केले.

जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटल ण्ड मेडिकल रिसर्च सेंटरतर्फे राष्ट्रसंत आनंदऋषीजी महाराज यांच्या ३४ व्या स्मृतिदिनानिमित्त मिलापचंद पटवा परिवाराच्या सहकार्याने आयोजित जनरल सर्जरी शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी रुपेश पटवा, अमित पटवा, लीलाबाई पटवा, नम्रता पटवा, निकिता पटवा, संतोष बोथरा, डॉ. प्रकाश कांकरिया, डॉ. वसंत कटारिया, सतीश लोढा, सुभाष मुनोत, मानकचंद कटारिया, वसंत चोपडा, डॉ. आशिष भंडारी, जनरल सर्जन डॉ. प्रवीण मुनोत, डॉ. विवेक भापकर आदी उपस्थित होते. मिलापचंद पटवा म्हणाले की, रुग्णांसोबत त्यांच्या नातेवाईकांचीही सोय व्हावी या उद्देशाने भगवान महावीर भोजनालयाच्या माध्यमातून अल्पदरात सात्विक व पोटभर जेवणाची व्यवस्था करण्यात आली आहे.

दररोज सुमारे दीड ते दोन हजार नागरिक या सेवांचा लाभ घेत आहेत. शिबिरात ६० रुग्णांची मोफत तपासणी करण्यात आली. गरजू रुग्णांवर अपेंडिक्स, हर्निया व हायड्रोसिल यांसारख्या शस्त्रक्रिया सवलतीच्या दरात करण्यात येणार आहेत. तसेच ८ मार्च रोजी आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त कॅन्सर तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. आशिष भंडारी यांनी केले, तर आभार सुभाष मुनोत यांनी मानले.

## माती-मुरूम माफियांचा सुळसुळाट,

### सुट्टीत 'धडाकेबाज' उत्खनन; महसूल झोपेत!

**प्रतिनिधी / दादा सोनवणे**

**श्रीगोंदा** : तालुक्यात सध्या माती आणि मुरूम तस्करीने अक्षरशः डोके वर काढले आहे. आठवडाभर चोरट्या मार्गाने होणारी चोरी शांत भासणारी खाणी शनिवार-रविवारी मात्र जिवंत होतात रात्रीसह दिवसाही जेसीबीची करकर, डंपरची घरघर आणि धुळीचे ढग हा सगळा खेळ परवानगीशिवाय सुरू असल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांकडून होत आहे. तालुक्यात शहरासह ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात माती मुरूम यासह विविध प्रकारच्या गौण खनिज तस्करीला चांगलेच पेव फुटले आहे ग्रामीण तस्करांचे 'वीकेंड' स्पेशल ऑपरेशन? जोमात सुरु असते परिसरातील स्थानिकांच्या मते, शुक्रवारी संध्याकाळपासून रविवारी मध्यरात्रीपर्यंत सर्वाधिक जोमाने उत्खनन होते.

याचे कारण सरळ आहे रस्त्यावर तपासण्या कमी, अधिकारी सुट्टीवर, आणि माफियांना मोकळं मैदान! मिळते त्यामुळे सर्वात जास्त उत्खनन वाहतूक होते परिसरातील स्थानिक लोक म्हणतात आम्ही शेतकरी पावसाची वाट पाहतो, आणि हे लोक जेसीबीची, अशी संतप्त प्रतिक्रिया एका शेतकऱ्याने दिली. तालुक्यात ओढे-नाले आणि तलाव परिसर,शेतजमिनींच्या कडेला ग्रामपंचायत हद्दीतील मोकळी जमीन, सरकारी जमिनी, तसेच शेतकऱ्याकडून खाजगी क्षेत्रात विकली जाणारी माती या बेकायदेशीर उपशामुळे जमिनीची सुपीकता घटते, पाण्याचा नैसर्गिक प्रवाह बदलतो आणि भविष्यातील जल साठ्यावर परिणाम होतो. विकासाच्या नावाखाली पर्यावरणाची ही उघडी लूट



असल्याचे पर्यावरणप्रेमींचे म्हणणे आहे.महसूल यंत्रणेला अनेकदा शेतकरी माहिती देतात तेव्हा कधीतरी एखाद्या ट्रॅक्टरवर कारवाई आणि मग पुन्हा शांतता पसरते मात्र मोठे डंपर मात्र बिनधास्त माती घेऊन फिरताना दिसतात.त्यामुळे तस्करी दिसते सगळ्यांना, पण कारवाई करतच नाही त्यामुळे मात्र दिसत नाही ?असे बोलले जात आहे.

यामुळे शासनाला तोटा, गावाला फटका बसत आहे बेकायदेशीर उत्खनामुळे शासनाच्या महसुलाला लाखो रुपयांचा तोटा, रस्त्यांची दुरवस्था, धुळीमुळे आरोग्याच्या तक्रारी निर्माण होत आहेत तसेच काही जण म्हणतात ही केवळ माती नाही; ही गावाच्या भविष्याची पायाभरणी आहे. आणि तीच जर उचलून नेली, तर उद्या पायाखालची जमीनच उरणार नाही. त्यामुळे याकडे जिल्हाधिकारी यांनी लक्ष केंद्रित करण्याची गरज निर्माण झाली आहे. त्यामुळे आता कारवाईचा आवाज मोठा होणार, की डंपरची घरघरच ऐकू येत राहणार? असा प्रश्न जनतेच्या मनात निर्माण झालं आहे.

## कुकडी डावा कालव्याला ५०० क्युसेक्सने पाणी; शेतकरी व नागरिकांत आनंद

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नगर** : कुकडी डावा कालव्याला गुरुवार (दि. ५) रोजी सकाळी १० वाजता एडगाव धरणातून ५०० क्युसेक्सने पाणी सोडण्यात आल्याची माहिती पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अधिकारी तान्हाजी खाडे यांनी दिली. यामुळे कालवा परिसरातील शेतकरी व नागरिकांत समाधान व्यक्त होत आहे.

गेल्या पंधरा दिवसांपासून कालवा परिसरातील गावांमध्ये पिण्याच्या व शेतीच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली होती. त्यामुळे शेतकऱ्यांनी पाणी तातडीने सोडण्याची मागणी आमदार काशिनाथ दाते यांच्यासह विविध पदाधिकाऱ्यांकडे केली होती. या मागणीची दखल घेत आमदार दाते यांनी जलसंपदामंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना निवेदन देऊन कुकडी कालवा व पिंपळगाव जोगा धरणाचे पाणी सोडण्याची मागणी केली होती. दरम्यान, पाणी जास्त क्युसेक्सने सोडावे या मागणीसाठी निघोज येथील एस.टी. बसस्थानक परिसरात डॉ. भास्कर शिरोळे, सभापती किसन रासकर व माजी सरपंच ठकाराम लंके यांच्या नेतृत्वाखाली रास्ता रोको आंदोलन करण्यात आले होते.

त्यानंतर प्रशासनाने ५०० क्युसेक्सने पाणी सोडण्याचा निर्णय घेतला. या पाण्यामुळे कांदा, ऊस, मका, हिरवा चारा आदी पिकांना मोठा दिलासा मिळणार असून पिण्याच्या पाण्याची टंचाईही कमी होण्याची अपेक्षा आहे. पाणी सोडल्याबद्दल नागरिकांनी जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे, आ. काशिनाथ दाते तसेच पाटबंधारे विभागाचे आभार मानले आहेत.



# घायपातवाडी जवळ वनजमिनीत बेकायदेशीर वृक्षतोड?

## वन विभाग मात्र 'अनभिज्ञ'

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा** : श्रीगोंदा-जामखेड रोडवरील घायपातवाडी परिसरात महाराष्ट्र शासनाच्या वन विभागाच्या जमितीतून बेसुमार वृक्षतोड सुरु असून हजारो वृक्षाची कत्तल झाली आहे या वृक्षतोडीमुळे पर्यावरणाचा मोठा ऱ्हास होत असतानाही संबंधित वन विभाग मात्र या प्रकरणाबाबत अनभिज्ञ असल्याचे दिसून येत आहे, त्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

श्रीगोंदा-जामखेड रोडवरील घायपातवाडी परिसरात महाराष्ट्र शासनाच्या



वन विभागाच्या गट क्रमांक १२३७ व १२०८ मधील जमिनीत मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर वृक्षतोड झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या वृक्षतोडीमुळे पर्यावरणाचा मोठा ऱ्हास होत असतानाही संबंधित वन विभाग मात्र या प्रकरणाबाबत अनभिज्ञ असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.स्थानिकांच्या माहितीनुसार, काही दिवसांपासून या भागात मौल्यवान झाडे तोडून लाकूड बाहेर काढण्याचे प्रकार सुरू आहेत.

रात्रीच्या वेळी यंत्राच्या साहाय्याने झाडांची कत्तल केली जात आहे. वन विभागाच्या अखत्यारीतील जमिनीत अशा प्रकारे झाडे तोडली जात असताना संबंधित अधिकारी किंवा कर्मचारी घटनास्थळी दिसत नसल्याने ही तोड कोणाच्या आशीर्वादाने? असा प्रश्न नागरिक विचारत आहेत.

वन क्षेत्रात वृक्षसंवर्धनाची जबाबदारी बीटगार्ड व वन अधिकाऱ्यांवर असते आणि अशा गुन्ह्यांवर नियंत्रण ठेवणे ही त्यांची कर्तव्ये असतात.मात्र घायपातवाडी परिसरातील घटनेत वन विभागाची भूमिका संशयास्पद असल्याची चर्चा रंगली आहे. त्यामुळे या प्रकरणात काही अधिकारी किंवा कर्मचारी सामील असण्याची शक्यता नागरिकांतून व्यक्त केली जात आहे. दरम्यान, हा प्रकार उघडकीस आल्यानंतरही प्रशासनाने दुर्लक्ष केल्यास पर्यावरणप्रेमी व स्थानिक नागरिक आंदोलनाचा इशारा देण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

### परिसरातील नागरिकांची मागणी

या घटनेचा तात्काळ स्थळ पंचनामा करून तपास करण्यात यावा तसेच बेकायदेशीर वृक्षतोड करणाऱ्यांवर गुन्हा दाखल करावा तसेच संबंधित वन अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करावी आणि वनाधिकारी याच्यावर कारवाई करण्याची मागणी परिसरातील नागरिकांनी माध्यमांशी बोलताना केली आहे.

### अधिकारी नेहमी नॉट रिचेबल

याबाबत माहिती घेण्यासाठी श्रीगोंदा वन विभागाचे रेंज फॉरेस्ट ऑफिसर युवराज पाचारणे यांच्याशी संप्रर्क साधला असता त्याचा मोबाईल नॉट रिचेबल होता याबाबत परिसरातील नागरिकांशी चर्चा केली असता अधिकारी कधीही कार्यालयात येत नाही तसेच मोबाईल कायम नॉट रिचेबल असल्यामुळे चोरांचे चांगले फावले जात आहे, की अधिकारी यामध्ये सामील आहेत हेच समजत नाही.

प्रोसेस फी जमा रु. १५/-
प्रो. पान नं.
दिनांक :

### जाहीर नोटीस

ॲड.एस.एन. जहागिरदार
श्रीरामपूर
निशाणी क्र. २.२

श्रीरामपूर येथील मे. मोटार अपघात न्यायाधीकरण साहेब, यांचे कोर्टात एम.ए.सी.पी.नं.
२४१/२०२४

**अर्जदार**-अमोल किरण मिसाळ
**सामनेवाले**-मोसीन बाबुलाल शेख व इतर
प्रति,
१) मोसीन बाबुलाल शेख
रा. जुने जोर्वे रोड, अलकानगर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर,

या जाहीर नोटीस/समन्स द्वारे आपणास कळविण्यात येते की, ज्याअर्थी अर्जदार इतर यांनी श्रीरामपूर येथील मे. मोटार अपघात न्यायाधीकरण साहेब यांचे कोर्टात एम.ए.सी.पी.नं. २४१/२०२४ चा क्लेम रक्कम रु.७,००,०००/- मिळणेसाठी तुमचे विरुध्द व तुमचे गाडीचे इन्शुरन्स कंपनीविरुध्द दाखल केलेला आहे. दि.८/५/२०२४ रोजी तुमच्या मालकीची ट्रक नं.एम.एच १४ इ.एम. ६१९९ वरील चालक नियाजभाई करीम शेख याने त्याचे ताब्यातील ट्रक ही अतिशय भरधाव वेगाने व रस्त्याच्या परिस्थीतीकडे दुर्लक्ष करुन रॉंग साईडने येवून नेवासा बाजूकडून श्रीरामपूर बाजूकडे चालवत असताना रेल्वे ओव्हर ब्रीज वर अर्जदार अमोल किरण मिसाळ चालवत असलेली मोटारसायकल नं. एम.एच. १७ बी.बी. ०५०४ ही समोरुन रॉंग साईडने येवून अपघात करुन अर्जदार यास गंभीररित्या जखमी केले. त्याबाबत नुकसान भरपाई मिळण्यासाठी अर्जदाराने मे. न्यायालयात क्लेम दाखल केलेला आहे. सदर क्लेमची पुढील तारीख १०/०४/२०२६ अशी नेमण्यात आलेली आहे. तरी तुम्ही सदर तारखेस सकाळी १०.३० वा. तुम्ही स्वतः अगर तुमचे वतीने अधिकार दिलेल्या व्यक्तीमार्फत हजर राहून तुमचा पत्ता सादर करुन तुमचे म्हणणे सादर करावे. तुम्ही सदर तारखेस हजर राहून तुमचे म्हणणे सादर न केल्यास क्लेमची सुनावणी तुमचे गैरहजेरीत होऊन निकाल दिला जाईल याची नोंद घ्यावी. त्यानंतर तुमची कोणतीही तक्रार चालणार नाही.

आज दि. २७/०२/२०२६ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाचे शिक्यानिशी ही जाहीर नोटीस दिली असे.

**तयार करणार**
**लिपीक**
**जिल्हा न्यायालय, श्रीरामपूर**

शिक्का

**हुकुमावरून**
**अधिक्षक**
**जिल्हा न्यायालय, श्रीरामपूर**

# शिक्रापुर येथे बार काढणाऱ्या बुलेटस्वारांना दणका

## दुचाक्यांचे बार निघणारे सायलेन्सर नष्ट,: तर चारचाकीच्या काळ्या काचा देखील पांढऱ्या

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**तळेगाव ढमढेरे :** शिरूर तालुक्यातील शिक्रापूर पोलीस स्टेशन हद्दीमध्ये वेगवेगळ्या ठिकाणी बुलेटच्या सायलेंन्सर मधून कर्ण कर्कश आवाज काढून फिरणाऱ्यांसह काळ्या काचांची वाहने, फेन्सी नंबर प्लेट अशा वाहनांवर शिक्रापूर पोलिसांनी कारवाई केली आहे.

शिक्रापूर (ता. शिरुर) पोलीस स्टेशन हद्दीमध्ये बुलेटचे आवाज काढून फिरणाऱ्यांसह फेन्सी नंबर प्लेट तसेच काळ्या काचांच्या वाहनांवर पोलीस निरीक्षक दिपरतन गायकवाड, पोलीस उपनिरीक्षक विजय मस्कर, सोमनाथ कचरे, जितेंद्र पानसरे, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक शंकर साळुंके, पोलीस हवालदार श्रावण गुपचे, अमोल चव्हाण, गणेश करपे, संदीप बनकर, रफिक शेख, विश्वंबर वाघमारे, प्रतिक जगताप, विकास कारखिले, सोमनाथ परभने, नारायण सानप, नागेश वाघमारे, मच्छिंद्र निचित, सुशील माने, नितीन साळवे, संतोष बाबर यांसह आदींनी परिसरात नाकाबंदी करत कर्कश आवाजाची वाहने, फेन्सी नंबर प्लेट, काळ्या काचांची वाहने ताब्यात घेत दंडात्मक कारवाई केली, मात्र फक्त दंडात्मक कारवाई न करता कर्कश आवाजाचे सायलेंन्सर व फेन्सी नंबर प्लेट वाहन चालकांच्या हातानेच नष्ट केले केली आहे, तर पोलिसांनी केलेल्या कारवाई मुळे बेशिस्त वाहन चालकांनी चांगलाच धसका घेतला आहे तर पोलिसांच्या कारवाईचे परिसरातून कौतुक होत आहे.



शिक्रापूर ता. शिरुर येथे बेशिस्त वाहन चालकांवर कारवाई करताना पोलीस.
(छायाचित्र आकाश भोरडे)

### थेट पुढाऱ्याच्या कारच्या फिल्मिंग काढल्या

शिक्रापूर पोलिसांनी कारवाई करताना कोणाचीही गय केली नसून यावेळी आलेल्या एका पुढाऱ्याच्या कारच्या काचांची काळी फिल्मिंग देखील पोलिसांनी काढून कारवाई मध्ये दुजाभाव नसल्याचे दाखवून दिले आहे.

---------------------------

कारवाई सुरुच राहणार – दिपरतन गायकवाड ( पोलीस निरीक्षक ) शिक्रापूर पोलीस पोलीस स्टेशन हद्दीमध्ये अशा प्रकरच्या कडक कारवाया सुरुच राहणार नसून कारवाई मध्ये कोणाचीही गय केली जाणार नसून वाहनांचे सायलेन्सर बदलून देणाऱ्यांवर देखील लवकरच कारवाई करणार असल्याचे पोलीस निरीक्षक दिपरतन गायकवाड यांनी सांगितले.

द • ख • ल


# बारामती परिमंडळात वीजबिलांची ७३ कोटींची थकबाकी

**बारामती :** महावितरणने मार्चअखेर वीजबिल थकबाकी वसुली मोहिमेला वेग दिला असून बारामती परिमंडळातील घरगुती, वाणिज्यिक व औद्योगिक अशा एकूण ४ लाख ४१ हजार ग्राहकांकडे ७३ कोटी ३१ लाख रुपयांची वीजबिल थकबाकी असल्याची माहिती देण्यात आली. थकीत व चालू वीजबिले तात्काळ भरून वीजपुरवठा खंडित करण्याची कारवाई टाळावी, असे आवाहन करण्यात आले आहे. बारामती मंडळात १ लाख ३ हजार ग्राहकांकडे २० कोटी ६३ लाख रुपये, सातारा मंडळात १ लाख ४० हजार ग्राहकांकडे १५ कोटी ३१ लाख रुपये, तर सोलापूर मंडळात १ लाख ९७ हजार ग्राहकांकडे ३७ कोटी ३५ लाख रुपये थकीत आहेत. ग्राहकांना संकेतस्थळ व मोबाईल ॲपद्वारे नेटबँकिंग, क्रेडिट-डेबिट कार्ड व मोबाईल वॉलेटच्या माध्यमातून ऑनलाइन वीजबिल भरण्याची सुविधा उपलब्ध आहे. वीजपुरवठा खंडित झाल्यास सिंगल फेजसाठी ३१० रुपये व थ्री फेजसाठी ५२० रुपये पुर्नजोडणी शुल्क भरावे लागते. ग्राहकांनी उपलब्ध सुविधांचा वापर करून चालू व थकीत वीजबिले भरावीत, असे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे.




# कवठे विविध कार्यकारी सोसायटीत पिक कर्ज भरण्यासाठी शेतकऱ्यांची

**कवठे येमाई :** – शिरूरच्या पश्चिमेकडील शेतकरी सभासद संख्या मोठी असणाऱ्या कवठे विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी येथे सध्या पिक कर्ज भरण्यासाठी शेतकऱ्यांची मोठी गर्दी होत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. चालू हंगामाच्या पार्श्वभूमीवर अनेक शेतकरी कर्ज फेडीसाठी तसेच नव्याने पीक कर्ज घेण्यासाठी सोसायटी कार्यालयात योग्य त्या कागदपत्रांसह दाखल होत आहेत. सोसायटीचे



सचिव शुभम सावंत यांनी सांगितले की, ज्या शेतकऱ्यांनी पीक कर्ज घेतले आहे त्यांना संस्थेकडून तात्काळ पीक कर्ज उपलब्ध करून देण्यात येत आहे. शेतकऱ्यांना कोणतीही अडचण येऊ नये यासाठी आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करून प्रक्रिया जलद गतीने पूर्ण केली जात असल्याची माहिती पुणे जिल्हा बँकेचे या भागाचे विकास अधिकारी संदीप पडवळ यांनी सांगितले. शेतकऱ्यांच्या सोयीसाठी व त्यांना योग्य मार्गदर्शन करण्यासाठी संस्थेच्या कार्यालयात त्रिया शिंदे, योगेश कांदळकर आणि मच्छिंद्र लंघे हे कर्मचारी तत्परतेने काम करताना दिसून येत आहेत. सोसायटीच्या कार्यालयात वाढत्या गर्दीच्या पार्श्वभूमीवर शिस्तबद्ध पद्धतीने कामकाज सुरू असून शेतकऱ्यांकडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.चालू व पुढील हंगामी शेतीच्या कामांना गती देण्यासाठी वेळेत कर्ज उपलब्ध होणे गरजेचे असून सोसायटीचे हे पाऊल शेतकऱ्यांसाठी दिलासादायक ठरत आहे.

# पुरंदर तालुक्यात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान

**नाझरे सुपे :**-महाराष्ट्र शासन व वनविभागाकडील शासन निर्णयानुसार ग्रामीण भागात सर्व सामान्य जनता व शेतकरी विद्यार्थी महिला यांचे महसूल विभागाशी दैनंदिन प्रश्नांचे निराकरण करणे व जनतेच्या तक्रारी ताबडतोब निकाली काढणे, महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख कार्यक्षम व गतिमान करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यातील तालुक्यांमध्ये मंडल स्तरावर छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान आयोजित करण्यात आदेश दिले आहेत. पुरंदर तालुक्यामध्ये छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियानाचे वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे.

# ग्रामरोजगार सहाय्यकांना मानधन द्या - संघटनेचे तहसीलदारांना निवेदन

**लोणी धामणी :** शासन निर्णय याची अंमलबजावणी करून ग्रामरोजगार सहाय्यकांना मानधन द्या अशी मागणी आंबेगाव तालुका ग्रामरोजगार सहाय्यक संघटनेने आंबेगाव तहसीलदार कार्यालय व पंचायत समिती कार्यालय आंबेगाव यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे ग्राम रोजगार सहाय्यकांना मानधन मिळण्याबाबत दि. ३/१०/२०२४ रोजी शासन निर्णय झाला असून दरमहा ८००० रूपये मानधन देण्याचे निश्चित केले आहे सदर निवेदनात म्हटले आहे की, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत ग्रामपंचायत स्तरावर ग्रामरोजगार सहाय्यकांची नेमणूक करण्यात आलेली आहे. त्यानुसार मागील अनेक वर्षांपासून ग्रामरोजगार सहाय्यक प्रामाणिकपणे सर्व कामे करत आहे. परंतु कामाच्या अनुषंगाने त्यांना अत्यल्प मानधन मिळत आहे. शासन निर्णयानुसार मानधन वितरणाची अद्याप कोणतीच कार्यवाही न झाल्याने ग्रामरोजगार सहाय्यक यांना शासन निर्णयानुसार मानधन जमा झालेले नाही. त्यामुळे ग्रामरोजगार सहाय्यक यांना उपासमारीची वेळ निर्माण झालेली आहे. त्यामुळे शासन निर्णयाची अंमलबजावणी होवून सर्व ग्रामरोजगार सहाय्यकांना मानधन मिळावा अशी मागणी ग्रामरोजगार सहाय्यक संघटनेने केली आहे.

# मेघमल्हार संगीत विद्यालयाचा वर्धापन दिन साजरा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**माळशिरस :** संगीत क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या काही गुणिजनांचा " कलारत्न"पुरस्कार देऊन नुकताच सन्मान करण्यात आला. सासवड येथील मेघ मल्हार संगीत विद्यालयाच्या १३ व्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने आयोजित या कार्यक्रमास प्रख्यात तबलावादक व ज्येष्ठ संगीत अभ्यासक पंडित उमेश मोघे तसेच ज्येष्ठ ज्योतिषाचार्य सिद्धेश्वर मारटकर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. भजनसम्राट दत्तात्रय फडतरे, लोककलावंत दशरथ लाखे, उत्तम सूत्रसंचालक नितीन राऊत, संगीत क्षेत्रांत कार्यरत राजेंद्र मोरे व व्हायोलिन वादक निलिमा खंडागळे यांचा याप्रसंगी कलारत्न पुरस्काराने गौरव करण्यात आला.

याच कार्यक्रमात केरळ येथील प्रथितयश तबला वादक अर्जुन कालीप्रसाद यांचे एकल तबलावादन व त्यांच्या साथीला संवादिनी साथ करणारे सौरभ क्षीरसागर यांचा कार्यक्रम विशेष लक्षवेधी ठरला. संगीत विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी अखिल गांधर्व महाविद्यालयातून परीक्षा उत्तीर्ण केली त्यांचा देखील यावेळी सत्कार प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आला. विद्यालयाचे संस्थापक अमोल बेलसरे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. जीवराज खिलारे, रेश्मा कामथे व छाया शिंदे यांनी सूत्र संचालन केले तर मोहन बागडे यांनी सर्वांचे आभार मानले

दत्तप्रसाद खाडे, प्रसाद खंडागळे, संदीप इनामके, हेमंत ताकवले, गायत्री बेलसरे, शरद पाडसे निलेश शिंदे, किरण पुरंदरे, गणेश बागडे यांसह मोठ्या संख्येने संगीतप्रेमी या प्रसंगी उपस्थित होते.

# कर्ज माफीच्या आशेने विकास सोसायट्यापुढे कर्ज वसुलीचे आव्हान

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लोणी धामणी :** महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेला शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा शब्द खरा ठरणार का? महाराष्ट्रासह पुणे जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे कर्जमाफीकडे डोळे लागले आहेत. लाडकी बहीण योजनेचा दिलेला शब्द सरकारने खरा केल्याने कर्जमाफी ही होणार अशी शेतकऱ्यांना आशा वाटू लागू लागली आहे

राज्य विधीमंडळाच्या अधिवेशनामध्ये शेतकऱ्यांना कर्जमाफीची आशा लागली आहे. वाढलेल्या कीटकनाशके खतांच्या किमती, इंधन, मजुरीचे दर वाढल्याने शेतकरी वर्ग हतबल झाला आहे. शेतमालाला मिळणारा भाव व उत्पादन खर्च याचा ताळमेळ बसत नसल्याने शेतकरी सांगत आहे. एकीकडे आधुनिक भांडवली शेती करण्याच्या

नादात शेतकरी खर्च करत आहेत तर दुसरीकडे शेती विषयक लागणाऱ्या साधनसामग्रीवर लादलेला जीएसटी कर यामुळे शेतकरी मेटाकुटीला आला आहे. शासनाने कोणतीही अट न घालता चालू व थकित कर्जमाफी करावी अशी मागणी शेतकरी करत आहे कारण मागील सरकारच्या काळामध्ये पूर्वीपासून कर्ज भरत आलेला शेतकरी हा तसाच राहिला होता. त्या सरकारने नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन पर ५० हजार रुपये अनुदान जाहीर केले होते. परंतु, मोजक्या शेतकऱ्यांना त्याचा लाभ झाला होता. त्यामुळे सरसकट कर्जमाफीची मागणी सध्या जोर धरू लागले आहे.

**प्रत्येक शेतमालाला हमीभाव द्यावा**

शेतकऱ्यांच्या प्रत्येक शेतमालाला हमीभाव सरकारने द्यावा अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. फळबागा भाजीपाला याच्यासाठी लागणारा भरमसाठ खर्च शेतकऱ्यांना करावा लागत आहे. परंतु बाजार भाव गडगडल्यानंतर त्याचा भांडवली खर्च देखील निघत नाही. परिणामी शेतकऱ्याच्या अंगावर कर्जाचा डोंगर उभा राहात आहे.

" शेतकऱ्यांच्या मनामध्ये शेतीविषयक नकारात्मकता व उदासीनता तयार झाली आहे. सरकारकडून शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळावी तरच शेतकरी वर्ग टिकेल.

**शिवाजी टाके संचालक विकास सोसायटी – शिंगवे**

---------------------------

शासनाने ३०/९/२०२५ पर्यंत थकीत कर्जदारांची माहिती मागवली आहे तसेच ३१/३/२०२५ पर्यंत चालू बाकीची माहिती मागवली आहे तशी माहिती आपण शासनाला कळवली आहे शासनाकडून अधिकृत कर्जमाफीची घोषणा झालेली नाही पिक कर्ज उचलणाऱ्या शेतकऱ्यांनी ३१ मार्च पूर्वी नियमित पिक कर्ज भरावे

**खंडू भोजने चेअरमन जारकरवाडी विकास सोसायटी**

# जिद्द आणि सातत्यपूर्ण अभ्यासातून प्राची नहार सीए

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिरूर :** कष्ट, जिद्द, चिकाटी आणि सातत्यपूर्ण अभ्यासाच्या जोरावर शिरूर येथील आनंद सोसायटीतील प्राची ललित नहार यांनी सनदी लेखापाल (सीए) होण्याचे स्वप्न साकार केले आहे. प्राची नहार या शालेय जीवनापासूनच अभ्यासात हुशार आहेत. त्यांचे माध्यमिक शिक्षण शिरूर येथील विद्याधाम प्रशालेत झाले. दहावीच्या परीक्षेत त्यांनी ९७ टक्के गुण मिळवत यश संपादन केले. गणित विषयात पैकीच्या पैकी गुण तर विज्ञान विषयात १०० पैकी ९८ गुण मिळवले होते. बारावीचे विज्ञान शाखेचे शिक्षण त्यांनी राजस्थानमधील कोटा येथे पूर्ण केले. त्यानंतर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातून वाणिज्य शाखेची पदवी प्राविण्यासह विशेष श्रेणीत उत्तीर्ण केली. पुढे सनदी लेखापाल (सीए) होण्यासाठी त्यांनी पुण्यात प्रवेश घेतला होता. सनदी लेखापाल ही परीक्षा देशातील सर्वात कठीण आणि आव्हानात्मक परीक्षांपैकी एक मानली जाते. या परीक्षेसाठी प्रचंड परिश्रम, सातत्यपूर्ण अभ्यास आणि मानसिक तयारी आवश्यक असते. या सर्व आव्हानांवर मात करत प्राची नहार यांनी जिद्द, मेहनत आणि अभ्यासू वृत्तीच्या जोरावर हे यश संपादन केले. प्राची नहार यांचे वडील ललित नहार हे भारतीय जनता पक्षाचे माजी शहराध्यक्ष असून त्यांनी एमबीएचे शिक्षण पूर्ण केले आहे. त्यांच्या मोठ्या कन्येने वैद्यकीय शिक्षण पूर्ण करून डॉक्टर म्हणून कार्य सुरू केले आहे. ललित नहार हे शहरातील राजकीय, सामाजिक व धार्मिक क्षेत्रात सक्रिय आहेत.प्राची नहार यांच्या यशाबद्दल डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष अशोक पलांडे, पुणे जिल्हा बँकेच्या माजी उपाध्यक्षा जयश्री पलांडे, संघपती भरत चोरडिया, शिरूर वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे अध्यक्ष प्रवीण मुथा, सामाजिक कार्यकर्ते नानासाहेब पोटे आदींनी अभिनंदन केले.

# पुणे जिल्ह्यात अपहरणाचा पर्दाफाशपोलिसांच्या सर्जिकल नाकाबंदीला यश, १८ वर्षीय मुलगा सुखरूप

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुरंदर :** पुणे जिल्ह्यातील कापूरहोळ परिसर आज दुपारी अक्षरशः थरारून गेला. एका नामांकित व्यापाऱ्याच्या १८ वर्षीय मुलाचे भरदिवसा अपहरण करण्यात आल्याची धक्कादायक घटना घडली. मात्र पोलिसांच्या तत्पर आणि धाडसी कारवाईमुळे काही तासांतच युवकाची सुखरूप सुटका करण्यात यश आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मंगळवारी दुपारी कापूरहोळ येथून चक १२ दए ५३५३ क्रमांकाच्या दणत७०० कारमधून युवकाला जबरदस्तीने घेऊन जाण्यात आले. प्रकार अचानक घडल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले. कुटुंबीयांनी तात्काळ जेजुरी पोलीस स्टेशन येथे तक्रार दाखल केली, तसेच ग्रामसुरक्षा यंत्रणेलाही सतर्क करण्यात आले. घटनेची माहिती मिळताच जेजुरी पोलिसांनी निरा पोलीस दूरक्षेत्र यांच्या मदतीने जेऊर–निरा मार्गावर तात्काळ नाकाबंदी उभारली जेजुरी पोली स निरीक्षक दीपक वाकचौर सह . निरा आऊट पोस्टचे पोलिस उपनिरीक्षक रविराज कोकरे, हरिश्चंद्र करे आणि प्रसाद कोळेकर यांनी संशयित वाहनाचा शोध सुरू केला.दरम्यान, जेऊरकडून पिसुर्टीकडे जाणारी एक संशयित कार पोलिसांच्या नजरेस पडली.




पोलिसांनी वाहन अडवण्याचा प्रयत्न करताच चालकाने वेग वाढवला. मात्र अरुंद रस्त्यामुळे कार उसाच्या शेतात जाऊन अडकली आणि परिस्थितीने नाट्यमय वळण घेतले. अपहरणकर्त्यांनी उसाच्या पिकाचा फायदा घेत घटनास्थळावरून पळ काढला; परंतु पोलिसांनी तत्परतेने कारमधून युवकाला बाहेर काढत त्याची सुरक्षित सुटका केली.यानंतर जेजुरी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक वाकचौरे आणि त्यांची टीम घटनास्थळी दाखल झाली. युवकाला वैद्यकीय तपासणीसाठी पाठविण्यात आले असून तो पूर्णपणे सुखरूप असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. पोलिसांनी तात्काळ नाकाबंदी केल्यामुळे मुलाची सुरक्षित सुटका शक्य झाली. आरोपींचा शोध सुरू आहे, अशी माहिती सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक वाकचौरे यांनी दिली. अपहरणामागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. आर्थिक वाद, खंडणी की वैयक्तिक वैर या सर्व शक्यतांचा तपास पोलिसांकडून सुरू आहे. सीसीटीव्ही फुटेज, मोबाईल लोकेशन आणि वाहनाच्या तपासातून महत्त्वाचे धागेदोरे मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.नीराजेजुरी पोलिसांचे नागरिकांकडून कौतुक निरा जेजुरी येथील पोलिस कर्मचाऱ्यांनी कोणताही विलंब न करता स्वतःहून पुढाकार घेत शहरापासून सुमारे पाच किलोमीटर पुढे जाऊन संशयितांची नाकाबंदी केली. अरुंद रस्त्यावर वाहन आडवे लावून अपहरणकर्त्यांना रोखून धरल्यामुळेच युवकाची सुटका शक्य झाली. या धाडसी आणि वेगवान कारवाईबद्दल नीरा व परिसरातील नागरिकांकडून पोलिसांचे कौतुक केले जात आहे. निरा जेजुरी पोलिसांचे कोतुक सावन्त प्रतिष्ठान कडून सन्मान यावेळी शिवसेना शहर अध्यक्ष विठ्ठल सोनवणे, प्रतिष्ठानचे संजय सावन्त, सामाजिक कार्यकर्ते सतीश हरिश्चंद्रे इत्यादी उपस्तिथ होतें

# स्वामी गोविंददेव गिरी यांच्या वक्तव्याचा आळंदी देवस्थानकडून निषेध

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आळंदी :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात झालेल्या ज्ञानोबा ते तुकोबा या राष्ट्रीय परिषदेतील बीजभाषणात स्वामी गोविंददेव गिरी यांनी संत ज्ञानेश्वर महाराज, संत नामदेव महाराज, संत एकनाथ महाराज आणि संत तुकाराम महाराज यांच्या वाङ्मयाबाबत केलेल्या विधानाचा श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटी, आळंदी देवाची यांनी जाहीर निषेध नोंदविला आहे.

संस्थान कमिटीचे प्रमुख विश्वस्त डॉ.भावार्थ रामचंद्र देखणे यांच्या नेतृत्वाखालील विश्वस्त मंडळाने प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, दिनांक २७ फेब्रुवारी २०२६ रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात आयोजित ज्ञानोबा ते तुकोबा राष्ट्रीय परिषदेत स्वामी गोविंददेव गिरी यांनी संतांच्या वाङ्मयाबाबत तौलनिक उद्गार काढताना हे वाङ्मय ग्रंथ नसून भाष्य व संकलन असल्याचा निष्कर्ष मांडला. या विधानाशी ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटी पूर्णपणे असहमत असून ते संतपरंपरेच्या विचारांशी विसंगत असल्याचे नमूद करण्यात आले आहे.निवेदनात पुढे म्हटले आहे की, संत ज्ञानेश्वर महाराजांनी सहज, सुंदर, रसाळ आणि अलंकारिक मराठी भाषेत तत्वज्ञानाचे अप्रतिम विवेचन करणारा ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरी हा अलौकिक ग्रंथ निर्माण केला असून तो मराठी वाङ्मयाचा अमूल्य ठेवा आहे. स्वतः संत ज्ञानदेवांनीच ग्रंथाच्या उपसंहारात मग आर्ताचेनि वोरसे। गीतार्थग्रंथन मिसे। वर्षला शांतरसे। तो हा ग्रंथुः।। असे म्हणत ज्ञानेश्वरीचा उद्देश स्पष्ट केला आहे.तसेच संत नामदेव महाराजांनीही नामा म्हणे ग्रंथ श्रेष्ठ ज्ञानदेवी। एकतरी ओवी अनुभवावी।। असे म्हणत ज्ञानेश्वरीचा ग्रंथ म्हणून गौरव केला आहे. संत ज्ञानदेवांनी अमृतानुभव हा तत्वचिंतनात्मक ग्रंथ निर्माण करून वैष्णव भक्तीपरंपरेला नवी दिशा दिली. पुढे संत नामदेवांच्या अभंगरचना, संत एकनाथांनी निर्माण केलेला भागवत ग्रंथ आणि संत तुकाराम महाराजांची अभंगगाथा हे सर्व संतवाङ्मय केवळ साहित्य नसून जगाच्या कल्याणाचा अमृतस्रोत असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.



स्वामी गोविंददेव गिरी यांनी केलेल्या विधानामुळे संतपरंपरेच्या भावनांना ठेस पोहोचल्याची भावना व्यक्त करत संस्थान कमिटीने या वक्तव्याचा जाहीर निषेध नोंदविला आहे. तसेच संत ज्ञानेश्वर महाराजांनी स्वामी गोविंददेव गिरी यांना सुबुद्धी द्यावी आणि त्यांनी सकल संतांची क्षमा मागावी, अशी अपेक्षाही संस्थान कमिटीने व्यक्त केली आहे.


## राजर्षि शाहु नागरी सहकारी पतसंस्था मर्या. बारामती

शॉप नं.१ व २, बँक ऑफ महाराष्ट्र मागे, फुलचंद हाऊस कॅनॉल रोड बारामती.

झेड नोटीस

**स्थावर मिळकत ताबा नोटीस**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ चे नियम १९६१ नियम १०७ (११) डी १

ज्याअर्थी, मी श्री.पी.एच. गाडे विशेष वसुली व विकी अधिकारी राजर्षि शाहु नागरी सहकारी पतसंस्था मर्या. बारामती जि.पुणे मला प्राप्त असलेल्या महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ चे नियम १९६१ नियम १०७ (११) डी १ नुसार खालील लवाद कर्ज थकवाकीदार व त्यांचे जामीनदार यांनी संस्थेकडुन घेतलेल्या कर्जाच्या वसुलीसाठी संस्थेस नजरगहाण द्वारे तारण असणारी बोजा नोंद मालमत्ता यावर जप्ती आदेश दिला आहे. अशा सर्व स्थावर मालमत्तेचा कागदोपत्री ताबा घेण्यासाठी खालील कार्यकम निश्चित करण्यात आलेला आहे. तरी ताब्यात घेतलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

| अ. क्र. | कर्जदार व जामीनदार नाव | वसुली दाखला क्र. दिनांक व वसुलपात्र रक्कम | ताब्यात घेण्यात आलेल्या मालमत्तेचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | १) सौ. स्वाती जयपाल चोपडे. रा. अशोकनगर बारामती जि. पुणे **जामिनदार** १) श्री. निनाद भिमराव माने. रा. माळेगांव बु. ता. बारामती. २) श्री. नितिन नारायण मदने. रा. निरावागज ता. बारामती जि. पुणे ३) श्री. जयपाल जगन्नाथ चोपडे. रा. अशोक नगर बारामती जि. पुणे | वसुली दाखला क्र. कलम १०१/१५२/२०२५ दि.१७/१०/२०२५ रू.४२,२९,५०२/-अधिक होणारे व्याज व ईतर कायदेशीर खर्च | श्री. निनाद भिमराव माने यांची मौजे बारामती ता. बारामती, जि. पुणे येथील संस्थेस नजरगहाणखतद्वारे तारण दिलेली मुल्यांकन विभाग क्र. ६.१ मधील स.नं.२२१/६/व/१व स.नं.२२१/६/व/३ यांसी सि.स.नं.५७८/२ आणि सि.स.नं.५७८/३ या दोन्हीचे एकत्रित क्षेत्र २२८६५-०० चौ. फुट असुन एकुण २६४६०.५ चौ. फुट मध्ये बांधलेल्या सरदार सातपुते नगरी या बहुमजली इमारतीतील पहीला मजला मधील दुकान गाळा नं. २३, क्षेत्रफळ ३५२.०० चौ. फुट सेलेबल बिल्टअप याचाच कार्पेट एरीया ३२.७१ ची. मीटर हि तारण दिलेली मिळकत |
| २ | १) श्री.सचिन विलास जाधव. रा. वडगांव निंबाळकर ता. बारामती जि. पुणे **जामिनदार** १) श्री. किशोर रूद्रमनी गाढवे. रा. हरीकृपानगर यादगार सिटी समोर. बारामती. जि. पुणे. २) श्री उमेश शशिकांत ननवरे. रा. कवि मोरोपंत हौ.सोसायटी, भिगवण रोड बारामती जि. पुणे | वसुली दाखला क्र. कलम १०१/१५५/२०२५ दि.०७/११/२०२५ रू.२२,७७,००४/-अधिक होणारे व्याज व ईतर कायदेशीर खर्च | मौजे वडगांव निंबाळकर ता. बारामती जि. पुणे येथील शेतजमीन गट नं २०२ मधील क्षेत्र ०० हे.७६.०० आर चौ. मी. नजर गहाणखत द्वारे तारण दिलेली शेतजमीन. |
| ३ | १) श्री. उदय विलास जाधव. रा. वडगांव निंबाळकर, ता. बारामती जि. पुणे **जामिनदार** १) श्री. उमेश शशिकांत ननवरे रा. कवि मोरोपंत हौ. सोसायटी, भिगवण गेड, ता. बारामती जि. पुणे २) श्री. किशोर रूद्रमनी गाढवे ग. हरीकृपानगर यादगार सिटी, समोर बारामती जि. पुणे | वसुली दाखला क्र. कलम १०१/१५४/२०२५ दि.०७/११/२०२५ रू.२३,८२,१९४/-अधिक होणारे व्याज व ईतर कायदेशीर खर्च | मौजे वडगांव निंवाळकर ता. बारामती जि. पुणे येथील शेतजमीन गट नं २०२ मधील क्षेत्र ००हे.७६.००आर चौ मी, नजर गहाणखत द्वारे तारण दिलेली मिळकत शेतजमीन |
| ४ | १) श्री. अनिल कुंडलिक सावंत व वर्षा अनिल सावंत. रा. सावंतवाडी, ता. बारामती. जि. पुणे. **जामिनदार**-१) श्री. अनिल शंकर मोरे. रा. जयशिवमनगर अनुचंद्र हॉस्पिटल मागे बारामती जि. पुणे. २) दयानंद राजु पडकर. रा. बारामती. जि. पुणे. ३) कुंडलिक बाबुराव सावंत. (तारणदार जामिनदार) रा. सावंतवाडी, ता. बारामती. जि. पुणे. | वसुली दाखला क्र. कलम १०१/१६७१/२०१९ दि.१७/०१/२०१९ रू.५,२७,८२७/- अधिक होणारे व्याज व ईतर कायदेशीर खर्च | मौजे सावंतवाडी ता. बारामती जि. पुणे येथील ग.नं. ६८ मधील श्री. कुंडलिक बाबुराव सावंत यांचे मालकी हिश्याचे व ताबेवहिवाटीचे संपुर्ण क्षेत्र ००. हे ३८ आर अधिक पो. ख.००हे ०१ आर एकुण ००हे३९ आर नजर गहाणखत द्वारे तारण दिलेली शेतजमीन |

ज्याअर्थी संबंधित मिळकतीचे जप्ती आदेश देऊनही संबंधित कर्जदारांनी थकीत कर्ज रकमेचा भरणा न केल्यामुळे सदर मिळकतीचा जाहीर लिलावाने विक्री करणे आवश्यक झाले आहे व त्यासाठी खाली सही करणार यांनी सदर मिळकतीचे मुल्यांकन करून घेवुन विक्री करण्याचे ठरविले असुन मा. सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, बारामती / मा. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था (पुणे ग्रामिण) यांचे कडे सदर मिळकतीचे वाजवी मुल्य निश्चित करणेसाठी प्रस्ताव दाखल करणार आहोत. त्याअर्थी आपणास नोटीस देण्यात येते की, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ चे नियम १९६१ नियम १०७ (११) डी १ अन्वये आपल्या वर नमुद केलेल्या जप्त मालमत्तेचा ताबा घेण्यासाठी खाली सही करणार मे. वसुली अधिकारी दि. २३/०३/२६ रोजी सकाळी १०.०० ते दु.५.०० पर्यंत जागेवर हजर राहुन ताबा घेणार आहोत, तरी आपण उपस्थित राहुन सहकार्य करावे.

दिनांक :०६/०३/२०२६
ठिकाण : बारामती

शिक्का

**पी.एच.गाडे**
**वसुली व विक्री अधिकारी**
**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व महाराष्ट्र सहकारी संस्थांचा नियम १९६१ चे कलम ७ (५) अन्वये**
**राजर्षि शाहू नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित बारामती, जिल्हा पुणे**


# उच्चशिक्षित तरुणास स्टंपने मारहाण

## सोशल मीडिया ; रिल्सचा वाढता परिणाम ; तरुणांमध्ये गुंडगिरी लागली वाढू

**विक्रम शिंदे । राष्ट्र सह्याद्री**

**भोर :** गावातील मुलीशी बोलतो म्हणून संगमनेर (ता.भोर )येथील उच्च शिक्षित तरुणास एकाने जबर मारहाण केल्याची घटना संगमनेर (ता.भोर) येथे घडली आहे.साहिल उत्कर्ष बांदल असे आरोपीचे नाव असून त्याचे विरोधात रोहन विनायक धुमाळ यांनी राजगड नसरापूर पोलीस ठाणे अंकित किकवी पोलिसात फिर्याद दिली आहे. याप्रकरणी हकीकत अशी फिर्यादी आपल्या मित्रांसमवेत गावातील मंदिर परिसरात गप्पा मारत बसला होता. दरम्यान आरोपी साहिल बांदल हा त्या ठिकाणी आला आणि फिर्यादीस तुझ्यासोबत बोलायचं आहे तू मंदिरात ये असे म्हटला. फिर्यादी एकटाच मंदिरात आला असता आरोपी साहिल याने फिर्यादीस दमदाटी तसेच शिवीगाळ करण्यास सुरुवात केली.तू शिवीगाळ तसेच दमदाटी करू नकोस असे फिर्यादी आरोपीस म्हणाला .मात्र तू गावातील मुलीबरोबर का बोलतोस असे विचारत आरोपी साहिल याने फिर्यादी रोहन यांस स्टॅम्पने मारहाण करण्यास सुरुवात केली.या मारहाणीत फिर्यादीच्या डोक्यात ,पाठीवर आणि डाव्या हातावर जबर मारहाण करण्यात आली.मंदिर परिसरातील फिर्यादीच्या मित्रांनी दोघांचे भांडण सोडवले आणि आरोपी घरी गेला दरम्यान फिर्यादी आपले मामा रमेश बांदल यांच्यासह आरोपीच्या घरी गेले. फिर्यादीच्या मामाने रोहन यास मारहाण का केली अशी विचारणा आरोपीस केली असता आरोपी घरातून कोयता घेऊन आला तसेच दहशत माजवत पुन्हा रोहन यांस शिवीगाळ करू लागल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

**संतोष देशमुख हत्येचा प्रभाव गावात पोहचला ?**

सध्या भोर तालुक्यात महाविद्यालयीन तरुणांमध्ये गुंडगिरीचे प्रमाण वाढले असून किरकोळ कारणांमूळे कोयत्याने मारहाण करणे दहशत माजविण्याच्या घटना सातत्याने घडत आहेत.शोशल मिडियाचा वाढता वापर ,भाईगिरीची क्रेज आणि मारहाण करतानाचे व्हिडीओ काढून सोशल मीडियावर टाकणे यामुळे राज्यातील संतोष देशमुख हत्या प्रकरणाचा प्रभाव गावात पोहचला की काय असा प्रश्न आता सामान्यांना पडू लागला आहे.


## ग्रामपंचायत दापोडी ता. दौंड, जि.पुणे

दर पत्रके मागणी नोटीस क्रमाक-सन- २०२५-२०२६

ग्रामपंचायत दापोडी ता. दौंड, जि.पुणे खालील साहित्य. वस्तु, सीलबंद दर पत्रके योग्य त्या वर्गातील नोंदणी कृत पुरवठा दाराकडून मागवीत आहे. दर पत्रके ग्रामपंचायत दापोडी ता. दौंड, जि. पुणे यांच्याकडे दिनांक ०६/०३/२०२६ ते १२/०३/२०२६ पर्यंत कामकाजाच्या दिवशी सकाळी १० ते सायंकाळी ५.३० पर्यंत स्वीकारल्या जातील. व शक्य झाल्यास दिनांक १४/०३/२०२६ या दिवशी सकाळी ५.०० वाजेपर्यंत उघडण्यात येतील.

| अ.क्र | साहित्य वस्तूचे नाव | नग |
|---|---|---|
| १) | गावठाण अंतर्गत सोलर हायमास्ट | ७ नग |
| २) | तलाठी कार्यालय सोलर हायमास्ट | १ नग |
| ३) | कलानगर, वडवली पुर्णवसन सोलर हायमास्ट | ५ नग |

**टीप** :- १) कोणतेही दर पत्रके स्वीकारणे अथवा नाकारणे यांचा अधिकार ग्रा.प ने राखून ठेवला आहे. २) पुरवठा धारकांने अर्ज सोबत प्रमाणित नोंदणी अधिकृत विक्रेता प्रमाणपत्राची मुळप्रत सादर करणे आवश्यक आहे. ३) पुरवठा धारकाने GST प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे. ४) सदरचे दरपत्रके हे स्पीड पोस्ट/ साधे पोस्ट याद्वारे स्वीकारले जातील. हस्ते परहस्ते देण्यात येणारे दरपत्रके ग्राह्य धरले जाणार नाही. ५) सदरचे दरपत्रक हे नोटीस दिल्याच्या तारखेपासून मुदत संपण्याच्या कालावधीत प्राप्त होणारे दरपत्रके ग्राह्य धरले जातील.

**ग्रामपंचायत अधिकारी सरपंच उपसरपंच**
**ग्रामपंचायत दापोडी, ता. दौंड जि. पुणे**

# संत सद्गुरु गोदड महाराज पालखीचे पैठणकडे प्रस्थान

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कर्जत :** कर्जतचे ग्रामदैवत संत सद्गुरु गोदड महाराज यांच्या पालखीचे दक्षिणेची काशी म्हणून ओळख असलेल्या पवित्र तीर्थक्षेत्र पैठणकडे मोठ्या भक्तिभावात व उत्साहात प्रस्थान झाले. टाळ-मृदुंगाच्या गजरात आणि गोदडनाथ एकनाथच्या जयघोषात कर्जत नगरी भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाली.



धाकटी पंढरी म्हणून ओळख असलेल्या कर्जत येथील संत सद्गुरु गोदड महाराज समाधी मंदिरातून पालखी सोहळ्याची सुरुवात झाली. पहाटे अभिषेक, म हाआरती व नामस्मरणाचा कार्यक्रम पार पडला. त्यानंतर मानकरी, ग्रामस्थ, पुजारी व भाविकांच्या उपस्थितीत पारंपरिक पद्धतीने पालखी उचलण्यात आली. मार्गावर ठिकठिकाणी रांगोळ्या काढून, फुलांची उधळण करून आणि आरतीने पालखीचे स्वागत करण्यात आले. महिला भगिनींनी डोक्यावर तुळशीवृंदावन घेत सहभाग नोंदवला, तर युवकांनी भगवे झेंडे हातात घेऊन दिंडीला उत्साह दिला. भजन मंडळांनी अखंड हरिनामाचा गजर करत वातावरण भक्तिरसात रंगवले.

कर्जत ते पैठण या प्रवासादरम्यान विविध गावांम ध्ये पालखीचे स्वागत होणार असून भाविकांसाठी अन्नछत्राची व्यवस्था करण्यात आली आहे.

चौकट : फत्ते वडगाव येथे दिंडीचे स्वागत

संत सद्गुरु गोदड महाराज पायी दिंडीचा दुसरा मुक्काम फत्ते वडगाव येथे असतो. येथील प्रसिद्ध भैरवनाथ मंदिर परिसरात दिंडीतील वारकऱ्यांचे मोठ्या भक्तिभावाने स्वागत करण्यात येते. कर्जत येथील दिवंगत वकील ज्ञानदेव काकडे यांनी वारकऱ्यांसाठी नाष्टा व शरबत देण्याची परंपरा सुरू केली होती. त्यांच्या निधनानंतर त्यांचे सुपुत्र हायकोर्ट वकील गौरव काकडे यांनी ही परंपरा पुढे चालू ठेवत दिंडीचे स्वागत केले.

या प्रसंगी अभय पाटील, काकासाहेब धांडे, प्रकाश खंदारे, बबन धांडे, राहुल धांडे, बाबासाहेब निंबाळकर, कुमार भोसले, ईश्वर नलवडे, बाळासाहेब गुंड, शहाजी पिसाळ, दिलीप तोरडमल, संजय काकडे, प्रमोद काकडे आदी उपस्थित होते. दिंडी सोहळा समितीच्या वतीने अभय आबा पाटील यांच्या हस्ते वकील गौरव काकडे यांचा मानाचा नारळ व गोदड महाराजांची प्रतिमा देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी गौरी काकडे उपस्थित होत्या.

# ध्वनी प्रदूषण रोखण्यासाठी प्रशासन ॲक्शन मोडवर; ३७ जणांना नोटिसा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री


**अहिल्यानगर :** शहरात वाढत चाललेल्या ध्वनी प्रदूषणाला आळा घालण्यासाठी शहर विभाग पोलीस प्रशासन क्शन मोडवर आले असून डीजे, डॉल्बी व जनरेटर वाहन चालक-मालकांवर कठोर कारवाईचा इशारा देण्यात आला आहे. या संदर्भात शहरातील ३७ डीजे व डॉल्बी चालक-मालक, मंगल कार्यालय मालक तसेच जनरेटर वाहन मालकांना नोटिसा बजावण्यात आल्या आहेत.

डीजे डॉल्बीच्या कर्कश व असह्य आवाजामुळे सर्वसामान्य नागरिक, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक तसेच रुग्णांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याच्या तक्रारी सातत्याने येत आहेत. या पार्श्वभूमीवर पोलीस प्रशासनाने संबंधितांना वारंवार सूचना दिल्या होत्या. मात्र काही ठिकाणी या सूचनांकडे दुर्लक्ष होत असल्याने आता कठोर कारवाई करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

शाळा, महाविद्यालये, रुग्णालये, धार्मिक स्थळे तसेच संवेदनशील परिसरात डीजे-डॉल्बीच्या कर्कश आवाजामुळे ध्वनी प्रदूषण करणाऱ्यांविरुद्ध पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ म धील कलम १५ व १९ तसेच ध्वनी प्रदूषण (नियमन व नियंत्रण) नियम २००० अंतर्गत कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा शहर विभागाचे पोलीस उपअधीक्षक डॉ. दिलीप टिपरसे यांनी दिला आहे.

दरम्यान, शहर परिसरात कोठेही ध्वनी प्रदूषण कायद्याचे उल्लंघन होत असल्याचे आढळल्यास नागरिकांनी तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्यात माहिती द्यावी. माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवण्यात येईल, असे आवाहनही डॉ. टिपरसे यांनी केले आहे.

## द•ख•ल



### अवैध मावा कारखान्यांवर छापा; अडीच लाखांचा मुद्देमाल जप्त

**पाथर्डी :** शहरात सुरू असलेल्या अवैध मावा निर्मितीवर पाथर्डी पोलिसांनी मोठी कारवाई करत दोन वेगवेगळ्या ठिकाणी छापे टाकून सुमारे अडीच लाखांहून अधिक किमतीचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षकांच्या आदेशानुसार पाथर्डी पोलीस व एसडीपीओ कार्यालयाच्या पथकाने अवैध मावा विक्रीविरोधात विशेष मोहीम हाती घेतली होती. या मोहिमेदरम्यान पोलिसांना गुप्त माहिती मिळाली की, दुलेचांदगाव रोड परिसरातील मारुती मंदिराजवळील एका पत्र्याच्या खोलीत अवैधरित्या मावा तयार केला जात आहे. माहितीच्या आधारे पोलिसांनी पंचांसह छापा टाकला असता पांडुरंग उत्तम सोनटक्के (वय ४५, रा. चांदगाव रोड, पाथर्डी) हा इसम मावा तयार करण्याच्या कामात आढळून आला.

पोलिसांनी घटनास्थळी झडती घेतली असता मावा तयार करण्याचे मशीन, मोठ्या प्रमाणात सुपारीचा चुरा, सुगंधित तंबाखूची पाकिटे तसेच इतर साहित्य असा सुमारे १ लाख ४० हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

दरम्यान, या कारवाईदरम्यानच पोलिसांना कोरडगाव रोड परिसरातही मावा तयार केला जात असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी तेथेही छापा टाकून बाळू शंकर सोनटक्के (वय ४८, रा. कोरडगाव रोड, पाथर्डी) याच्याकडून मावा तयार करण्याचे मशीन, सुपारीचा चुरा, सुगंधित तंबाखू व पॅकिंग साहित्य असा सुमारे १ लाख ३० हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

महाराष्ट्रात गुटखा, पानमसाला व मावा यांचे उत्पादन व विक्रीवर बंदी असतानाही अवैधरित्या मावा तयार केल्याप्रकरणी दोघांविरुद्ध बीएनएस कलम २२३ व २७५ अन्वये पाथर्डी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

### आयएमएसच्या विद्यार्थ्यांची गुजराथ एमआयडीसीला शैक्षणिक भेट



**नगर :** येथील भा.पा.हिवाळे संस्थेच्या आय एम एस या व्यवस्थापन संस्थेतील एमबीए च्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल गुजरात मधील सिल्वासा या ठिकाणी जाऊन आली. येथील एमआयडीसी मधील पारले अग्रो , अक्षय किचन, मिन टॉईज या उद्योगांना विद्यार्थ्यांनी भेट दिली. तीनही ठिकाणी विद्यार्थ्यांना उत्तम प्रतिसाद मिळाला . व्यवस्थापनातील बारकावे, विपणन, वित्त, मानव संसाधन, वाहतूक, अशा अनेक विभागांची माहिती शिकायला मि ळाली. क्लास मधील शिक्षण व प्रात्यक्षिक ज्ञान यामुळे मुलांच्या मनात असलेली व्यापार क्षेत्रातील प्रतिमा यांचा योग्य मिलाप होतो. सर्व सहलीचे नियोजन प्रा श्रुती राव, डॉ. राहुल खंडेलवाल, डॉ. हर्षवर्धन भावसार, प्रा साक्षी मध्यान यांनी केले.

### निमगाव खैरी शाळेचे तीन विद्यार्थी एनएमएमएस परीक्षेत पात्र

**श्रीरामपूर :** खा. गोविंदराव आदिक ग्रामीण शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूल निमगाव खैरी विद्यालयातील तीन विद्यार्थी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्यावतीने घेण्यात आलेल्या एनएमएमएस परीक्षेत पात्र झालेले आहेत. भविष्यातील स्पर्धा परीक्षेची तयारी व्हावी यासाठी शिक्षण परिषदेच्यावतीने या परीक्षेचे आयोजन करण्यात येते.या विद्यार्थ्यांना शिक्षक अर्जुन देवकर, जनार्दन ठुबे, ओंकार वाकचौरे, सिध्दार्थ विश्वासराव, प्रियंका उसारे, सोनाली बनसोडे यांचे मार्गदर्शन मिळाले. या यशाबद्दल संस्थेच्या चेअरमन पुष्पलता आदिक, अध्यक्ष डॉ. बबन आदिक, सचिव अविनाश आदिक, अनुराधा आदिक, सुनील थोरात, मुख्याध्यापक शंकर शिंदे यांच्यासह शिक्षकांनी अभिनंदन केले.

# प्रलंबित रस्ते कामाबाबत सभापती शिंदे यांची प्रशासनाला सूचना

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कर्जत :** तालुक्यासह अहिल्यानगर जिल्ह्यातील अनेक रस्ते कामे प्रलंबित असल्याने नागरिकांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे. याबाबत तीव्र नाराजी व्यक्त करत महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी संबंधित प्रशासनाला सुनावणी करत पुढील १५ दिवसांत वस्तुस्थितीदर्शक अहवाल सादर करण्याचे आदेश दिले. तसेच कामांमध्ये झालेल्या विलंबाबाबत जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाईचे संकेत दिले.

विधान भवन, मुंबई येथे सभापती प्रा. राम शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली सार्वजनिक बांधकाम विभाग व वन विभागाच्या अखत्यारीतील प्रलंबित रस्ते कामांचा आढावा घेण्यात आला. या बैठकीत काष्टी, श्रीगोंदा, देऊळगाव, मांडवगण, डिकसळ, आळसुंदेनिंबे, आळसुंदेनिंबेआंबीजळगाव तसेच कोंभळी फाटा ते कोंभळी या मार्गासह एकूण १३ प्रलंबित कामांची दखल घेण्यात आली. कामांमध्ये झालेल्या विलंबाबाबत अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीवर सभापतींनी नाराजी व्यक्त केली.

बैठकीस सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव (रस्ते) संजय दशपुते, मुख्य वनसंरक्षक जितेंद्र रामगावकर, मुख्य वनसंरक्षक जी. मल्लीकार्जुन, अधीक्षक अभियंता विजय पाटील, कार्यकारी अभियंता अ. भा. चव्हाण, वनसंरक्षक विवेक होशिंग आदी अधिकारी उपस्थित होते.

या कामांच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी २० मार्च रोजी पुन्हा विशेष बैठक घेण्यात येणार आहे.

# निमगाव वाघात पर्यावरणपूरक होळी

## स्वच्छता अभियानातून व्यसनमुक्तीचा संदेश

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** नगर तालुक्यातील निमगाव वाघा येथे स्व. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ व धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने स्वच्छता अभियान राबवून पर्यावरणपूरक पद्धतीने होळी साजरी करण्यात आली. बिरोबा देवस्थान परिसरात पाला-पाचोळ्याची होळी पेटवून पर्यावरण संवर्धन व व्यसनमुक्तीचा संदेश देण्यात आला.

या उपक्रमांतर्गत युवकांना पर्यावरण रक्षण व व्यसनमुक्तीची शपथ देण्यात आली. विशेष म्हणजे म ागील सोळा वर्षांपासून गावात हा सामाजिक उपक्रम सातत्याने राबविला जात असून तो युवकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. होळीपूर्वी देवस्थान परिसरात व्यापक स्वच्छता अभियानही राबविण्यात आले.

यावेळी तंबाखू, सिगारेट, गुटखा, मावा आदी व्यसनाधीन पदार्थांचे होळीत प्रतीकात्मक दहन करून व्यसनांची होळी करा आणि निरोगी जीवनाचा संकल्प करा असा संदेश देण्यात आला.

डोंगरे संस्थेचे अध्यक्ष तथा ग्रामपंचायत सदस्य नाना डोंगरे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, पर्यावरणाचा



प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असून युवकांमध्ये वाढते व्यसनाचे प्रमाणही चिंताजनक आहे. तंबाखूजन्य पदार्थांमुळे कॅन्सरसारख्या आजारांचे प्रमाण वाढत असून दारूमुळे अनेक कुटुंबे उद्ध्वस्त होत आहेत. त्यामुळे युवकांनी व्यसनांपासून दूर राहून समाजप्रबोधनासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

होळीसाठी हिरवी झाडे तोडण्याऐवजी वाळलेल्या पाला-पाचोळ्याचा वापर केल्यास पर्यावरणपूरक पद्धतीने सण साजरा करता येतो, असेही त्यांनी सांगितले.

या उपक्रमात नामदेव भुसारे, आदित्य फलके, पै. संदीप डोंगरे, तन्मय गायकवाड, अशोक लोटके, अजित फलके, सार्थक काळे यांच्यासह शालेय विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले. उपक्रमास मेरा युवा भारत तसेच जिल्हा क्रीडा कार्यालयाचे मार्गदर्शन लाभले.

शाळेतील अत्याचार प्रकरण

# मुख्याध्यापकांची चौकशी अहवाल होणार सादर

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** तालुक्यातील दौंडनगर रोडवरील रयत शिक्षण संस्था संचलित शाळेत अल्पवयीन मुलीवर झालेल्या अत्याचार प्रकरणाने परिसरात प्रचंड खळबळ उडवली असताना आता या प्रकरणाची चौकशी उत्तर विभाग अहिल्यानगरचे विभागीय अधिकारी यांच्यामार्फत झाली असून लवकरच कारवाईचे संकेत देण्यात आले आहेत

श्रीगोंदा तालुक्यातील नगर दौंड रोडवरील रयत शिक्षण संस्थेच्या एका महाविद्यालयात परिसरातील एक सेवानिवृत्त सैनिक व हॉटेल चालक मुलींना कबड्डीचे प्रशिक्षण देण्यासाठी विनामूल्य सेवा देत होता त्यातूनच एका अल्पवयीन मुलीशी ओळख होऊन जवळीक साधून तिच्यावर अत्याचार झाल्याची घटना घडली आहे या घटनेच्या पार्श्वभूमीवर संस्थेच्या उत्तर विभागातील अहिल्यानगर विभागीय अधिकारी नवनाथ बोडके यांनी संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांची सखोल चौकशी केली आहे. या चौकशीचा सविस्तर अहवाल उद्या संस्थेकडे सादर केला जाणार असल्याची माहिती समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, या चौकशीदरम्यान शाळेतील प्रशासन, विद्यार्थ्यांची सुरक्षा, शिक्षकांची जबाबदारी तसेच घटनेच्या वेळी शाळा व्यवस्थापनाची भूमिका याबाबत विविध मुद्द्यांवर मुख्याध्यापकांकडून स्पष्टीकरण मागविण्यात आले आहे. चौकशीदरम्यान काही महत्त्वाच्या नोंदी, कागदपत्रे आणि घटनाक्रमाची तपशीलवार माहितीही तपासण्यात आली असल्याचे सांगितले जात आहे.या प्रकरणामुळे परिसरात संतापाची लाट उसळली असून पालकवर्गाकडून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी होत आहे. अहवाल सादर झाल्यानंतर संस्थेकडून पुढील प्रशासकीय कारवाई होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.एकंदरीत, शाळा म्हणजे संस्काराचे मंदिर असे आपण म्हणतो; पण अशा घटनांमुळे समाजात गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. आता उद्या सादर होणाऱ्या अहवालाकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

### शाळेतच मुली असुरक्षित?

**दौंडनगर रोडवरील रयत शिक्षण संस्था संचलित शाळेतील अल्पवयीन मुलीवरील अत्याचार प्रकरणाने शिक्षण व्यवस्थेवरच प्रश्नचिन्ह उभे केले आहे.उत्तर विभाग, अहिल्यानगरचे विभागीय अधिकारी नवनाथ बोडके यांची मुख्याध्यापकांकडून सखोल चौकशी,शाळेतील विद्यार्थिनींच्या सुरक्षेबाबत गंभीर प्रश्न,चौकशीचा सविस्तर अहवाल उद्या संस्थेकडे सादर होणार,अहवालानंतर संबंधितांवर कारवाईची शक्यता असली तरीहीसंस्काराच्या मंदिरातच जर भीतीची सावली असेल तर मुली सुरक्षित कुठे? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे**

# लेखी आश्वासनानंतर काष्टीच्या ग्रामस्थांचे आंदोलन स्थगित

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**लिंपणगाव :** मौजे काष्टी गावातून जाणाऱ्या बारामती -दौंड -नगर महामार्गावरील अपघात रोखण्यासाठी काष्टीच्या कार्यकर्ते व ग्रामस्थांनी कार्यकारी अभियंता राज्य रस्ते विकास महामंडळाला ५ मार्च रोजी रस्ता रोको आंदोलनाचा इशारा देण्यात आला होता. परंतु राज्य रस्ते विकास महामंडळाचे कार्यकारी अभियंता यांनी आंदोलनकर्त्यांना लेखी आश्वासन देऊन आंदोलनकर्त्यांच्या ज्या मागण्या होत्या त्याची पूर्तता करण्यात येईल, असे लेखी उत्तर दिल्यानंतर आंदोलनकर्त्यांनी आपले आंदोलन स्थगित केले. अशी माहिती आंदोलन करते राकेश पाचपुते,, सुनील माने, संजय काळे, राहुल पाचपुते व शशिकांत जाधव यांनी सांगितले. आंदोलनकर्त्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सदर महामार्गावर वारंवार होणाऱ्या अपघातांमध्ये अनेक निष्पाप नागरिकांना आपला जीव गमवावा लागला असून, काहींना कायमस्वरूपी अपंगत्व आले आहे या राष्ट्रीय महामार्गावर माने बंधूंचा निष्पाप अपघातात बळी गेला आहे.

प्रामुख्याने वाहनांचा अनियंत्रित वेग, चौकांमध्ये आवश्यक ती वाहतूक नियंत्रण व्यवस्था नसणे, महाविद्यालय परिसरात सुरक्षिततेच्या उपाययोजनांचा अभाव इत्यादी कारणांमुळे हे अपघात घडत असल्याचे आंदोलनकर्त्यांनी निवेदनात नमूद करण्यात आले आहे. आंदोलनकर्त्यांच्या मागण्या पुढील प्रम ाणे करण्यात आल्या होत्या. वैधानिक पद्धतीने प्रभावी वेग नियंत्रण करतील असे मोठे गतिरोधक बसविणे, वाघझाई चौक अजनूज चौक, मातोश्री चौक, शिवनेरी चौक, परिक्रमा कॉलेज इत्यादींचा समावेश होता. तर संपूर्ण परिसरात उच्च प्रतीची लाईट व्यवस्था तात्काळ सुरू करणे, स्पष्ट मोठे रिफ्लेक्टिव चेतावणी फलक लावणे, आवश्यक त्या ठिकाणी सिंगल किंवा ब्लिंककर यंत्रणा बसविणे, अपघात ग्रस्त भागाला अधिकृत ब्लॅक स्पॉट म्हणून घोषित करून विशेष सुरक्षा उपाय करणे इत्यादी मागण्यांसाठी हे रस्ता रोको आंदोलन पुकारण्यात आले होते.

काष्टी सेवा संस्थेचे चेअरमन व आंदोलन करते राकेश पाचपुते यांच्या समवेत कार्यकारी अभियंता अश्विनी घोडके- इनामदार यांनी दूरध्वनीद्वारे झालेल्या चर्चेत श्रीगोंदा चौक व अजनुज चौक येथे मोठे डांबरी गतिरोधक करणे अत्यंत आवश्यक असल्याचे निश्चित झाले आहे. त्यानुसार ठेकेदारास या कार्यालयातर्फे सूचना देण्यात आलेल्या आहेत व सदर काम पुढील आठ दिवसात पूर्ण करून घेत असल्याचे ठेकेदाराने कळविले आहे. तसेच निविदेच्या नावानुसार सदर ठिकाणी च उर्वरित सर्व सुरक्षा कामे पूर्ण करण्यात आली आहेत. त्यामुळे आपले नियोजित ५ मार्च रोजीचे प्रस्तावित रस्ता रोको आंदोलन रद्द करावे असे लेखी आश्वासन दिल्याने आंदोलनकर्त्यांनी आपले रस्ता रोको आंदोलन तात्पुरते स्थगित करीत असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

# कुत्तरवाडीत वनजमिनीचा 'सौदा'

## चौकशीच्या मागणीसाठी ग्रामस्थांचे उपोषण



**वनजमिनीची खरेदी-विक्री कशी झाली आणि सातबारावर नावे कशी चढली, याची स्पष्ट उत्तरे मिळाली नाहीत तर १५ दिवसांनंतर पुन्हा तीव्र आंदोलन छेडू, असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.**

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**पाथर्डी :** तालुक्यातील मौजे कुत्तरवाडी येथे वनविभागाच्या शासकीय जमिनीच्या कथित खरेदी-विक्रीचा गंभीर प्रकार समोर आल्याने खळबळ उडाली आहे. हस्तांतरणास बंदी असलेल्या वनजमिनीची कोणतीही शासकीय परवानगी न घेता खरेदी-विक्री करण्यात आल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला असून, संबंधित जमिनीवर सातबारावर नावेही चढवण्यात आल्याने महसूल व वनविभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, या मागणीसाठी ग्रामस्थांनी वनपरिक्षेत्र कार्यालयासम ोर आमरण उपोषण सुरू केले होते.

या संदर्भात कुत्तरवाडी येथील अंबादास दादाबा गायकवाड व बाळू गोविंद खेडकर यांनी लेखी तक्रार दिली आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, महसूल खात्यातील निवृत्त मंडळ अधिकारी भुजंग नाथा दहिफळे व त्यांच्या कुटुंबीयांनी गट क्रमांक ६६/१अ/३ लगत असलेल्या वनविभागाच्या शासकीय जमिनीवर बेकायदेशीर अतिक्रमण केले आहे. ही जमीन वनविभागाच्या मालकीची असून तिच्या खरेदी-विक्रीस बंदी असतानाही नियमांना हरताळ फासत व्यवहार झाल्याचा आरोप करण्यात आला आहे.

तक्रारदारांच्या म्हणण्यानुसार, संबंधित जमिनीवर फळबाग विकसित करून दरवर्षी सुमारे ३० ते ४० लाख रुपयांचे उत्पन्न घेतले जात आहे. त्यामुळे शासनाच्या वनजमिनीवरून मोठे आर्थिक नुकसान होत असल्याचीही ग्रामस्थांची तक्रार आहे.

या संदर्भात अनेक वेळा प्रशासनाकडे तक्रारी करूनही कारवाई न झाल्याने ग्रामस्थांनी आंदोलनाचा मार्ग अवलंबला.

दरम्यान, वनपरिक्षेत्र अधिकारी, पाथर्डी यांनी प्रकरणाची दखल घेत मौजे कुत्तरवाडी येथील वनविभागाच्या गट क्रमांक ६६/१/अ/१ (क्षेत्र २८.५५ हेक्टर) या जमिनीची अचूक सीमा निश्चित करण्यासाठी वनसर्व्हेक्षक मागवण्यात येणार असल्याचे लेखी आश्वासन दिले. हद्द निश्चितीनंतर अतिक्रमण आढळल्यास ते हटवून संबंधितांवर कारवाई करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

प्रशासनाकडून मिळालेल्या लेखी आश्वासनानंतर ग्रामस्थांनी उपोषण तूर्त स्थगित केले असले, तरी संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी व्हावी, अशी मागणी कायम ठेवली आहे.

# राजयोग हॉटेलवर पोलिसांचा छापा

## तीन बांगलादेशी तरुणींची सुटका

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शेवगाव :** शहरातील शेवगावगेवराई रोडवरील राजयोग हॉटेलवर पोलिसांनी छापा टाकून वेश्याव्यवसाय चालविणाऱ्या टोळीचा पर्दाफाश केला. या कारवाईत बांगलादेशातून अवैधरित्या आणलेल्या तीन तरुणींची सुटका करण्यात आली असून सहा जणांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या सूचनेनुसार अवैध धंद्यांवर कारवाई सुरू असताना सामाजिक संस्था 'फ्रिडम फर्म' यांना राजयोग हॉटेलमध्ये मुलींना नोकरीचे आमिष दाखवून आणून त्यांच्याकडून जबरदस्तीने वेश्याव्यवसाय करून घेत असल्याची माहिती मिळाली. ही माहिती पोलिसांना देण्यात आल्यानंतर नियंत्रण कक्ष व अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाने कारवाईची योजना आखली.

पोलीस निरीक्षक हमीद शेख यांनी पथकासह पंचांच्या उपस्थितीत बनावट ग्राहक पाठवून खात्री केली. त्यानंतर हॉटेलवर छापा टाकण्यात आला. या कारवाईत कृष्णा बापू झिरपे (रा. कोळगाव), प्रतिक मिलिंद रांधवने (रा. माळीवाडा, शेवगाव), बाबासाहेब रामभाऊ अंधारे (हॉटेल मालक), अजिंक्य विठ्ठल अंधारे (रा. शिवाजीनगर, शेवगाव), अमोल पठाडे (रा. नेवासा) व अमर मारुती ढाकणे (रा. हसनापूर, शेवगाव) यांना ताब्यात घेण्यात आले.

तपासात आरोपींनी एजंटमार्फत बांगलादेशातून तीन तरुणींना अवैधरित्या आणून त्यांच्या इच्छेविरुद्ध वेश्याव्यवसाय करण्यास भाग पाडल्याचे निष्पन्न झाले. या प्रकरणी शेवगाव पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रम ांक १५९/२०२६ नोंद करण्यात आला असून बीएनएस २०२३ तसेच अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध अधिनियम १९५६ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, पोलीस उपअधीक्षक गणेश उगले व पोलीस निरीक्षक रविंद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक हमीद शेख व त्यांच्या पथकाने केली.

दैनिक राष्ट्र सह्याद्री

शुक्रवार, दि.०६ मार्च २०२६ । अहिल्यानगर । पान नं. ८

# जि.प. शाळेत सीसीटीव्ही कॅमेऱ्याची तोडफोड व चोरी

**वडाळा महादेव :** श्रीरामपूर तालुक्यातील वडाळा महादेव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत अज्ञात व्यक्तीने सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची तोडफोड करून एक कॅमेरा चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. शाळेच्या सुट्टीच्या काळात हा प्रकार घडल्याचे समोर आले आहे.शाळेचे मुख्याध्यापक नेहमीप्रमाणे सकाळी सव्वा नऊ वाजता शाळेत आले असता कार्यालयासमोरील सीसीटीव्ही कॅमेरा तुटलेल्या अवस्थेत लटकताना दिसला. तसेच भिंतीलगत बसविण्यात आलेला दुसरा कॅमेरा अज्ञात व्यक्तीने चोरून नेल्याचे निदर्शनास आले. या घटनेची माहिती मुख्याध्यापकांनी तत्काळ वरिष्ठ अधिकारी, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, ग्रामपंचायत सरपंच, पोलीस पाटील, ग्रामविकास अधिकारी व गटशिक्षणाधिकारी यांना दिली. तक्रार मिळाल्यानंतर पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली असून पुढील तपास श्रीरामपूर शहर पोलीस करीत आहेत. दरम्यान, शाळा बंद असताना काही मुले व व्यक्ती कंपाउंडवरून आत येत असल्याने अशा घटना घडत असल्याची शक्यता ग्रामस्थांनी व्यक्त केली असून दोषींवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.


### स्विफ्ट अपघातातील पाचवा बळी

# नऊ दिवस मृत्यूशी झुंज, अखेर महिलेचा मृत्यू

**श्रीरामपूर :** स्विफ्ट कारमधून खंडाळ्याच्या गणपती दर्शनाला जात असताना समोरून येणाऱ्या ट्रकच्या धडकेत झालेल्या अपघातात श्रीरामपूरातील चव्हाण कुटुंबातील ४ जणांचा मृत्यू झाला होता. त्यानंतर या अपघातातील ९ दिवसापासून मृत्यूशी झुंज देणाऱ्या महिलेचा मृत्यू झाला. या अपघातातील बळींची संख्या ५ वर जाऊन पोहचली आहे.

श्रीरामपूर शहरातील चव्हाण कुटुंब त्यांच्या स्विफ्ट कारमधून खंडाळ्याच्या गणपती दर्शनाला जात असताना समोरून येणाऱ्या ट्रकच्या धडकेत झालेल्या अपघातात श्रीरामपूर शहरातील संतोषी वडापावचे संचालक अशोक चव्हाण व रमेश चव्हाण यांच्या कुटुंबातील प्रशांत रमेश चव्हाण, सिद्धार्थ सुनील चव्हाण, ऐश्वर्या अशोक चव्हाण हे जागीच ठार झाले होते. तर संगीता अनिल चव्हाण यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला यातील जखमी सारिका अनिल चव्हाण (वय ३०) यांच्यावर ९ दिवसापासून मृत्यूशी झुंज देत असतानाच मृत्यू झाला. रुद्र अशोक चव्हाण (वय ६), ऋत्वी अशोक चव्हाण ( वय साडेतीन) या दोन लहान मुलांवर उपचार सुरू आहेत.

# अहिल्यानगर औद्योगिक विकासाचे केंद्र म्हणून उदयास येणार : ना.विखे



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**प्रवरानगर :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सहकार्याने जिल्ह्याच्या औद्योगिक क्षेत्रात मोठी गुंतवणूक येत आहे. औद्योगिक दृष्टीने जिल्ह्याला मुख्य केंद्र बनविण्याच्या उद्देशाने आवश्यक कार्यवाही निर्धारीत वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना जलसंपदा तथा पालक मंत्री ना.राधाकृष्ण विखे यांनी दिल्या.

जिल्ह्यातील शिर्डी, राहुरी आणि श्रीगोंदा तालुक्यातील औद्योगिक वसाहतीच्या संदर्भात मंत्रालयात विशेष बैठकीचे आयैजन करण्यात आले होते. परिसरातही औद्योगिक विकासाला चालना मिळावी, यासाठी औद्योगिक क्षेत्राच्या उभारणी संदर्भातील सर्व अडचणी दूर करण्याबाबत प्रशासकीय स्तरावर तातडीने कार्यवाही करण्याबाबत बैठकीत सविस्तर चर्चा झाल्याचे मंत्री विखे पाटील यांनी सांगितले.

शिर्डी येथील औद्योगिक वसाहती बरोबरच राहुरी आणि श्रीगोंदा तालुक्यातील औद्योगिक वसाहतीच्या निर्मितीसाठी कार्यवाही करण्यावर लक्ष केंद्रीत करण्याचे सूचित करून राहुरी तालुक्यात कृषी विद्यापीठाची जागा औद्यगिक विकाससाठी मिळावी म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाटपुरावा सुरू असून,औद्योगिक वसाहतींमुळे अहिल्यानगर जिल्हा औद्योगिक विकासाचे महत्त्वाचे केंद्र म्हणून पुढे येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्यात वाढत असलेल्या औद्योगिक गुंतवणूकीचा जिल्ह्याला मोठा लाभ होत असून, औद्योगिक विस्तार झाल्यास स्थानिक तरुणांना रोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध होतील, अशी अपेक्षाही बैठकीत यावेळी व्यक्त करण्यात आली.

# साखर कारखान्यांनी थकीत 'एफआरपी' व्याजासह अदा करावी : निलेश शेडगे

**श्रीरामपूर :** अहिल्यानगर जिल्ह्यातील बहुतांश साखर कारखान्यांच्या गळीत हंगामाची सांगता झाली आहे. असे असताना अनेक कारखान्यांकडे एफआरपी थकित आहे. सदर एफआरपीची देय रक्कम कायद्यानुसार व्याजासह अदा करावी, अन्यथा याप्रश्नी न्यायालयीन मार्गाचा अवलंब केला जाईल, असे प्रतिपादन शेतकरी संघटनेचे निलेश शेडगे यांनी केले आहे. शेडगे यांनी साखर कारखानदारीच्या व्यवस्थापनावर टिका केली. आर्थिक अडचणीचे कारण देत कारखान्यांनी एफआरपीची रक्कम थकविली आहे.यात सभाससद शेतक-यांचा दोष नसून आर्थिक कुवत नसताना गाळप क्षमतावाढ करणे,कर्ज काढून 'अर्थपूर्ण' हेतूसाठी नवे प्रकल्प उभारण्याचे प्रताप करणे. यामुळेच आर्थिक अडचणी उभ्या राहिल्या आहेत. यात व्यवस्थापन दोषी आहे. त्याची शिक्षा ऊस उत्पादकांना कशासाठी असा सवाल शेडगेंनी उपस्थित केला आहे. जे आर्थिक अडचणीचे कारण देतात त्यांचे खाजगी कारखाने मात्र नफ्यात आहेत. कर्जबाजारीपण व आर्थिक अडचणी आसताना देश व विदेशात दौरे सुरु आहेत. अनेक कारखान्यांनी कामगारांचे पगार थकित असताना कामगारांच्या नावावर ऋण काढून स्वतःचे सण साजरे केले आहेत. अशा स्थितीत संचालक मंडळ मात्र अलबेल आहे. असे असले तरी आता शेतक-यांचा संयम सुटला असून आयजीच्या जीवावर बायजी करणाऱ्या कारखान्याच्या व्यवस्थापनाने येत्या आठ दिवसात थकित एफआरपी १५ टक्के व्याजसह व कामगारांचे थकित वेतनाची रक्कम अदा करावी. अन्यथा कायदेशीर मार्गाचा अवलंब करुन अंदाधुंदी कारभार करुन कारखान्यांना दिवाळखोरीत नेणा-या संचालक मंडळाची संपत्ती जप्त करुन शेतकऱ्यांना न्याय द्यावा अशी न्यायालयीन याचिकेव्दारे मागणी कैली जाणार आसल्याचे शेडगे यांनी म्हटले आहे.

# सीसीटीव्ही ठप्प, गुन्हेगार मोकाट

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** शहरातील गुन्हेगारीवर नियंत्रण आणि सुरक्षेसाठी उभारलेले सीसीटीव्ही नेटवर्क गेल्या दीड वर्षांपासून बंद अवस्थेत असल्याचे समोर आले आहे. सुमारे ४८ लाख ८२ हजार ९९१ रुपयांचा खर्च करून उभारलेली ही यंत्रणा सध्या निष्क्रिय असल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

नेवासा नगरपंचायतने ६ जुलै २०२२ रोजी निविदा काढून शहरातील २७ प्रमुख ठिकाणी ७८ कॅमेरे बसवले होते. त्यामध्ये ५ पीटीझेड (फिरते) कॅमेरे आणि सुमारे ६० हजार मीटर केबलचा समावेश होता. ६ फेब्रुवारी २०२३ पर्यंत हे काम पूर्ण झाले. संबंधित कंपनीने एक वर्ष देखभाल केल्यानंतर पुढील जबाबदारी नेवासा पोलीस स्टेशनकडे देण्यात आल्याची माहिती आहे.

# कारेगावात उद्या 'महाराजस्व समाधान शिबिर'

## नागरिकांच्या प्रलंबित कामांचा जागेवरच निपटारा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** सामान्य नागरिकांना विविध शासकीय दाखले आणि महसूल विभागाशी संबंधित कामांसाठी कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागू नये, या उद्देशाने शनिवारी (दि. ८) रोजी श्रीरामपूर तालुक्यातील कारेगाव मंडळ स्तरावर 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरा'चे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरामुळे कारेगाव परिसरातील नागरिकांना विविध महसूल सेवा एकाच छताखाली उपलब्ध होणार असल्याची माहिती तहसीलदार मिलिंदकुमार वाघ यांनी दिली आहे.

श्रीरामपूरचे उपविभागीय अधिकारी आणि तहसील कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने हे शिबीर आयोजित करण्यात आले आहे. ग्रामीण भागातील नागरिकांचे अनेक प्रश्न प्रशासकीय स्तरावर प्रलंबित असतात, अशा प्रश्नांचा जलद गतीने निपटारा व्हावा, हा या शिबिराचा मुख्य हेतू आहे.

या शिबिरामध्ये प्रलंबित फेरफार नोंदींचा त्वरित निपटारा, ७/१२ दुरुस्ती, ७/१२ मधील चुकांची दुरुस्ती आणि डिजिटल स्वाक्षरीचे ७/१२ व ८-अ वाटप, उत्पन्न, रहिवासी, जातीचे प्रमाणपत्र आणि नॉन-क्रीमीलेअर प्रमाणपत्रांचे वाटप, अकृषिक परवानगी, ई-मोजणी अर्ज आणि भू-संपादनाबाबत मार्गदर्शन, सामाजिक अर्थसाहाय्य योजनांचा लाभ, पीएम किसान नोंदणी आणि ग्रीस्टॅक सुविधा, शालेय विद्यार्थ्यांसाठी आवश्यक दाखल्यांचे थेट वाटप, पुरवठा विभागाच्या योजना व रेशनकार्ड संबधित कामे, संजय गांधी निराधार योजना संबधित कामे आदी सेवा जागेवरच उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. तरी या शिबिराचा जास्तीत जास्त लाभ घेण्याचे आवाहन महसूल प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

**शासकीय योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचावा आणि लोकांची कामे वेळेत पूर्ण व्हावीत, यासाठी हे शिबीर अत्यंत महत्त्वाचे आहे. कारेगाव परिसरातील नागरिकांनी या संधीचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा,**

**– मिलिंदकुमार वाघ,**
**तहसीलदार, श्रीरामपूर**

# तू मला फार आवडतेस म्हणत, महिलेचा विनयभंग

**राहुरी** तु मला खुप आवडते, माझे बरोबर चल, असे म्हणत आरोपीने एका ३५ वर्षीय विवाहित महिलेचा हाथ धरुन विनयभंग केला. तसेच त्यांच्या कुटुंबातील इतर लोकांना शिवीगाळ करुन मारहाण केल्याची घटना राहुरी तालुक्यातील एका गावात दि. १ मार्च रोजी रात्रीच्या सुमारास घडली.

आरोपी उमाकांत सांगळे हा गेल्या सहा महिन्या पासून एका ३५ वर्षीय विवाहित महिलेचा पाठलाग करून त्रास देत होता. याबाबत महिलेने नातेवाईकांना सांगितले होते. दि. १ मार्च २०२६ रोजी रात्री ८ वाजे दरम्यान पिडीत महिला घरासमोर उभा होत्या. तेथे आरोपी दारु पिवून आला. आणि महिलेचा हाथ धरुन मला म्हणाला की, तु मला खुप आवडते, माझे बरोबर चल. तेव्हा महिलेने त्याचा हात झटकला व मोठमोठ्याने आरडाओरड केला. तेव्हा महिलेचा मुलगा, सासु, सासरे व भाया तेथे आले. ते आरोपीला समजावून सांगण्यास गेले. तेव्हा आरोपीने त्यांना शिवीगाळ दमदाटी करुन लाथा बुक्क्याने मारहाण केली. तसेच तुम्ही जर माझ्या नादी लागले तर तुमचा एक एकाचा काटा काढीन, अशी धमकी दिली व तेथून मोटारसायकलवर पळून गेला. घटने नंतर पिडीत महिलेने राहुरी पोलीस ठाण्यात धाव घेऊन आरोपी उमाकांत शिवाजी सांगळे, रा. शेटेवाडी, देवळाली प्रवरा, ता. राहुरी, याच्यावर वेगवेगळ्या कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहे.

# सामाईक रस्त्यावरून वाद; दोघा भावांना बेदम मारहाण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** सामाईक रस्त्यावरून ये-जा केल्याच्या कारणावरून दोघा भावांना शिवीगाळ करत लाकडी दांड्याने व लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केल्याची घटना राहुरी तालुक्यातील वांजुळपोई शिवारात घडली. या प्रकरणी सात जणांविरुद्ध राहुरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, विलास सखाराम गिते (वय ४२, रा. तिळापुर, ता. राहुरी) यांची वांजुळपोई शिवारात शेती असून शेजारी नारायण आघाव यांची शेती आहे. दोन्ही शेतांसाठी एक सामाईक रस्ता आहे. मात्र गेल्या काही दिवसांपासून या रस्त्यावरून ये-जा करू नये, असा आघाव यांचा गिते यांना विरोध होता.

१ मार्च रोजी दुपारी सुमारे १२ वाजता विलास गिते व त्यांचा भाऊ अनिल गिते हे शेतातून सामाईक रस्त्याने घरी येत असताना आरोपींनी त्यांना रस्त्यात अडवले. या रस्त्याने ये-जा करू नका, असे म्हणत त्यांच्याशी वाद घालत शिवीगाळ केली. त्यानंतर आरोपींनी लाकडी दांडा तसेच लाथाबुक्क्यांनी दोघांना मारहाण करून जखमी केले. तसेच पुन्हा या रस्त्याने आल्यास जीवे मारण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

याप्रकरणी विलास गिते यांच्या फिर्यादीवरून नारायण हरीभाऊ आघाव, तुकाराम नारायण आघाव, भारत नारायण आघाव, सुनिता नारायण आघाव, कांचन तुकाराम आघाव, विशाल अशोक पालवे (सर्व रा. वांजुळपोई, ता. राहुरी) तसेच मोहन विठ्ठल आघाव (रा. तिळापुर) यांच्याविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक संजय ठेंगे करीत आहेत.


# रमजान महिन्यात इफ्तार महागला

## कमी आवक, वाढती मागणी; फळांचे भाव गगनाला

शफीक बागवान । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** कमी आवक आणि वाढती मागणी यामुळे खरबूज टरबूज द्राक्ष संत्रा मोसंबी या पाणीदार फळांच्या भावांमध्ये मोठी वाढ झाली आहे. शरीराला गारवा देणाऱ्या या फळांच्या भाववाढीमुळे रमजान महिन्यात इफ्तार महागला आहे.

उन्हाच्या काहिलीपासून बचाव करण्यासाठी रोजदाराकडून पाणीदार फळे आणि खजूर तसेच वेगवेगळ्या अनेक सरबत व इतर खुशबूदार पेयांना मागणी वाढली आहे. रमजान निमित्त बाजारपेठेत वेगवेगळ्या खाद्यपदार्थाबरोबरच उच्च प्रतीची अखाती खजूर, अनेक प्रकारची पाणीदार फळे, सरबते, जुस मिळत आहे. यंदा मात्र टरबूज ३० रुपये,



खरबूज २५ रुपये किलोप्रमाणे विकला जात आहे. द्राक्षांच्या भावांमध्ये प्रचंड वाढ झाली असून चांगली प्रतीची द्राक्ष शंभरी पार आहे.

रमजान निमित्त शहरातील सय्यदबाबा दर्गा, वेस्टन चौक, नेहरू फळ मंडई या भागात दुकाने थाटण्यात आली आहे. येथे वेगवेगळ्या खाद्यपदार्थाबरोबरच उच्च प्रतीची अखाती खजूर, अनेक प्रकारची फळे, सरबते, जुस ग्राहकांचे लक्ष वेधत आहे. याबरोबरच अत्यंत पोषक आणि पाणीदार असणाऱ्या विविध फळांचीहि आवक झाली असून यंदा ही फळे मात्र खूप महाग आहेत.

केळी, आंबा, अननस, जांभूळ, पपई , टरबूज, खरबूज बाजारात उपलब्ध आहेत. हंगामापेक्षा या फळांची आवक कमी असून भाव मात्र गगनाला भिडले आहेत, असे अडत व्यापारी शकील चांदभाई बागवान म्हणाले.

सरबत मध्ये शाही गुलाब, मँगो, स्ट्रोबेरी, पायनापल आदि उपलब्ध आहेत. तसेच इराणी काळी खजूर, किमिया, अजवा, मरियम, कलमी, झेड फ्रोन आदि अनेक प्रकारच्या खजूर बाजारात उपलब्ध आहेत. याशिवाय या महिन्यात विशेष करून वापरले जाणारे अतर आले असून त्यात जमजम, नाईन फ्लोर, मज्मुआ, मग्नेट, संदल, हयाती, अशा अतरांचा त्यात समावेश आहे. लोकांची त्यास मोठ्या प्रमाणात मागणी आहे.

तसेच लोबान मध्ये सिंगापुरी, कावडी, रुडीया उपलब्ध आहेत. महिलांसाठी लागणारी मेहंदी मागविण्यात आली असून त्यात शमा, ब्राईट मेहंदीचा समावेश आहे. दैनंदिन लागणारे मिसवाक तसेच कुर्ते पायजमे आली आहेत. डोळ्यांना लाभदायक असणारा गोड, तिखट व हाशमी शुरमे ही उपलब्ध आहेत.

# प्रधानमंत्री आवास निधी गैरव्यवहाराची चौकशी करणार : राज्यमंत्री मिसाळ

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**बीड :** केज नगरपंचायतीत प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत लाभार्थ्यांना देण्यात येणाऱ्या निधीपैकी सुमारे ३.६२ कोटी रुपयांच्या गैरवापराची चौकशी करण्यात येणार असून चौकशीत दोषी आढळणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांवर फौजदारी कारवाई करण्यात येईल आणि अपहार झालेली रक्कम व्याजासह वसूल केली जाईल. गरज भासल्यास या प्रकरणात विशेष तपास पथक (एसआयटी) नेमण्याचाही विचार केला जाईल, असे नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी सांगितले.

केज (जि. बीड) नगरपंचायतीत प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत लाभार्थ्यांना देण्यात येणाऱ्या निधीपैकी सुमारे ३.६२ कोटी रुपयांचा गैरवापर झाल्याचा मुद्दा विधानसभेत उपस्थित करण्यात आला. यासंदर्भात लक्षवेधी सूचना आमदार नमिता मुंदडा यांनी मांडली. या चर्चेत सदस्य हरिष पिंपळे, सुधीर मुनगंटीवार यांनी सहभाग घेतला.

या लक्षवेधीला उत्तर देताना राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी सांगितले की, केजमध्ये प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत ३७४ लाभार्थ्यांना मंजुरी देण्यात आली होती. केंद्र सरकारचा २ कोटी २४ लाख ४० हजार रुपये आणि राज्य सरकारचा ३ कोटी ६२ लाख रुपये असा एकूण ५ कोटी ८६ लाख ४० हजार रुपयांचा निधी महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या खात्यात जमा करण्यात आला. योजनेसाठी राष्ट्रीयीकृत बँकेत खाते उघडण्याचे आदेश असतानाही ग्रामीण बँकेत खाते उघडण्यात आले. त्यातून ११६ लाभार्थ्यांना सुमारे १ कोटी ६७ लाख ७५ हजार रुपये वितरित करण्यात आले, परंतु उर्वरित सुमारे ४ कोटी २८ लाख २५ हजार रुपये लाभार्थ्यांना न देता इतरत्र वितरित झाल्याचे आढळून आले. या व्यवहारासंबंधी कोणतेही लेखे, व्हाउचर्स किंवा स्पष्ट बँक स्टेटमेंट उपलब्ध नसल्याचेही त्यांनी सांगितले. ही बाब निदर्शनास आल्यानंतर मुख्याधिकाऱ्यांनी लेखापालाकडून अहवाल मागवून तो जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर केला असून जिल्हाधिकाऱ्यांनी यासाठी समितीही गठीत केली आहे. तसेच या प्रकरणाची विभागीय चौकशी करून आर्थिक गुन्हे शाखेच्या माध्यमातून तपास करण्यात येणार असल्याचे राज्यमंत्री मिसाळ यांनी यावेळी नमूद केले.

# निवडणुकांसाठी शिवसैनिकांनी सज्ज रहावे : सचिन कोते

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**श्रीरामपूर :** आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शिवसैनिकांनी एकजुटीने काम करून पक्ष संघटना बळकट करावी व निवडणुकांसाठी सज्ज राहावे, असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन कोते आणि ग्रामीण जिल्हाध्यक्ष जगदीश चौधरी यांनी केले.

श्रीरामपूर तालुक्यात उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना पक्षाची निर्धार बैठक उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी अशोक थोरे होते. यावेळी तालुक्यातील पदाधिकारी, शाखाप्रमुख, कार्यकर्ते आणि शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बैठकीत आगामी राजकीय घडामोडी, पक्ष संघटनेचे बळकटीकरण आणि गावपातळीवर जनसंपर्क वाढविण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. जगदीश चौधरी यांनी शिवसेना हा केवळ राजकीय पक्ष नसून जनतेच्या हितासाठीची चळवळ असल्याचे सांगितले. निष्ठावंत कार्यकर्त्यांच्या बळावर पक्ष पुढे जात असल्याचे त्यांनी नमूद केले.

तालुकाप्रमुख राधाकिसन बोरकर यांनी शिवसेना नेहमीच जनतेच्या प्रश्नांसाठी लढणारा पक्ष असल्याचे सांगितले. बाळासाहेब ठाकरे यांनी दिलेला ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण हा विचार पुढे नेण्याचे आवाहन करण्यात आले.

यावेळी गावागावात जनसंपर्क मोहीम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. बैठकीस तालुकाप्रमुख राधाकिसन बोरकर, ग्रामीण तालुकाप्रमुख लखन भगत यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.